शनिवार । १३ मार्च १९८२ । एक रुपया

माणूस

# समिधांनो, संपू नका !

आदर्शवादी राजकारणाची आज पूर्ण वाताहत झालेली असताना रामभाऊ म्हाळगी यांचे अकाली निधन व्हावे, हा दुर्दैवाचा असह्य फटका आहे ! राजकारण म्हणजे भ्रष्टाचार, राजकारण म्हणजे कट-कारस्थाने, क्रूर सत्तास्पर्धा, गलिच्छ सौदेबाजी आणि नागडा स्वार्थ अशी समीकरणे सध्या रूढ आहेत. चित्रपटांतून, साहित्यातून राजकीय व्यक्तींची अशीच चित्रणे रंगवली जात आहेत. वस्तुस्थिती काही प्रमाणात अशी असली तरी राजकारणाविषयी असा दृष्टिकोन फैलावत जाणे लोकशाहीला मारकच ठरणार आहे. यामुळे निराशा आणि वैफल्यवाद बोकाळेल व कळत नकळत आपण गुंडशाहीकडे, हुकुमशाहीकडे ढकलले जात राहू. हा धोका, ही वाटचाल जर टाळायची असेल तर तत्त्ववादी, आदर्शवादी राजकारणाची कास धरली पाहिजे. जे असे राजकारण करीत असतील त्यांचा विशेष गुणगौरव केला पाहिजे. रामभाऊ म्हाळगी अशा निवडक व्यक्तींपैकी एक होते. सार्वजनिक जीवनात प्रवेश केल्यापासून अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी आदर्शांची जपणूकच केली. काम विद्यार्थी परिषदेचे असो की, खासदारकीचे असो. व्यक्तिगत स्वार्थ त्यांना कधी शिवलाच नाही. आपण संघाचे स्वयंसेवक आहोत, याचा त्यांना कधी विसर पडलाच नाही. आपल्या प्रत्येक कामातून देश कसा मोठा होईल, भारताचे नाव कसे उज्ज्वल होईल, हेच त्यांनी पाहिले. आयुष्यातील प्रत्येक क्षण आणि आपल्या बौद्धिक आणि शारीरिक शक्तीचा प्रत्येक कण त्यांनी राष्ट्रासाठी अगदी योजनापूर्वक अर्पण केला. अजूनही संघ म्हटला की, अस्पृश्यभावनेने त्याकडे पाहण्याची फॅशन जोरावर आहे. २०।२५ वर्षांपूर्वी, विशेषतः महाराष्ट्रात, भारतीय जनसंघाच्या स्थापनेच्या काळात तर ही अस्पृश्यभावना फारच भयानक होती. त्या सर्वस्वी प्रतिकूल स्थितीत जनसंघाचे काम महाराष्ट्रात रुजवायचे, वाढवायचे ही काही सोपी



गोष्ट नव्हती. आपले संघस्वयंसेवकत्व कुठेही, केव्हाही न लपवता रामभाऊंनी ही किमया साधून दाखवली. निवडणुकीच्या प्रसंगी 'काळा डाग' म्हणून प्रतिपक्षीयांनी त्यांच्यावर जहरी, हीन टीका केली; पण रामभाऊ न डगमगले किंवा न त्यांनी प्रतिपक्षीयांवर, त्यांच्या पातळीवर उतरून हीन दर्जाची टीका केली. आपले काम वाढवणे, आदर्शाप्रमाणे वागणूक ठेवणे, हीच त्यांची टीकेला उत्तर देण्याची विधायक प्रवृत्ती होती व यामुळेच अगदी इदिरा लाटेतही ते टिकून राहिले. भल्याभल्यांसारखे वाहून गेले नाहीत. संघ म्हणजे मुस्लिम-द्वेष हा समज अद्यापही रूढ आहे; पण रामभाऊंनी प्रत्यक्ष आपल्या कामाने, वागणुकीने मुस्लिमांची मनेही जिंकली होती. एरवी त्यांना बरे वाटावे म्हणून ठाण्यात मुस्लिमधर्मीयांनी प्रार्थना केली नसती व ते गेल्यावर मुस्लिम लीगनेसुद्धा दुखवटचाचा ठराव समत केला नसता! टीकेला प्रतिटीकेने उत्तर देण्याऐवजी निर्दोष वागणुकीने, आचरणाने, प्रत्यक्ष कृतीने उत्तर देणे, ही खास संघशैली रामभाऊंनी पूर्ण आत्मसात केली होती व त्यामुळेच पूर्वी जनसंघाचे व आता भाजपचे, म्हणजेच एका राजकीय पक्षाचे नेतृत्व करूनही ते अजातशत्रू राहिले! निवडणुकीनंतरच्या पहिल्यावहिल्या विजयधुंद सभेतही 'मी आता सगळ्या मतदारसंघाचा प्रतिनिधी आहे, एका पक्षाचा केवळ नाही', हे सांगायला अशी अजातशत्रुत्वाची भावना अंगी मुरायला हवी. ते आदर्श लोकप्रतिनिधी होते, मतदारसंघाशी कसे सबंध ठेवावेत, त्याची बांधणी-उभारणी कशी करावी याचा वस्तुपाठ देणारे ते एक राजकीय शिक्षक होते, अभ्यासू कार्यकर्ते होते, शिस्तीचे भोक्ते होते, त्यागी होते, हे सगळे खरेच आहे; पण या सगळ्या गुणांपेक्षा द्वेष, शत्रूभावना न फैलावता त्यांनी हे सगळे केले हे ध्यानात घेणे, सद्य:स्थितीत विशेष महत्त्वाचे आहे. आपले राजकीय पक्ष तर द्वेषबुद्धीचे जणू कारखानेच झालेले आहेत! जनता पक्ष फुटला याचे प्रमुख कारण म्हणजे ही द्वेषभावना. जनता पक्ष फुटत होता तेव्हा दिल्लीत तर द्वेषभावनेने नुसते थैमान मांडलेले होते. अनेक नेत्यांना त्या वेळी भेटण्याचा प्रसंग आला. प्रत्येकजण दुसऱ्याविषयी भयानक द्वेषाने बोलत होता. रामभाऊंच्या भेटीत मात्र वेगळा अनुभव आला. ज्यानी पक्ष फोडला त्याच्याविषयी एखादाही कटु शब्द त्या वेळी रामभाऊनी उच्चारला नव्हता. जाणवली ती असहाय्यता! तरी पण कमालीचा सयम! सत्ता कोणाला नको असते? ती गेल्याचे दु:खही स्वाभाविक; पण सत्तेपेक्षा संस्कृती श्रेष्ठ मानणाऱ्या संस्कारात, संघटनेत त्याची जडण-घडण झाली असल्याने त्या प्रक्षुब्ध आणि बिथरवून टाकणाऱ्या वातावरणातही रामभाऊ स्थिर होते. त्यानी आपला तोल ढळू दिलेला नव्हता. दीनदयाळ उपाध्याय हा त्यांचा राजकारणातील आदर्श होता ते गेले तेव्हाही पक्षाला, आदर्शवादी राजकारणाला असाच असह्य धक्का बसला; पण या धक्क्यातून पक्ष सावरला, पुढे जात राहिला. कारण रामभाऊंसारखे निष्ठावंत कार्यकर्ते पक्षाजवळ होते. असे कार्यकर्ते आकाशातून पडत नाहीत किंवा सत्तेच्या राजकारणातून निर्माण होत नाहीत. एकेक झाड जपावे, वाढवावे तशी ही निर्मिती असते. रामभाऊंना याची पुरेपूर जाणीव होती म्हणून खासदारकी आली तरी आपल्या अंगावरचा गणवेश त्यानी कधी कायमचा उतरवून ठेवला नाही. सपूर्ण गणवेषासह संघाच्या एखाद्या कार्यक्रमाला त्यांची उपस्थिती असायचीच. सघ की सत्ता असा पेच निर्माण झाला असता तर रामभाऊंनी सत्तेवर पाणी सोडले असते. त्याचा मुलगा जयंत हा तर संघाचा प्रचारक म्हणून कामही करतो आहे. संघाने बाणवलेले हिंदूसस्कृतीचे आदर्शच साकार करण्यासाठी ते राजकारण करीत होते आणि दुर्दैव सगळ्यांचेच की, दीनदयाळ, रामभाऊ याच्यासारखी आदर्श साकार करू पाहणारी मडळी आपल्यातून काळाने अवेळीच ओढून न्यावीत! 'हिंदू' की 'भारतीय' या शब्दांवर सध्या पुन्हा


## साप्ताहिक माणूस

वर्ष : एकविसावे

अंक : एकेचाळिसावा

१३ मार्च १९८२

किंमत : एक रुपया

सपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच सस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

रणधुमाळी चालू आहे. दीनदयाळ किंवा रामभाऊ यांच्यासारखी माणसे प्रत्यक्ष कृतीनेच ही रणधुमाळी केवळ धुळवड आहे, शब्द वेगळे असले तरी अर्थ एकच आहे, आशय समान आहे, हे दाखवून देत असतात! 'राष्ट्राय स्वाहा, इदं न मम' अशा भावनेने आपले आयुष्य जगणारी ही निष्काम कर्मयोगी माणसे! यांना हिंदू म्हटले काय, भारतीय म्हटले काय, यांच्यासारख्याच्या अस्तित्वामुळेच सामाजिक-राजकीय जीवनाचा स्तर उंचावत असतो. अशांची संख्या वाढली तरच या देशाला एक राजनैतिक संस्कृती लाभणार आहे! अशी संस्कृती उच्च तत्त्वांच्या केवळ घोषणांमुळे निर्माण होणार नाही. घोषणा आणि कृती यातील अंतर कमी व्हावे हाच तर रामभाऊंसारख्यांचा निदिध्यास असतो. तत्वे ही आचरण्यासाठी असतात हे त्यानी दाखवून दिले. 'आधी केले मग सांगितले' असा त्यांचा बाणा असल्यानेच लोकांचा विश्वास ते संपादन करू शकले. या विश्वासाचे, आपुलकीचे, प्रेमाचे प्रतीक म्हणजे त्यांची निधनवार्ता कळल्यावर समाजातील सर्व थरांतून उमटलेली उत्स्फूर्त शोकभावना.मुंबई-दिल्लीपासून त्यांच्या राहत्या घराच्या आसपासच्या गल्लीबोळापर्यंत लक्षावधी लहान–थोरांना, विद्वानांना, सामान्य जनांना रामभाऊंविषयी आपुलकी आणि आदर वाटत होता. यात कुठेही पक्षभेद, पंथभेद आड येत नव्हते. सत्तावन्न वर्षांपूर्वी प्रवर्तित झालेल्या एका यज्ञकुंडात ही आणखी एक समिधाच जणू सर्मपित होत होती!

समिधांनो, संपू नका! हा राष्ट्रयज्ञ अजून कुठे पूर्ण झालेला आहे?

बलसागर भारतासाठी सुरू असलेला हा यज्ञ आहे.

तसा भारत साकार करणे हीच रामभाऊंसारख्यांना खरी श्रद्धांजली ठरेल!

रामभाऊंच्या स्मृतीस प्रणाम!

—श्री. ग. मा.

मुंबई वार्ता

# पेंटिंग वगैरे सगळं सोडून द्यावं....!

उत्कृष्ट ठरणाऱ्या कलाकृतींना—चित्रकृतींना पारितोषकं देण्याची योजना महाराष्ट्र शासनाच्या कला संचलनालयानं मध्यंतरी काही वर्षं खंडित केली होती. या वर्षीपासून ती पुन्हा एकवार सुरू करण्यात आली. मुख्यतः नवोदित कलाकरांना उत्तेजन देणारी ही योजना. पेंटिंग, ग्राफिक्स, शिल्पकला इत्यादि कलाप्रकारात सर्वोत्कृष्ट ठरवल्या गेलेल्या सात तरुण कलाकारांना ही रोख पारितोषकं दिली गेली. खेरीज आठवडाभरं जहांगीर आर्ट गॅलरीत मांडलेल्या प्रदर्शनातून ती प्रेक्षकांसाठी, रसिकासाठी खुलीही ठेवण्यात आली होती.

आपण निवडलेल्या कलाप्रकाराचं महाविद्यालयीन शिक्षण नुकतंच संपवलेले हे तरुण कलाकार. त्यांच्यामध्ये बुद्धीची चुणुक आहे, प्रतिभेची झलक आहे; पण अजूनही त्याना पुरेशा प्रकाशात यायचं आहे, अनुभवानं आणि चिंतनानं अजून त्याच्या कलेला परिपक्वता यायची आहे. सध्या त्यांची नावं फक्त मर्यादित कलावर्तुळात माहिती आहेत, ती अजून छनछन वाजणारी कलदार चलनी नाणी बनलेली नाहीत. प्रसिद्धीचं झळझळीत वलय अजून त्याच्याभोवती निर्माण झालेलं नाही. थोडक्यात म्हणजे, कलाकार या नात्यानं त्याना अजून प्रस्थापित व्हायचं आहे, घडणं अजून शिल्लक आहे.

निर्मितीची किंवा घडण्याची ही प्रक्रिया नेहमीच यातनाकारक असते. त्यात कलाकार घडण्याची प्रक्रिया म्हणजे तर अधिकच निराळी. कलाकार म्हणजे नाजुकमिजाज आणि देवाजीचा लाडका! जनसामान्यही त्याच्याकडे कौतुकभरल्या आदरानं पहाणार. कलेची जोपासना म्हणजे कष्टाचं, तसंच कौशल्याचं नाजूक काम. तशात विकासाच्या प्रलयंकर अवस्थातून कला आणि कलाकार जात असताना बाह्य, भौतिक अडथळ्याचीही कमतरता नसतेच. कलाबाह्य आणि स्वतः कलेचाही व्यवहार, त्याची बंधनं आणि खाचखळगे कुणाला चुकले आहेत? तरुण उदयोन्मुख कलाकरांच्या पुष्कळच अडचणी असतात. त्या जाणून घेण्यासाठी मी सतीश नाईकशी बोलायचं ठरवलं.

नुकताच सतीशला पेंटिंगबद्दल शासनाचा पुरस्कार मिळाला आहे. समीक्षकांनी त्याच्या कलेची वाखाणणीही केली आहे. शिवाय 'लोकप्रभे'चा उपसंपादक म्हणून साहित्य, 'उन्मेष'मध्ये काम केल्यानं नाट्य अशा बहुविध आविष्कार-माध्यमांची पार्श्वभूमीही त्याला आहे, त्यामुळे त्याच्या शब्दांना आणि विचारांना विशेष अर्थ आहे.

उदयोन्मुख कलाकाराची सर्वांत मोठी समस्या कोणती? सतीश म्हणतो, कलाकाराला रसिक न मिळणं ही त्याची सर्वांत मोठी शोकांतिका आणि हीच नेमकी चित्रकाराच्या वाट्याला येत असते. मुळातच चित्रकलेविषयी जाण कमी. तिचा प्रसार कमी. अगदी संवेदनाक्षम मनाच्या रसिकांमध्येही चित्रकलेची आस्था आणि आवड कमीच आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी आम्ही चित्रकारांनीच काही तरी करायला हवं. आम्ही चित्रकार काही कवीप्रमाणे शब्दसृष्टीचे ईश्वर नाही. आम्हाला जे म्हणायचं असतं, चित्रांमागच्या आमच्या भूमिका, हे सारं शब्दात मांडणं शक्य नसतं. तशातही मी तसा थोडा-फार प्रयत्न केला होता. कॉलेजमध्ये असताना मी आणि माझ्या मित्रांनी, 'वेध' नावाचं एक लघु अ-नियतकालिक काढलं होतं. त्याचे फक्त हाताच्या बोटावर मोजण्याइतके अंक निघाले आणि मग तेही थंडावलं! हे घडवून आणलं आमच्या परमपूज्य शिक्षकांनी! त्यांनी विद्यार्थ्यांत फाटाफूट केली. त्यांना आमिषं दाखवली. हा यांचा चमचा, तो त्याचा चमचा असं डोक्यात भरवलं आणि

मलपृष्ठ १ वर

उत्तर मीमांसा ४१ । स. शि. भावे

# प्राध्यापकांच्या मागण्या लवादाकडे सोपवाव्या आणि विद्यापीठांकडून परीक्षा काढून घ्याव्यात

हा मजकूर प्रसिद्ध होईतो बारावीच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या की नाही ते स्पष्ट झाले असेल. विद्यापीठाच्या परीक्षा पुढे ढकलल्या जात आहेत काय, हे देखील स्पष्ट झाले असेल.

प्राध्यापकांच्या मदतीशिवाय हौशी परीक्षकांकरवी आणि निरीक्षकांकरवी परीक्षा घेण्याचा बेत शासनाने सध्या (हा मजकूर ४ मार्च रोजी लिहिला जात आहे.) ठरविला आहे खरा; पण तो पुरतेपणी पार पडेल असे दिसत नाही आणि समजा, परीक्षा पार पडल्या असे दाखविले गेले अथवा घोषित झाले, तरी तो एक फार्स होईल. कारण अनुभवी व तज्ज्ञ परीक्षक-निरीक्षकाची जागा हौशी लोक भरून काढू शकणार नाहीत. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने तो आणखी एक अन्याय होईल.

विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ नये, असे मत सर्वत्र व्यक्त होत आहे. शासनाचे प्रतिनिधी, विद्यार्थी संघटना आणि वृत्तपत्रे या अन्यायावर भर देत आहेत. यात केवळ अन्यायच नव्हे, तर भरून न येणारे सामाजिक नुकसान आहे, असा प्राध्यापकांच्या बहिष्काराचा परिणाम स्पष्ट केला जात आहे. 'महाराष्ट्र-टाइम्स'ने हा मुद्दा संपादकीयात समंजसपणे मांडला आहे. 'प्राध्यापकांचे हक्क, मागण्या, पूर्वकालापासून–retrospectively–पूर्ण होऊ शकतात. मात्र, बहिष्कारामुळे विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान असे retrospectively करून भरून देता येणार नाही', असा त्यांच्या प्रतिपादनाचा आशय आहे.

विद्यार्थी आणि वृत्तपत्रे यांच्या मतात सर्वसाधारण पालकांच्या काळजीचे प्रतिबिंब पडले आहे आणि या काळजीचा योग्य विचार करून प्राध्यापकांनी आपला बहिष्काराचा निर्णय यंदापुरता तहकूब करावा, अशी त्याची अपेक्षा आहे.

ही काळजी आणि ही अपेक्षा कोणासही समजू शकेल. सर्व प्राध्यापकांनाही ती समजते आहे. कारण तेही पालक आहेत, हे महिन्यापूर्वी (उत्तरमीमांसा : ३८ : ६.२.८२) स्पष्ट केलेच आहे.

प्रश्न असा की, प्राध्यापकांनी आपला बहिष्कार एकतर्फी रद्द करावा काय? मला वाटते, बहिष्कार एकतर्फी रद्द करणे हे विद्यार्थी, वृत्तपत्रे (आणि आता प्राचार्य-देखील) यांनाही मान्य होणार नाही. सरकारने काही अभिवचने द्यावी, (केवळ आश्वासने नकोत.) आणि नंतर प्राध्यापकांनी आपला बहिष्कार यंदापुरता मागे घ्यावा, हा या प्रश्नावर चांगला तोडगा होऊ शकेल.

शासनाकडून प्राध्यापकांना किमान खालील अभिवचने हवी आहेत :

**एक** : प्राध्यापकांच्या मागण्यांची पूर्वकालबद्ध (retrospective) पूर्तता. शासन यावरच सतत हुलकावण्या देत आले आहे. ग्रंथपालांच्या श्रेणीचे उदाहरण पाहावे. प्राध्यापकांच्या श्रेणी १-१-१९७३ पासून सुधारल्या. ग्रंथपालाना याच श्रेणी मिळाव्यात आणि त्या याच तारखेपासून मिळाव्यात, अशी ग्रंथपालांची मागणी आहे. या मागणीबाबत शासनाने आधी घोळ घालून काळकाढूपणा केला. नंतर श्रेणी मान्य केल्या; पण त्या ८० पासून मिळतील, असे जाहीर केले. यात ग्रंथपालांना काहीच दिलासा नव्हता. कारण ७३ ते ८० या सात वर्षांत सारे ग्रंथपाल आपल्या श्रेणीत चढत ७००–१६०० या नव्या श्रेणीत आपोआप आले होते. महागाई वाढली म्हणून नवी श्रेणी आली. तर या महागाईसाठी दिलासा ग्रंथपालांना मिळायला हवा होता. हा हेतूच शासनाच्या कार्यपद्धतीमुळे विफल झाला.

म्हणून, ज्या मागण्या मान्य होतील, त्यांची अमलबजावणी १-१-७३ पासून होईल, असे अभिवचन शासनाने दिले पाहिजे.

**दोन** : मागण्यांचा निर्णय केवळ शासनाने करता कामा नये. शासनाच्या निर्णयाविरुद्ध तक्रारी आणि त्यांचा निर्णय शासनानेच करायचा, हे तत्त्वत: बरोबर नाही. एखाद्या त्रयस्थ लवादाने हा निर्णय करावा, हे योग्य होईल. 'तरुण-भारत'ने आपल्या संपादकीयात ही योग्य सूचना केली आहे. त्यांनी माजी शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांचे नाव सुचवले आहे. मधुकररावांचे नाव योग्य आहे. तथापि, लवाद एक व्यक्तीचा नसावा, असे मला वाटते. प्राध्यापक, पालक व शासन या तीन बाजूंच्या तीन प्रतिनिधींचे लवादमंडळ हे अधिक व्यापक आणि त्यामुळे अधिक विश्वसनीय व अधिक बंधनकारक होईल. यात पालक व शासन यांना उदाहरण घालून देण्याची संधी आहे. ती त्यांनी अवश्य घ्यावी. समजा, शासनाने प्रा. व्ही. व्ही. जॉन याना नेमले, प्राध्यापकानी डॉ. अ. रा. कामत यांना नेमले आणि पालकांनी प्रा. ग. प्र. प्रधान यांना नेमले तर एक चांगले लवादमंडळ तयार होईल. शासन, प्राध्यापक, संस्थाचालक, पालक यानी असे लवादमंडळ बंधनकारक मानावे.

आणखी एक महत्त्वाची सूचना म्हणजे, असे एक लवादमंडळ कायमचे असावे. कोणताही प्रश्न निघाला की, तो लवादमंडळाकडे सोपवायचा. मंडळ देईल तो निर्णय सर्व बाजूनी मान्य करायचा. दर तीन वर्षांनी लवादमंडळाचा एक सदस्य बदलायचा. अशी सार्वकालिक यंत्रणा सरकारने मान्य करावी. अशा यंत्रणेचा कायदाही करावा म्हणजे संप होणार नाही आणि लवादमंडळाच्या निर्णयानंतरही समजा झाले तर ते अविचारी ठरतील. अशा संपाना मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळणार नाही.

**तीन** : शासनाने समयबद्धता स्वीकारावी. म्हणजे असे की, लवादमंडळ नेमल्याचे, त्याकडे आजच्या साऱ्या मागण्या सोपविल्याचे आणि मंडळाचा निर्णय बंधनकारक मानण्याचे शासनाने ताबडतोब म्हणजे वीस मार्चच्या आत जाहीर करावे. आजच्या मागण्यांसंबंधीचा निर्णय लवादमंडळाने येत्या वीस जूनच्या आत द्यावा, अशी लवादमंडळाला विनंती करावी आणि लवादमंडळाचे निर्णय, आणखी तीन महिन्यांच्या अवधीत, म्हणजे वीस सप्टेंबरच्या आत अंम-

लात आणू, असे अभिवचन द्यावे. हा निर्णय शासनाने आपण होऊन जाहीर करावा. हा तपशील आपण होऊन जाहीर करावा व स्वतःला जाहीरपणे तपशिलाशी बांधून घ्यावे.

असे झाल्यावर प्राध्यापक बहिष्कार उठवतील, याविषयी व्यक्तिशः मला शंका वाटत नाही.

☐

प्राध्यापक संघटनांच्या आणि शिक्षकेतर सेवक संघटनांच्या कार्यकर्त्यांनाही मला एक विनंती करावीशी वाटते. मागण्या मांडणे, अधिकाऱ्यांशी चर्चा करणे आणि नंतर त्या मान्य होणे वा न होणे एवढाच सरळसोट मार्ग त्यांनी नजरेसमोर ठेवू नये. वचनबद्ध व समयबद्ध लवादाचा पर्यायही त्यांनी शासनासमोर ठेवावा. हा पर्याय स्वीकारण्यासाठी वीस किंवा तीस मार्चपर्यंत मुदत द्यावी.

सरकारने हा पर्याय स्वीकारला तर उत्तमच. न स्वीकारला तर सरकारची गुर्मी आणि त्याचा आडमुठेपणा पालकासमोर व विद्यार्थ्यांसमोर प्रकट होईल आणि पालक व विद्यार्थी यांची खरी सहानुभूती प्राध्यापकांना व प्राध्यापकेतर सेवकाना मिळेल. आज घटकेला पाहता प्राध्यापक काही अडवणुकीने वागत आहेत की काय, अशी शंका त्यांना जाणवते आहे. ही शंका दूर झाली पाहिजे. ती वर सुचविलेल्या पर्यायाने दूर होईल.

☐

परीक्षा, तिची स्वतंत्र व्यवस्था, तिचे स्वतंत्र वेळापत्रक, विद्यापीठाचा परीक्षेतील भाग यासबंधाने, या निमित्ताने, अधिक विचार झाला पाहिजे, हे मात्र खरे. तत्त्व व व्यवहार या दोन्ही दृष्टींनी सध्याच्या व्यवस्थेचा परखडपणाने फेरविचार झाला पाहिजे. ते आता अटळ झाले आहे.

काही विद्यापीठात 'परीक्षा–सुधार' या नावाने जी घटपटादि खटपट चालू आहे, त्या पद्धतीचा हा फेरविचार असून चालणार नाही. सध्या 'परीक्षा–सुधार' या नावाखाली जे काही चालू आहे ते फक्त अत्यंत वरवरचे, तान्त्रिक नक्षीकाम चालू आहे. ही एक विशेष अभिनव योजना म्हणून विद्यापीठ अनुदान मंडळाने पुरस्कारिली आहे. तिच्यासाठी काही अनुदान मंजूर केले आहे. या अनुदानातून ज्यांच्या नेमणुका झाल्या आहेत असे काही आणि सतत काही तरी 'नवे' हवे असलेले काही यांनी या 'परीक्षा–सुधारां'ची जोरात जाहिरात चालू ठेवली आहे. वस्तुतः ते केवळ एक फॅड आहे. हे फॅड जितक्या लवकर बंद होईल तितके बरे.

शिक्षण हा एक समग्र, सजीव, एकात्म असा प्रकल्प आहे. या समग्र प्रकल्पाची फेररचना किंवा सुधारणा केल्याशिवाय केवळ परीक्षा-तन्त्रात सुधारणा कशी होऊ शकेल? पण हा साधा मूलभूत प्रश्न परीक्षा–सुधार–प्रचारक लक्षात घेत नाहीत. ते म्हणतात, 'यूजीसीने आम्हाला नेमले आहे, हे काम करायला सागितले आहे, तर ते आम्ही करणार!' एखाद्या नोकरशाहीतील अधिकाऱ्याचे हे बोलणे झाले, शैक्षणिक विचारवंताचे नव्हे.

अभ्यासक्रम ठरविणे, पुस्तके नेमणे, परीक्षाची पद्धती ठरविणे यासाठी विद्यापीठात सुसूत्र यन्त्रणा आहे. प्रत्येक विषयासाठी त्याचे त्याचे अभ्यासमंडळ आहे. विषयांच्या सुसंगत गटांप्रमाणे विद्याशाखा (फॅकल्टीज्) आहेत. विद्याशाखातून व नियुक्तीतून तयार झालेली विद्वत्सभा (अॅकॅडेमिक कौन्सिल) आहे. या सर्व स्तरांवर महत्त्वाच्या शैक्षणिक प्रश्नांचा खल होत असतो. त्या विचारात आदर्शाप्रमाणे वस्तुस्थितीचीही दखल घेतली जाते.

वस्तुस्थितीची अशी दखल घेतली जाणे हे अत्यंत आवश्यक आहे. कारण शिक्षणाचा प्रकल्प एका टोकाला आदर्शाशी तर दुसऱ्या टोकाला वास्तवाशी जोडलेला असतो. आदर्श अभ्यासक्रम, आदर्श अध्यापनपद्धती आणि आदर्श परीक्षापद्धती हे सारे हवेत ठरवणे शक्य असते. मात्र अशा आदर्श आराखड्याची अंमलबजावणी ही वास्तवाच्या संदर्भात होत असते.

विद्यापीठाच्या विविध मंडळात प्राध्यापक, पालक व विद्यार्थी यांचे प्रतिनिधी असल्याने वास्तवाची योग्य जाणीव त्याच्या विचारात आणि निर्णयात कार्यकारी असते. नव्याने काम करू लागलेल्या परीक्षा-सुधार गटाच्या (examination reforms cell) विचारात मात्र वास्तवतेची जाणीव नसते. आदर्श सिद्धान्त आणि निगमन (deductive) पद्धतीने मांडलेली कोष्टके एवढीच त्यांची कार्यपद्धती असते. या सिद्धांतात आणि कोष्टकांत प्राध्यापकानी आणि विद्यार्थ्यांनी स्वतःला कोंबावे, अशी अपेक्षा विद्यापीठ अधिकारी मग करू लागतात. कारण, काही नवे करून दाखविण्याच्या नशेत त्याना परीक्षा-सुधार गटाचा आपलेपणाने विशेष कैवार घ्यावासा वाटतो. हे केवळ परीक्षा-सुधाराचे फॅड तावडतोब बंद होण्याची आवश्यकता आहे.

☐

परीक्षापद्धतीचा खरा विचार करायचा तर त्यासाठी परीक्षेच्या तत्त्वज्ञानाचा विचार आधी करावयास हवा.

परीक्षा कशाची असते? तर ती शिकविलेल्या ज्ञानाची असते. अर्थात ही परीक्षा घेण्याचा अधिकार कोणाचा? तर जो शिकवितो त्याचा. अर्थात ज्याने शिकविले त्यानेच परीक्षा घ्यावी, हे तत्त्व निरपवाद म्हणावे लागेल.

अशा परीक्षित स्नातकाच्या ज्ञानाची व्यावहारिक परीक्षा नंतरच्या उपयोजनात होईल. अशी डॉक्टरांच्या अथवा वकिलांच्या ज्ञानाची नंतरची परीक्षा त्यांच्या त्यांच्या व्यवसायात होते आणि त्याच्या त्याच्या कर्तृत्वाप्रमाणे ते यशस्वी अथवा अयशस्वी होतात.

तथापि, ज्ञानसाधना योग्य दर्जाने पूर्ण झाली आहे की नाही, हे विद्यार्थ्याला ज्याने शिकविले तोच तपासू शकेल. कारण त्याला जसा विषय, तसाच विद्यार्थीही माहीत असेल. विद्यार्थी माहीत असणे हे खरी परीक्षा घेण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा, परीक्षा जिवंत विद्यार्थ्याची न होता स्मरणशक्तीच्या यंत्राची होईल. आपल्या सध्याच्या परीक्षापद्धतीत ज्या अनेक प्रकारच्या यांत्रिकता आहेत, त्यांपैकी सर्वांत नुकसानकारक यान्त्रिकता ही आहे.

आश्चर्याची गोष्ट अशी की, आधुनिक सेमेस्टर पद्धतीचा जे पुरस्कार करतात त्यांना परीक्षेतील हे मूलभूत तत्त्व तेवढे मान्य होत नाही. शिक्षक-विद्यार्थी याचा निकटचा व सतत संपर्क हे तत्त्व सेमेस्टर पद्धतीच्या अध्यापनापुरते ते सागतात. तेही अर्थात तोंडदेखले; पण परीक्षापद्धतीबाबत मात्र हे तत्त्व त्याना मान्य होत नाही.

परीक्षेची बाब ही शिकवणारा शिक्षक आणि त्याचा विद्यार्थी याच्यापुरती ठेवली तर भ्रष्टाचार माजेल, अशी भीती ते व्यक्त

करतात. अनेकांना अशी भीती रास्तपणे वाटते. या भीतीसंबंधात दोन मुद्दे विचारात घ्यायला हवेत.

एक तर, आजच्या तथाकथित वस्तुनिष्ठ परीक्षापद्धतीतही भरपूर भ्रष्टाचार आहे. परीक्षक म्हणून ज्यांना दीर्घ काळचा अनुभव आहे, त्यांना विचारा. विशिष्ट केन्द्राच्या सर्व उत्तरपत्रिकांना, दोनशे मैल दूर राहणाऱ्या परीक्षकांकडून सर्रास सत्तरचेवर गुण मिळाले आहेत—अशी अनेक उदाहरणे हे अनुभवी जन सांगतील. अगदी आय. ए. एस., आय. एफ. एस. या परीक्षाही भ्रष्टाचारापासून मुक्त नाहीत! मंत्री, सरकारी अधिकारी यांची मुले व नातेवाईक या परीक्षात कधीही अनुत्तीर्ण झालेली दिसत नाहीत. खरे तर या परीक्षांत, विद्यार्थ्यांचे क्रमांक परीक्षकाना कळू नयेत म्हणून उत्तरपत्रिकांवर संकेत-क्रमांक घालण्याची काळजी घेतली जाते, पण ही काळजी वरवरची ठरते. आतून ज्यांना जे जे कळायला हवे आहे ते ते बिनबोभाटपणे कळत असते.

म्हणजे हा प्रश्न भ्रष्टाचारी वृत्तीचा आहे, पद्धतीचा नव्हे. कोण्या एका पद्धतीने भ्रष्टाचार थांबेल असे मानणे हे एक तर भोळेपणाचे असेल अथवा मतलबीपणाचे तरी. तेव्हा, सध्याच्या परीक्षा ज्या त्या शिक्षक-विद्यार्थ्यांपुरत्या ठेवल्या तर तेवढ्यामुळे लगेच भ्रष्टाचार वाढेल, असे म्हणता येणार नाही.

दुसरे असे की, विकेंद्रित परीक्षांमुळे, खरे म्हणजे भ्रष्टाचारी कोण आहे व कोण नाही हे स्पष्ट होईल म्हणजे, ज्या परीक्षकाने पहिला वर्ग दिला त्याचा विद्यार्थी समाजाच्या व्यवहारात खणखणीत वाजला तर तो परीक्षक भ्रष्टाचारी नाही, असे उघड होईल. उलट ज्या परीक्षकाचे नाणे असे वाजणार नाही त्याने दिलेले प्राविण्याचे गुणदेखील भ्रष्टाचाराचे होते हे सरळपणे शाबीत होईल.

विकेंद्रित परीक्षापद्धती अमलात आल्यानंतर खरे-खोटे शाबीत व्हावयास तीन—चार वर्षे लागतील, पण खऱ्या—खोट्याची शाबिती होईल आणि समाजाला खऱ्याची निवड करण्याची संधी मिळेल हे महत्त्वाचे आहे.

इतर उत्पादनाच्या क्षेत्रांप्रमाणे शैक्षणिक उत्पादनाच्या क्षेत्रातही मक्तेदारी संपली पाहिजे. विकेंद्रीकरण सुरू झाले पाहिजे. निकोप स्पर्धा सुरू झाली पाहिजे तरच विविध प्रकारांचे आणि विविध दर्जांचे गुणी विद्वान समाजाला मिळतील. एरवी, सध्यासारखी ठोकळेबाज, पढिक यंत्रे मिळतील! ☐

सारांश, विद्यापीठाकडून परीक्षा काढून घ्याव्या. त्या त्या पदवीचे अध्यापन करणाऱ्या महाविद्यालयाकडे त्या द्याव्या. अमुक कॉलेजचा एम. ए. तमुक कॉलेजचा एम. ए. अशी स्पर्धा खुशाल व्हावी. जे जे अस्सल, ते ते या स्पर्धेत टिकेल व उजळून निघेल.

याने व्यावहारिक फायदे तरी किती होतील बघा.

एक : परीक्षा-फी रद्द होईल. विद्यापीठ केवळ या उत्पादनासाठी सध्या परीक्षा घेते. विद्यार्थ्यामागे ७५ रुपये फी. त्यातले सर्व मिळून परीक्षकांना जातात ६ किंवा ७ रुपये, बाकीचे उरतात विद्यापीठाच्या तिजोरीत. कशासाठी? तर एक स्वतंत्र नोकरशाही टिकविण्यासाठी!

दोन : प्रत्येक कॉलेज आपली वेगळी परीक्षापद्धती ठरवू शकेल. परीक्षा, निर्णय सारे वेळेवर पार पडू शकेल.

तीन : प्राध्यापकांचे अध्यापन-परीक्षा हे सारे काम नऊ महिन्यांत पुरे होऊ शकेल. परीक्षांसाठी त्यांना सुटी वापरावी लागणार नाही. या तीन महिन्यांच्या काळात त्यांना आपला व्यासंग निर्वेधपणे करता येईल.

चार : परीक्षकाचे वेतन केव्हा मिळणार या विवंचनेतून प्राध्यापक मोकळे होतील. कारण परीक्षकाचे असे वेगळे वेतन नव्या व्यवस्थेत नसेल. सर्वच्या सर्व प्राध्यापकांना याने वाईट वाटण्याचे कारण नाही. कारण सध्या परीक्षकपद मोजक्या, 'प्रयत्नशील' प्राध्यापकांनाच लाभत असते. मूठभर परीक्षकाच्या वेतनाऐवजी सर्व प्राध्यापकांच्या एकूण वेतनात वाढ करणे अधिक इष्ट व न्याय्य ठरेल. परीक्षाशुल्काने थोड्या प्राध्यापकाचा लाभ होतो. एकूण पगारवाढीने सर्व प्राध्यापकांचा लाभ होईल.

पाच : या उपऱ्या जबाबदारीतून विद्यापीठे मोकळी होतील आणि त्याचे खरे क्षेत्र जे पदव्युत्तर अध्यापन आणि संशोधन, त्या क्षेत्रातील कार्याला ती लागतील. विद्यापीठातील राजकारण एकदम कमी होईल. कुणी सांगावे, नाहीसेही होईल!

सहा : महाविद्यालये काय किंवा विद्यापीठे काय, या नव्या व्यवस्थेत अंग झाडून कामाला लागतील. स्पर्धेत टिकविण्यासाठी व आघाडी मिळण्यासाठी त्यांना असे अंग झाडून व अंग मोडून काम करावेच लागेल. कोणाकडेही उपरे काम उरणार नाही. स्वतःच्या क्षेत्रात भक्कम काम करावे, विद्वत्तेची खरी ऐट शोभिवंतपणे मिरवावी, असे त्यांना होईल.

मुख्य म्हणजे, दोन तत्त्वांची रास्तपणे अंमलबजावणी होईल. एक म्हणजे विकेन्द्रीकरण. दुसरे म्हणजे शैक्षणिक सुसंगती. विषय-विद्यार्थी—शिक्षक यांची एकदा गाठ पडल्यावर ती शिक्षण संपेतोवर कायम राहील. विद्यार्थी व शिक्षक याना विषयाबाबत व एकमेकाबद्दल जिव्हाळा वाटेल. शिक्षणक्रमात आज जी अभावानेच आहे ती निर्मितिक्षमता रुजेल आणि वाढीसही लागेल.

माझे मन हे स्वप्न नेहमी पाहात असते. ☐


वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

एक होता कार्व्हर

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

मूल्य : रुपये पंधरा

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

अवतीभवती । शरद कृष्णन

## □ आंध्र प्रदेशचे नवे मुख्यमंत्री

राज्यांच्या मुख्यमंत्र्याना आपण शक्यतो हात लावणार नाही, असे म्हणत म्हणत इंदिराजीनी तीन मुख्यमंत्र्यांना आपल्या पदावरून दूर केले आहे. या तिघांपैकी महाराष्ट्राचे अंतुले न्यायालयाने त्यांच्यावर ठपका ठेवल्यामुळे गेले, तर त्यापूर्वी सत्ताभ्रष्ट झालेले राजस्थानचे पहाडिया आणि आलीकडे सत्ताभ्रष्ट झालेले टी. अंजय्या हे प्रामुख्याने अकार्यक्षमता आणि भोंगळ कारभार यामुळे सत्ताभ्रष्ट झालेले मुख्यमंत्री आहेत. आंध्र प्रदेशातही इंदिरा कॉंग्रेस विधिमंडळ पक्षाचा नवीन नेता निवडताना जे प्रकार महाराष्ट्रात झाले तेच प्रकार पहावयास मिळाले. आंध्र प्रदेशात निवडणुकीच्या मार्गाने नेता निवडावा असा विचार होता; पण असा काही प्रस्ताव पुढे येईल अशी कोणालाच कल्पना नसल्याने सदस्यानीच या गोष्टीला विरोध केला आणि मग सर्वांनी इंदिराजीच्या नावाचा नारा लावून नेता-निवडीची जबाबदारी त्यांच्या शिरावर टाकली. मग संभाव्य नावांचे पेव जसे महाराष्ट्रातील नेता-निवडीचे वेळी फुटले होते तसेच पेव आध्र प्रदेशात फुटले आणि विद्यमान मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांचे नाव जसे अनपेक्षितरीत्या पुढे आले त्याचप्रमाणे आंध्र प्रदेशात भवनम वेंकटराम यांचे नाव पुढे आले. नवे मुख्यमंत्री विधिमंडळाचे सदस्यही नाहीत. त्याना सहा महिन्यांत विधानसभा अथवा विधानपरिषदेवर निवडून यावेच लागेल! वेंकटराम विधिमंडळाचे सदस्य नसले तरी त्यांच्या पत्नी जयप्रदा यानी मात्र गुंटूर जिल्ह्यामधील वेणुकोंडा मतदारसंघातून चार वेळा निवडणूक जिंकली असून जुन्या पी. व्ही. नरसिंहराव मंत्रिमंडळामध्ये ऊर्जामंत्री म्हणून एक वर्षाहून अधिक काळ काम केले आहे. मुख्यमंत्रीपदी विराजमान झालेल्या वेंकटराम यांना मंत्रीपदाचा थोडा-फार अनुभव आहे. १९७८ मध्ये चेन्ना रेड्डी मुख्यमंत्री असताना श्री. वेंकटराम हे त्यांच्या मंत्रिमंडळामध्ये शिक्षणमंत्री होते. ज्या वेळी ते मंत्री होते त्या वेळी त्यांच्या पत्नी विधानसभा निवडणुकीमध्ये पराभूत झाल्या होत्या. आपल्या पत्नीचा पराभव झाल्यामुळे दिलासा म्हणून आपल्याला मंत्रिपद दिले गेले, असे ते विनोदाने म्हणत असत. आपण कधी काळी आध्र प्रदेशचे मुख्यमंत्रीपद भूषवू शकू, यावर त्यांचा विश्वास बसला नसता; पण आता आपली निवड झाली आहे तेव्हा थोर नेत्या इंदिराजी यांना समाधान वाटेल अशाच पद्धतीने आपण काम करू, असा सुस्पष्ट खुलासा नवीन मुख्यमंत्र्यांनी रीतीला धरून केला आहे. सहकाऱ्यांची निवड करणे आंध्र प्रदेशात मोठे अवघड असते. त्यात अंजय्या यांनी तर जरा कोणी कुरकूर करू लागला तर त्याला मंत्रिपद बहाल करावे, अशी परंपरा निर्माण केल्याने अंजय्यामंत्रिमंडळ कोसळल्यावर बेकार मंत्र्यांचे काय करावे, हा मोठा प्रश्न होता. कारण मंत्रीपदाची चटक लागलेली व्यक्ती मंत्रीपद गेल्यावर ते मिळावे यासाठी नाना प्रकारची कारस्थाने करत राहते. त्याला यश येते असे नाही; परंतु काही ना काही उद्योग करत राहून ताप देण्याची क्षमता त्यापैकी काही जणांजवळ जरूर असते. आता नवीन मुख्यमंत्र्यांनी कितीही उदार धोरण स्वीकारले तरी अंजय्या-मंत्रिमंडळाचे तमाम मंत्री सामावून घेणे शक्यच नाही. तरी जास्तीत जास्त मंडळीना सामावून घेण्याकडेच नवीन मुख्यमंत्र्यांचा कल आहे. अर्थात निवड करताना राजकीय सोयी-गैरसोयीचा विचार झालाच. पंधरा मंत्रीगण घरी बसवण्यात आले. २९ जणांना सामावून घेण्यात आले. घरी बसवण्यात आलेल्यांमध्ये काही ज्येष्ठ मंत्रीही आहेत.

### मितभाषी व निश्चयी वृत्ती

श्री. वेंकटराम यांचा जन्म १८ जुलै १९३१ रोजी झाला. वेंकटराम हे गुंटूर जिल्ह्यामधील मुपाला या गावचे रहिवासी. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण गुंटूर येथील आंध्र ख्रिश्चन महाविद्यालयात झाले. सार्वजनिक व्यवस्थापनामधील एम. ए. ही पदवी संपादन केल्यावर त्यानी काही काळ अर्धवेळ प्राध्यापक म्हणून काम केले त्यानंतर त्यांनी कायद्याचा अभ्यासक्रम पूर्ण करून नागपूर विद्यापीठाची कायद्याची पदवी संपादन केली. महाविद्यालयीन जीवनातच त्यांनी राजकीय चळवळीमध्ये भाग घेण्यास प्रारंभ केला. १९५६ मध्ये ज्या वेळी कै. पंडित नेहरू हे नागार्जुनसागर धरणाचा पायाभरणी समारंभ करण्यास आले त्या वेळी या प्रकल्पाला विरोध असणाऱ्यांनी निदर्शने केली होती. त्यामध्ये वेंकटराम हे एक होते त्या वेळी त्यांना या निदर्शनात सहभागी झाल्याबद्दल अटकही झाली होती. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यानी आपल्या कुटुंबियांच्या परिचित असलेल्या जयप्रदा यांच्याशी विवाह केला. गोपाल रेड्डी मंत्रिमंडळामध्ये असलेल्या के. ओ. रेड्डी यांच्याकडे खाजगी सचिव म्हणून काम करण्यास प्रारंभ केला. त्यानंतर त्यानी क्रियाशील राजकारणामध्ये भाग घेण्यास प्रारंभ केला. त्यांची बायकोही राजकारणामध्ये रस घेत असल्याने आपली राजकीय वाटचाल अधिक सोपी झाली, असे वेंकटराम म्हणतात. वेंकटराम हे आज इंदिरा कॉंग्रेसमध्ये असले तरी मूळचे समाजवादी. कोणत्याही समाजवादी नेत्याजवळ तत्त्वज्ञानाच्याबाबतीत जो भोंगळपणा असतो तोच त्यांच्याजवळ असल्याने आपल्याला हवे ते करायचे आणि त्याला तात्त्विक मुलामा चढवायचा, ही समाजवाद्यांची हातोटी त्यांनाही साधली आहे. राजकीय चळवळीमध्ये भाग घेतल्याची किंमत त्यानाही मोजावी लागली आहे. आंध्र प्रदेशामधील विभक्तवादी चळवळीच्या वेळी गुंटूरमधील त्यांचे घर व खाजगी वाचनालय पेटवून देण्यात आले होते. या जाळपोळीच्या वेळी त्यांच्या पत्नी जयप्रदा राज्य मंत्रिमंडळामध्ये कॅबिनेट दर्जाच्या मंत्री होत्या.

बरोबरच्या कार्यकर्त्यामध्ये ते मितभाषी म्हणून ओळखले जात असले आणि अनेकाचे विचार शांतपणे ऐकून घेण्याची त्यांची वृत्ती असली तरी एखादा निर्णय निश्चित झाला असेल आणि तो समोरच्या माणसाला पटत नसेल तरीही त्याला अप्रिय वाटणार नाही अशा पद्धतीने त्याच्या गळी नकार उतरवण्याची हातोटी त्याना साधली आहे. जे त्याना जवळून ओळखतात ते असे स्पष्ट बोलून दाखवतात की, अंजय्या यांच्या तुलनेत त्यांचा कारभार निश्चित

जास्त उजंवा होईल. आज ते शक्तीशाली नेते नाहीत. परंतु मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन आणि हाती असलेल्या सत्तेचा कौशल्याने वापर करून पुरेसे शक्तिशाली बनण्याची क्षमता त्यांच्याजवळ जरूर आहे. राज्यामधील पक्षांतर्गत राजकारणामधील रस्सीखेच टाळली जावी यासाठीच त्याची निवड करण्यात आली आहे. पक्षामधील सर्व गटांना जास्तीत जास्त समाधानी ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न असला तरी केवळ मंत्रिमंडळामध्ये वेळोवेळी वाढ करून सर्वांना समाधानी ठेवता येते असे नाही, हे त्यांना अंजय्या यांना आलेल्या अनुभवाने कळून चुकले आहे. पक्षांतर्गत राजकारण पुरेसे दूषित आहे, असा त्यांचा दावा आहे. इंदिरा काँग्रेसमध्ये सत्ता संपादन करण्यासाठी वाटेल ते करण्याची तयारी असलेले आमदार असल्यामुळे त्यांना जबाबदारीनेच काम करावे लागणार आहे. या संदर्भात त्यांनी स्वतःच असे सांगितले की, ज्या वेळी मुख्यमंत्रीपदाबाबत चर्चा चालू होती अशा वेळी केंद्रीय नेत्यांशी चर्चा करण्यासाठी ते नवी दिल्ली येथे गेले होते. त्याचा मुक्काम दिल्लीमधील आंध्रप्रदेश गेस्ट हाउसमध्ये होता. अंजय्या याच्याजवळ असलेली काही आमदारमंडळी त्या वेळी दिल्लीत हजर होती. मुख्यमंत्रीपदाच्या चर्चेच्या संदर्भात आपल्याला बोलावून घेण्यात आले आहे, हे समजल्यावर या मंडळींनी त्यांची उदंड टिंगल-टवाळी केली. त्यांच्या तोंडावर त्याची मस्करी करण्यात आली. आणि ज्यावेळी त्याची मुख्यमंत्री म्हणून निवड झाल्याचे घोषित करण्यात आले त्या वेळी हीच सत्तेभोवती रुंजी घालणारी मंडळी अंजय्या यांची टिंगल-टवाळी करीत होती व वेंकटराम यांचा गुणगौरव सुरू झाला होता. त्यांनी अर्थात लगोलग दोनच दिवसांपूर्वी ही मंडळी काय बोलत होती याची जाणीव करून दिली. यापूर्वी सत्ता संपादन करण्यासाठी आणि मिळालेली सत्ता टिकविण्यासाठी इतके लांगूलचालन पूर्वी होत नव्हते. सर्व रूढ संकेत आणि लोकांच्या अपेक्षा बाजूला ठेवून नेते सत्तेकडे धावताना दिसतात. त्याचे हे विचार पाहिल्यावर निदान कोणत्या वातावरणामध्ये आपल्याला काम करावे लागत आहे, याची पुरेपूर जाणीव त्यांना आहे असे म्हणावे लागेल. आपल्याजवळ राजकीय भोंदूपणा नाही, असाही त्यांचा दावा आहे. ते म्हणतात, जर एखादी गोष्ट संबंधिताला तोंडावर सांगता येत नसेल तर ती गोष्ट त्याच्या परोक्ष मी बोलणार नाही. इतपत संकेत मी जरूर पाळतो.'

श्री. वेंकटराम म्हणाले, मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी सांभाळताना आपल्याला आपल्या पूर्वानुभवाचा भरपूर उपयोग होईल. शिक्षणमंत्री असताना त्यांनी जे महाविद्यालयीन शिक्षणविषयक बिल सादर केले होते ते चांगलेच गाजले. गृहामध्ये त्या वेळी दिवसभर त्या बिलाबाबत चर्चा झाली. डाव्या कम्युनिस्ट पक्षाचे नेते पी. सुदरय्या यानी त्या बिलामधील काही चांगल्या कलमांची मुक्तपणे तारीफ केली होती. तर काही दुय्यम त्रुटी दाखवून, बिल परिपूर्ण करावे, अशी मागणी केली. श्री. वेंकटराम यांनी सादर केलेले ते बिल बऱ्याच वादविवादानंतर मंजूर झाले. वेंकटराम आपल्या राजकीय वाटचालीचे श्रेय व्यक्तीला न देता तत्त्वज्ञानाला देतात. त्यांचे तत्त्वज्ञान आज इंदिराजीना पर्याय नाही, असे सांगत असल्याने ते विनोदाने आर्युविमा व इंदिराजी यांना पर्याय नाही, असे म्हणतात. इंदिराजी जो राजकीय विचार देतात तो मान्य असल्यानेच आपण त्यांचा पाठपुरावा करतो, असेही ते आग्रहाने सांगतात. मुख्यमंत्रीपदाच्या स्पर्धेत असलेल्या मातब्बर राजकीय नेत्यांना बाजूस सारून त्यांची निवड झाल्याने त्यांचे मंत्रिमंडळ फार काळ टिकणार नाही, परंतु आता विधानसभेची मुदतच अल्पकाळ असल्याने त्यांना हलवले जाणार नाही, असे काही ज्येष्ठ नेत्यांचे मत आहे. संबंधित राज्यांचे जे नेते केंद्रस्थानी मंत्री म्हणून आहेत त्यांच्या मताला फारशी किंमत न देता, आपल्याला सोयीस्कर ठरेल अशा पद्धतीने इंदिराजी राज्यामधील नेतृत्वात बदल करत आहेत. केंद्रस्थानी असलेल्या नेत्यांचे सामर्थ्य मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीने ही बाब इंदिराजीना आवश्यक वाटते. आंध्र प्रदेश मुख्यमंत्रीपदाच्या स्पर्धेत असलेले एक शक्तिशाली नेते श्री. ओमा प्रभाकरराव यांनी श्री. वेंकटराम यांच्या निवडीवर मोठे मजेशीर भाष्य केले आहे. ते म्हणतात, 'फुटबॉलच्या खेळीमध्ये एखादा चतूर खेळाडू, चेंडू बराच वेळ खेळवत शत्रुपक्षावर मात करत गोलकक्षेत येतो. तेथे त्याची कोंडी झाल्यावर काहीशा अनपेक्षितपणे मोकळ्या दिसणाऱ्या खेळाडूकडे तो झटकन चेंडू देतो आणि हा खेळाडू मग गोल करून मोकळा होतो. श्री. वेंकटराम हे या पास स्वीकारणाऱ्या खेळाडूप्रमाणे आहेत. मात्र आता ते मोक्याच्या जागी असून मर्यादित काळ समोर असल्याने त्यांचे काम सोपे आहे. अगदी निवडणुकीच्या वेळी त्यांच्या मताला किती मान दिला जातो, यावर पुढील गोष्टी अवलंबून आहेत.

## □ घटस्फोट कायद्यात सुधारणा

पती—पत्नीचे जर पटत नसेल तर त्यांनी सतत भाडत एकत्र राहण्यापेक्षा अलिप्त राहून नंतर वेगळे होण्यातच त्यांचे हित आहे, असे माजी कायदामंत्री श्री. पी. शिवशंकर यांचे ठाम मत असल्यामुळे घटस्फोट सुलभ करणाऱ्या काही सुधारणा असलेले एक दुरुस्ती विधेयक त्यानी गेल्या वर्षी लोकसभेत सादर केले. अनेक महिला संघटनांकडून त्या दुरुस्तीला विरोध झाल्याने त्याचे कायद्यामध्ये परिवर्तन होईलच असे नाही; परंतु त्या निमित्ताने घटस्फोटाचा विषय पुन्हा एकदा चर्चिला गेला आहे. त्या स्वरूपातही घटस्फोटाचा कायदा सुलभ आहे आणि ज्याचे खरोखरच पटत नाही त्यांना शक्य तितक्या लवकर मोकळे होण्याची मुभा या कायद्यान्वये उपलब्ध आहे. अर्थात या कायद्याचे स्वरूपही असे आहे की, पती—पत्नीनी विभक्त राहून तीन वर्षे गेल्यानंतरच घटस्फोट मिळणे शक्य होते. म्हणजेच एकमेकाशिवाय राहून वाटचाल सुरू झाल्यावरच कायदा या फारकतीची खातरजमा करून घेऊन दोघानाही मोकळीक देतो. घटस्फोटाचे प्रमाण वाढत असले तरी घटस्फोटित व्यक्तीला अजूनही समाजात झटकन मान्यता मिळत नाही. घटस्फोटित व्यक्ती पती असो का पत्नी, त्याना दुसरा संसार उभा करणे अतिशय अडचणीचे असते. न्यायालयासमोर आलेल्या खटल्यांवर नजर टाकली तर असे दिसते की, सामान्यतः या बाबतीत पुरूषालाच पुढाकार घ्यावा लागतो. कित्येक वेळा पत्नी घटस्फोटाच्या खटल्यामध्ये न्यायालयाला सामोरे जाणे कमीपणाचे समजते आणि खटला एकतर्फी निकाली होऊन पुरुषाला घटस्फोट दिला जातो. पती आणि पत्नी या दोघांचेही पटत

नसूनही प्रथम न्यायालयात कोणी धाव घ्यावी याची वाट बघत दोघेही काही काळ जाऊ देतात. संसार मोडल्याचे खापर आपल्यावर नको, अशी भावना त्यामागे असते. परदेशामध्ये घटस्फोटासाठी जी हास्यास्पद कारणे सांगितली जातात तशी कारणे आपल्याकडे पहावयास मिळत नाहीत. आपल्याकडील घटस्फोटांच्या खटल्याचे वैशिष्ट्य हे की, सर्वसाधारणपणे आठ-दहा वर्षे झाल्यानंतर लग्न बंधनातून मुक्त होऊ पाहणाऱ्या व्यक्ती जास्त दिसतात. घरच्यांचे व पत्नीचे पटत नाही, मुलांच्या संगोपनावरून तंटेबखेडे होतात, नोकरी करणे अथवा न करणे यावरून वादविवाद होतात, कबूल केलेला हुंडा दिला नाही, यासारखी कारणे असतात, तर कित्येक प्रकरणात सासू व सून याचे संबंध हे घटस्फोटाचे कारण असते, पती अथवा पत्नी व्यभिचारी असल्यामुळे जे खटले न्यायालयासमोर येतात त्याचे प्रमाण अत्यल्प असते. प्रत्यक्षात वस्तुस्थिती तशी असली तरीही संबंधित बाजूचे वकील आपल्या पक्षकारास हे कारण पुढे करून देत नाहीत. कारण अशी प्रकरणे न्यायालयात सिद्ध करणे फार अवघड असते. खेरीज, संबंधितांना जर मूल असेल तर अशा प्रकाराची वाच्यता होणे ही हितावह नसते. हिंदु विवाह कायद्याप्रमाणे पुत्रप्राप्ती होत नसेल तर अथवा दोघांपैकी एक नपुसक असेल तर घटस्फोट मिळू शकतो. खेरीज, क्रूरपणाची वागणूक देणे, सतत छळवणूक करणे यासारख्या कारणांसाठीही घटस्फोट मिळू शकतो. दोघांची जर संमती असेल तर कायदेशीर विभक्तीकरणानंतर लगोलग घटस्फोट मिळू शकतो. सध्या देशामधील निरनिराळ्या न्यायालयासमोर घटस्फोटाचे तीन हजाराहून जास्त खटले चालू आहेत. घटस्फोटाच्या वाढत्या प्रमाणाबद्दल आणि घटस्फोटित पत्नीला कायद्याप्रमाणे जे आर्थिक सहाय्य द्यावे लागते त्यामध्ये संबंधित व्यक्तीकडून जी हेळसांड केली जाते त्याबद्दल अनेक महिला संघटनांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. खेरीज संसार अर्ध्यावर उधळला गेल्यामुळे स्त्रीला केवळ आर्थिक मदतीची पूर्ती करून जबाबदारी संपते असे मानणे बरोबर नाही, असे या सघटनांचे मत आहे. कारण घटस्फोटित पत्नीची मानसिक अवस्था व सामाजिक स्थान यांनाही जबर तडाखा बसतो. अर्थात या घटना अपरिहार्य आहेत, हेही नमूद करण्यात आले आहे. घटस्फोट कायदा अधिक सुलभ करण्यास महिला संघटनांनी तीव्र विरोध दर्शवला आहे.

## □ भारतीय क्रिकेट संघाचा इंग्लंड दौरा

इंग्लिश संघाचा भारतीय दौरा कितीही कंटाळवाणा झाला असला तरी या दौऱ्यात खेळल्या गेलेल्या मालिकेमध्ये भारतीय संघाने आपले श्रेष्ठत्व वादातीतपणे सिद्ध केले. श्रेष्ठ संघाने मालिका जिंकली ही वस्तुस्थिती बोचरी वाटल्याने इयान बोथमने काहीही फजूल कारणे देऊन या मालिकेमधील आपल्या संघाच्या अपयशाचे समर्थन केले आहे. इतकेच नव्हे तर भारतीय संघाचा जो दौरा त्या वेळी निश्चित करण्यात आला होता, त्या संदर्भात बोलताना तो म्हणाला की, इंग्लंडमध्ये येणाऱ्या भारतीय संघाचा आपण ३–० असा पराभव करू. इंग्लिश खेळाडूंच्या कुचक्या स्वभावाला अनुसरून त्याने या पराभवाच्या संदर्भात आपली प्रतिक्रिया नोंदली असली तरी केवळ सामन्याची आकडेवारी पुरेशी बोलकी आहे, असे मत सुनील गावसकरने नोंदवून आणि बोथमच्या अन्य मुद्यांचा परामर्ष घेऊन चोख उत्तर दिले होते. दरम्यान द. आफ्रिकेबरोबर न खेळण्याची आपली सारी आश्वासने मातीमोल करून बायकॉट आणि कंपनीने द. आफ्रिकेबरोबर क्रिकेट-सामने खेळल्याने भारतीय संघाच्या आगामी दौऱ्यावर पुन्हा एकदा ढग झाले असून भारत सरकारने हा दौरा रद्द केल्यास आपल्याला मुळीच आश्चर्य वाटणार नाही, अशी प्रतिक्रिया भारतीय संघाचा कर्णधार सुनील गावसकर याने व्यक्त केली असून ब्रिटिश सरकारने या दौऱ्याबाबत जे बोटचेपे धोरण स्वीकारले आहे त्यावर त्याने टीका केली आहे. ज्यांच्या क्रिकेट-भवितव्याबद्दल मोठ्या अपेक्षा आहेत अशा खेळाडूंनी या वादग्रस्त प्रकरणात पडावयास नको होते, असे मतही त्याने नोंदले आहे. आहे या परिस्थितीत द. आफ्रिकेबरोबर खेळणारे खेळाडू जर भारतीय संघाबरोबर खेळवले जाणार असतील तर हा दौरा मार्गी लागेल असे वाटत नाही. या खेळाडूंना वगळण्याची अट इंग्लंड मान्य करणार नाही आणि इंग्लंडने समजा हे मान्य केलेच तरीसुद्धा दुय्यम अथवा तिय्यम दर्जाच्या संघाबरोबर मालिका खेळण्यात भारताला गोडी वाटणार नाही. बहुधा हा दौरा रद्द होईल असेच वाटते. तसे झाल्यास देशांतर्गत क्रिकेट-स्पर्धांवर आपल्या खेळाडूंना अधिक लक्ष केंद्रित करता येईल. □


# टॉलस्टॉय – एक माणूस

दुसरी आवृत्ती

## लेखिका : सुमती देवस्थळे

**किंमत : ५५ रुपये**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०

# जोश मलिहाबादी

अविनाश सहस्रबुद्धे

प्रख्यात उर्दू कवी जोश मलिहाबादी ह्याचे मंगळवार दि. २२ फेब्रुवारी रोजी इस्लामाबादेत वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाले. 'शायर–ए–इन्किलाब' म्हणून ओळखले जाणारे कवी जोश याचे मूळ नाव शबीर हसनखान जोश असे होते. १९५६ साली ते भारत सोडून पाकिस्तानला गेले व तिथेच स्थायिक झाले. 'आजकल' ह्या उर्दू दैनिकाचे ते काही काळ संपादकही होते. पाकिस्तानात स्थायिक झाल्यावरही ते अधूनमधून भारतात येत असत. त्याना आपल्या जन्मभूमीची विलक्षण ओढ वाटत असे. त्यांनी लिहिलेल्या आत्मचरित्राच्या ओळीओळीतून ही ओढ व्यक्त होते.

जोश यांची कविता ही 'क्रांती'ची कविता होती. त्याच्या प्रारंभीच्या कवितेत साम्राज्यवादी ब्रिटिश सरकारविरुद्ध, दडपशाहीविरुद्ध सुरू असलेल्या लढ्याचे चित्र उमटलेले दिसते. नंतरच्या त्यांच्या कवितेत क्रांतीची कल्पना अधिक व्यापक झालेली दिसते. त्यांच्या नावावर एकूण पंधरा पुस्तके आहेत. त्यातील 'नक्श निगार', 'रूही अदब' व 'शोला और शबनम' या तीन कवितासंग्रहांना विशेष लोकप्रियता लाभली.

जोश मलिहाबादीचे आत्मचरित्र 'यादों की बारात' पाकिस्तानात प्रसिद्ध होताच पाकिस्तानभर त्या पुस्तकाने वादळ उठवून दिले. त्यांच्याविरुद्ध निदर्शनं झाली, मोर्चे निघाले. शेवटी पाकिस्तान सरकारने पुस्तकाच्या प्रती जप्त करून त्यावर बंदी आणली. पण त्याचा परिणाम पुस्तकाची लोकप्रियता वाढण्यातच झाला. भारतात त्याचा हिंदी अनुवाद प्रसिद्ध होताच इथेही त्या पुस्तकाला प्रचंड लोकप्रियता मिळाली. त्याच्या आवृत्त्या निघाल्या. ह्या पुस्तकात भारतातील आठवणीचे प्रसन्न चित्र जसे आहे तसेच पाकिस्तानात त्यांना आलेल्या कटु अनुभवांचे प्रांजळ वर्णनही त्यांनी केले आहे. पुस्तकावर वादळ उठले त्याचे कारणही तेच होते. पुस्तकातला सर्वात हृद्य भाग हा बालपणीच्या आठवणीचा व नेहरूंसमवेत त्यांनी घालवलेल्या काळाचा, मैत्रीचा आहे. आपल्या या आत्मचरित्राबद्दल त्यानीच सांगितले आहे की, जवळजवळ सहा वर्षं ते या लेखनात गढून गेले होते. दीड वर्षानंतर त्याचा पहिला खर्डा तयार झाला, तो त्यांनी फाडून रद्दीत टाकला. दुसरा खर्डाही त्यांच्या पसंतीस उतरला नाही. तोही फाडून टाकला. शेवटी आणखी दोन–तीन वर्षं खपून त्यांनी तिसऱ्यादा लिहून जेव्हा ते पूर्ण केले तेव्हाच प्रसिद्धीला दिले. पण पुस्तक छापून झाल्यावर त्यांनी जेव्हा वाचले तेव्हा त्यांना वाटले यात अजूनही काही सुधारणा केल्या पाहिजेत. म्हणून त्यांनी ती आवृत्तीच्या आवृत्ती प्रकाशकाला रद्द करायला लावली व शेवटी त्याचा चौथा खर्डा छापून झाला तेव्हाच ते संतुष्ट झाले.

लखनौपासून तेरा मैल दूर असलेल्या मलीहाबाद गावी जोश यांचा जन्म झाला १८९६ किंवा १८९८ साली. आजीने जन्माचं नक्की कोणतं वर्ष त्यांना सांगितले होते हे त्यांना आठवत नाही. स्वतःच्या स्मरणशक्तीबद्दल आत्मचरित्राच्या सुरवातीलाच त्यांनी सांगितलेला किस्सा फार मजेशीर आहे.

एकदा रात्री चांदण्यात भटकत भटकत ते घरापासून खूप लांबवर गेले आणि परत येताना रस्ता विसरले. घर सापडेना. शेवटी त्यांनी एकाला थांबवून आपल्या घराची साधारण खूण सागून कसे जायचे विचारले. तेव्हा त्या इसमाने विचारले, 'तुम्हाला जोश साहेबाच्या घरी जायचंय का?' यांनी हो म्हणताच त्याने कसे जायचे ते समजावून सांगितले आणि हे एकदाचे घरी पोहोचले.

आत्मचरित्राच्या प्रारंभीच्या भागात जोश यांनी त्यांच्या बालपणीच्या काळातले फार वेधक चित्र रंगवले आहे. तो काळच त्यानी उभा केला आहे. त्या वेळचे लखनौमधले वातावरण, त्या शहरावरची नबाबी छटा, जोश यांचं भलं मोठं कुटुंब, वडिलांचा दरारा, घरातलं खानदानी वळण व वैभव, जहागिरीचं गाव व तिथले लोक, त्याचे शाळेतले अनुभव, त्या लहान वयातच त्यांना छोट्या छोट्या प्रसंगातून जाणवलेली समाजातील विषमता, दुःखं या साऱ्या साऱ्याचं चित्र त्यांनी रेखाटलं आहे. घरातलं वातावरण सगळं जमिनदारी वळणाचं, सरंजामशाहीच्या खुणा अंगावर मिरवणारं. त्याचा परिणाम लहान मुलावरही कसा व्हायचा व जातपात, आर्थिक भेदभाव यांचे संस्कार कसे व्हायचे हे त्यांनी अनेक प्रसंगांतून सागितलं आहे.

एकदा ते घराबाहेरच्या आवारात उभे होते, हातात छऱ्यांची बंदूक घेऊन. तेवढ्यात गावातील न्हाव्याचा मुलगा त्याच्या समोरुन गेला व त्याने याना सलाम केला नाही. चिडून त्यानी त्याच्यावर बंदूक झाडली. नेम त्याच्या पाठीवर लागला व तो मुलगा कळवळून जमिनीवर पडला. तरीही जोशना त्याची दया आली नाही व त्यांनी त्याला लाथेने मारून सलाम करायला लावला.

लहानपणचे हे सरंजामी संस्कार खानदानी श्रीमंती व वर्षानुवर्षं घराण्यात चालत आलेली जमीनदारी याच्यातून झाले होते. असे असूनही याच वयात ते कुटुंबातील इतर व्यक्तीपेक्षा वेगळा विचार करू लागले होते, असेही दिसते. घरातल्या एका नोकराकडे मुलीचं लग्न करायला पैसे नाहीत, हे समजल्यावर त्याला देण्यासाठी आईच्या सोन्याच्या हाराची त्यांनी केलेली चोरी किंवा सावकारी कर्जामुळे एक गरीब शेतकरी सारा भरू शकत नाही हे कळल्यावर त्याच्यासाठी वडिलाकडे त्यानी केलेली रदबदली इत्यादी प्रसंगातून धनाढ्य कुटुंबात वाढूनसुद्धा गरीब, शोषितांबद्दल त्याना त्या लहान वयातही वाटत असलेला कळवळाच पुढे त्यांना कवितेतून या शोषित वर्गाकडे घेऊन गेला.

जोश मलिहाबादीचे शिक्षण सीतापूर, लखनौ, अलिगढमध्ये झाले. वयाच्या नवव्या वर्षीच ते 'शेर' लिहू लागले. घरी कट्टर धार्मिक वातावरण असल्यामुळे शेरो-शायरीला बंदीच होती, तरीही ते चोरून वेळ मिळेल तेव्हा 'शेर' लिहायचे. एक दिवस त्यांचे ते बाड वडिलांच्या हातात पडले आणि त्यांना मारही खावा लागला; परंतु कवितेवरचे उत्कट प्रेम व जाण पाहून वडिलांनीच त्यांना 'शेर' लिहायची परवानगी दिली. नंतर जोश सर्वप्रथम मुशायरात सामील झाले ते वडिलांबरोबरच. तिथे वडिलांपेक्षाही जोशने म्हटलेले शेर लोकानी डोक्यावर घेतले. श्रोत्यांकडून त्याना उत्स्फूर्त दाद मिळत गेली. त्यावर वडिलांनी त्यांना मुशायरा

संपल्यावर गंमतीने म्हटलेही की, 'बेटा, तू माझ्यापेक्षा मोठा व्हावास, तुझं नाव सर्वत्र व्हावं, तू माझ्याहून अधिक पैसा मिळवावास, श्रीमंत व्हावंस मला मनापासून वाटतं; परंतु कवितेच्या क्षेत्रात तू माझ्यापेक्षा वरचढ ठरावास हे मला कदापि सहन होणार नाही. ही उलटी गंगा मी माझ्या घरात वाहू देणार नाही !'

जोश तरुण असतानाच देशात स्वातंत्र्य-चळवळीचे वारे वाहू लागले होते. विजेच्या लखलखाटासारखे साऱ्या देशात चैतन्य सळसळत होते, असे त्यांनी त्या काळचे वर्णन केले आहे. जोशही स्वातंत्र्य-चळवळीत हिरीरीने सामील झाले. काँग्रेसचे कार्यकर्ते झाले. राजकीय चळवळीतील मोठमोठ्या नेत्यांच्या सहवासात आले. गांधींची त्यांची पहिली भेट झाली त्याविषयी त्यांनी म्हटले आहे, 'गांधींना पाहिल्यावर हा फाटका, ओबडधोबड चेहऱ्याचा माणूस देशाला कसले स्वातंत्र्य मिळवून देणार, असा विचार माझ्या मनात आला ! पुढे हेच जोश गांधीजींचे अनन्यसाधारण भक्त झाले. गांधींनी त्यांच्या आयुष्यातील काही वर्षे भारून टाकली होती. स्वातंत्र्य-चळवळीत जोश यांनी जे काही काम केले त्यामागची प्रेरणा त्यांना गांधींकडूनच मिळाली होती. भारतीय जनतेच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षेला त्यांनी आपल्या कवितेतून शब्दबद्ध केले–

अलअमानो – अलहजर मेरी
कड़क मेरा जलाल
खून, सफ्फाकी, गरज,
तूफान, बरबादी, क़िताल
बरछियाँ, भाले, कमाने,
तीर, तलवारे, कटार
बरकी, परचम, अलम,
घोडे, पियादे, शहसवार
आँधियों से मेरी उड जाता है
दुनिया का निज़ाम
रहम का अहसान है
मेरी शरीअत में हराम
मौत है ख़ूराक मेरी,
मौत पर जीती हूँ मैं
सेर होकर गोश्त खाती हूँ,
लहू पीती हूँ मैं
(बगावत)

अशा त्यांच्या कवितांमधून पारतंत्र्यातील


# वपु
# वन्स मोअर



वपु काळे यांच्या
कथाकथनाच्या
कॅसेटस्‌नी मनोरंजनाचं
एक नवं दालन उघडलं
या कॅसेटस्‌नी केवळ महाराष्ट्रातच किंवा
परप्रांतातच नव्हे तर, घरापासून कित्येक मैल दूर असलेल्या
सैनिकांच्या छावणीत मराठी मनाला खुलवलं. आणि,
परदेशात स्थायिक झालेल्या अनेक मराठी घरात
अशी बहार उडवून दिलीय की, वपुंच्या कथाकथनाच्या
या सीमोल्लंघनावरचीच कथा व्हावी !
वपुंच्या चाहत्यांनी वारंवार केलेली मागणी
दोन कॅसेटस्‌नी आज पुरी होतेय.

| कथा AA 111 | कथा AA 112 |
| --- | --- |
| वन फॉर द् रोड, वंदना सामंत, हेअर स्टाईल, पांचवारी सातवारी, | जे. के. मालवणकर, पेन सलामत तो, इन्फेक्शन. |
| रु./५०- ९० मिनिटे | रु./५०- ९० मिनिटे |

PROGRAF

## अलूरकर म्युझिक हाउस
४, स्वप्ननगरी, कर्वे रोड, पुणे-४११००४. फोन ३०६६२, ३२९१०.

सर्व प्रमुख पुस्तक व रेकॉर्डस् विक्रेत्यांकडे उपलब्ध.

### अधिकृत प्रमुख विक्रेते :

**मुंबई :** जी. जे. घैसास आणि कं., गिरगांव. जयहिंद इलेक्ट्रॉनिक्स, नवजीवन सोसायटी. रेडिओ पॅलेस, गिरगांव. ऑडिओ सेल्स कॉर्पोरेशन. **ठाणे :** सौ. कविता द्रविड. **पुणे :** व्हीनस म्युझिकल हाउस, लक्ष्मीरोड. रोहित एंटरप्राइझेस, पुणे–१. मॅजेस्टिक बुकस्टॉल. **सातारा :** देवकुळे वॉच कंपनी. **सांगली :** एशियन रेडिओ. **कोल्हापूर :** पाठक ॲण्ड सन्स. ईगल रेडिओ हाउस, अजब पुस्तकालय. **सोलापूर :** वैशाली रेडिओ. **बेळगाव :** नवसाहित्य. **गोवा :** व्ही. पी. सिनारी, पणजी. **नागपूर :** ए. डी. इलेक्ट्रॉनिक्स, सितावर्डी. **नासिक :** एस्. एम्. देव. **औरंगाबाद :** नरीमन ॲण्ड सन्स. **वर्धा :** आर. के. इलेक्ट्रॉनिक्स. **जळगाव :** स्वरविहार. **इंदोर :** विनिता एंटरप्राइझेस. **लातूर :** लातूर फोटो स्टुडिओ. **धुळे :** साहित्यवितरण. **अहमदनगर :** आर्. टी. कराचीवाला. **हैद्राबाद :** कालिदास रेडिओज.

गुलामगिरी, ब्रिटिशांची दडपशाही, स्वातंत्र्य-आंदोलनासाठी जनतेने दिलेली कुर्बानी यांचे प्रभावी चित्रण होत होते.

जोश यानी काही काळ हैद्राबादला उस्मानिया विद्यापीठातही अनुवादक म्हणून काम केले होते. याच काळात त्यांनी फारशी व इंग्रजी साहित्याचा, तत्त्वज्ञानाचा पद्धतशीर अभ्यास केला. फारशी भाषेतील दोन महान कवी उमर खय्याम व हाफिज यांच्या साहित्याचा त्यांच्यावर विशेष प्रभाव पडला. मिल्टन, बायरन व रूसो, नित्शे यांनीही त्यांना प्रभावित केले. हैद्राबादच्या या नोकरीत ते फार काळ टिकू शकले नाहीत. निजामाच्या अवतीभवती जे खुशमस्करे सदोदित असायचे त्यांच्या सहवासात ते फार काळ राहूही शकले नसते. त्याना निजामाची हांजी हाजी करणे तर कधी जमले नाहीच; उलट त्यांनी या खुशमस्कऱ्यावर व निजामावर एक कविता लिहिली व ती कविताच त्याची नोकरी जायला कारणीभूत ठरली ! निजामाने जोशने 'माफी मागावी' असा निरोप पाठवला. जोश यांनी नकार दिला व हैद्राबाद सोडून ते दिल्लीला गेले. तिथे सरोजिनी नायडूंनी आर्थिक मदत करण्याचे आश्वासन दिल्यावर त्यांनी ' कलीम ' नावाचे नियतकालिक काढले. ब्रिटिश सरकारचा विरोध, स्वातंत्र्यचळवळीचा पुरस्कार व समाजवादाचा प्रसार हे या नियतकालिकाचे धोरण होते. त्यामुळे मुस्लिम लीगशी त्यांना शत्रुत्व पत्करावे लागले, पण त्यालाही त्यानी धीराने तोंड दिले. पुढे त्यानी ' कलीम ' बंद केल्यावर मजाज् व अली सरदार यांनी ' नया अदब ' नावाने ते सुरू केले.

पं. नेहरू व सरोजनी नायडूशी जाश यांचे फार घनिष्ठ, मैत्रीचे संबंध होते. पंडितजींनी त्यांना पुन्हा पुन्हा पाकिस्तानात न जाण्याची विनंती केली होती. जोश भारत सोडून जाणार नसतील तर त्यांच्या उपजीविकेसाठी मोठी जमीन देण्याचे आश्वासनही दिले होते; परंतु पंडितजीचे न ऐकता जोश पाकिस्तानला निघून गेले. नंतर त्यांना त्याचा पश्चात्ताप झाला. पाकिस्तानात त्यांना आर्थिकच नव्हे तर मानसिकही खूप त्रास झाला. तिथे त्यांना 'गद्दार', ' भारताचा एजण्ट' ही म्हटले गेले. त्याची अवहेलना केली गेली. शेवटी कंटाळून त्यांनी कराचीहून प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमानपत्रात जाहीर करून टाकले, ' मी आता उरलेले दिवस सर्व क्षेत्रातून निवृत्त होऊन एकान्तवासात घालवू इच्छितो. तेव्हा लोकांनी आता मी जिवन्त आहे की मृत्यू पावलोय याचीही दखल घेऊ नये. मी कवी आहे, हेही लोकानी विसरून जावे.' त्यांना आपल्या अखेरच्या दिवसांत सरोजिनी नायडूचे शब्द वारंवार आठवायचे. त्यानी जोशना, त्यांनी पाकिस्तानात जाण्याचा निर्णय घेतल्यावर सांगितले होते की, भारतातील हिंदू तुम्हाला मुसलमान म्हणून तुमची निन्दा करतील, तर पाकिस्तानी मुसलमान तुम्हाला काफिर म्हणून हिणवतील.' सरोजिनी नायडूंचे हे भाकित तंतोतंत खरे ठरले.

जोश यांची अखेरीची वर्षं दु:ख, बेचैनी, अस्वस्थता यांच्यातच गेली. सर्व प्रकारचे सार्वजनिक संबध तोडून एकांतातले आयुष्य यांनी स्वीकारले होते.

प्रखर स्वाभिमानी वृत्ती व फटकळपणाकडे झुकणाऱ्या स्पष्टवक्तेपणामुळे जोशना आयुष्यभर चटकेच बसले. भ्रमंतीही खूप झाली. त्यांच्या संवेदना, भावना आणि प्रेरणा इतक्या उत्कट व मनस्वी होत्या की, कोणत्याही भूमिकेत ते दूरस्थ किंवा तटस्थ राहूच शकत नसत. त्यातून कटु प्रसंग निर्माण होत. शत्रूची संख्या वाढे. जोशना एखादी व्यक्ती आवडली की आवडली; नावडली की नावडली! विचारातसुद्धा तसेच सीमेचे प्रेम आणि सीमेचा राग, सीमेची आत्मीयता आणि सीमेचा दुरावा या टोकामध्येच त्याचे मन फिरत असे. त्यामुळेच त्यांच्या तीव्र बुद्धीचा, खानदानी बाण्याचा व विलक्षण लहरी, अहंकारी स्वभावाचा जबरदस्त फटका जसा काहीनी अनुभवला होता तसेच त्यानाही बरेच आघात झेलावे लागले. वादळ उठवणारे प्रसंग निर्माण झाले, परंतु त्यांची स्वाभिमानी वृत्ती किंचितही वाकली नाही!

जोश यांच्या कवितेतील जाणीव ही सामाजिक तर आहेच, परंतु ती अधिक जीवनगामी आणि खऱ्या अर्थाने विद्रोही आहे. उर्दू कवितेला ज्या कवींनी विद्रोहाची देणगी दिली त्यांच्यात जोश यांचे स्थान विशेष महत्त्वाचे आहे. म्हणूनच क्रांतीची, आमूल परिवर्तनाची आणि या संदर्भातच अंतर्मुख कविमनाची भावस्वप्ने त्यांच्या कवितेत खोदली गेली आहेत. प्रचंड आशावाद उरात घेऊन जगलेला हा कवी आहे. स्वातंत्र्य-चळवळीच्या संदर्भात त्यांनी लिहिलेल्या कवितांमधून मानवमुक्तीच्या निष्ठेने एखादे मन किती व्याकुळ, अंतर्मुख पण तितकेच प्रखर, लढाऊ व विद्रोही होऊ शकते हे दिसते. आपल्या कवितेतून त्यांनी भारतीय जनतेला ब्रिटिश सरकार व साम्राज्याविरुद्ध लढायची, संघर्ष करण्याची प्रेरणा दिली. इतकेच नव्हे तर परंपरा, धार्मिक असहिष्णुता, अंध विश्वास, शोषण यांच्या विरुद्धही या कवितेने विद्रोह पुकारला व जीवनातील विसंगती, विषम यांचे दर्शन घडविले. स्वातंत्र्यानंतरच्या, फाळणीनंतरच्या भ्रमनिरासाच्या अनुभवाचे चित्रणही त्यांच्या काही कवितांमधून स्पष्टपणे जाणवते.

जोश यांची संवेदनशक्ती मूलत:च बहुपेडी असल्यामुळे त्यांच्या कवितेतून कवी मनातील संमिश्र भावभावनाची विविधांगी रूपे पहायला मिळतात. म्हणूनच त्यांच्या प्रेमकवितानाही स्वतंत्र रूप-रंग आहे. जोश यांचे इतर कवितांमधून दिसणारे व्यक्तिमत्वच त्यांच्या प्रेमकवितांमधूनही दिसते. त्यामुळेच ती सांकेतिक किंवा भावविवश न होता प्रेमानुभव हा त्यांच्या एकंदर अनुभवाचाच भाग आहे, हे जाणवते. शरीरप्रेमाबद्दल खुलेपणाने बोलतानाही त्यांची कविता संकोचत नाही. थोडक्यात, जोश यांची कविता ही नुसतीच क्रांतीची, विद्रोहाची कविता नाही, तर ती अनेक पदरी अनुभवांनी संपन्न असलेली कविता आहे. क्रांतीविषयक त्यांच्या कवितांमधूनही काही वेळा रोमँटिक ध्येयवाद डोकावतो, त्याचे कारणही हेच आहे. त्याची राजकीय कविताही अपक्षीयच आहे. क्रांतीची मूलगामी कल्पना जरी ती मांडत असली तरी जोश साम्यवादी होते, असे विधान त्याची कविता वाचून करता येत नाही. त्यांच्या 'ध्येयवादी' कवितेला विशिष्ट पक्षाची बधने मानवणारीही नाहीत.

जोश यांच्या निधनाने एक समर्थ, क्रांतीकारी कवीच नव्हे, तर व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कर्ता व त्यासाठी झीज सोसणारा, आपली निष्ठा कुठल्याही शक्तीपुढे न विकणारा, आपल्या जन्मभूमीविषयीचे प्रेम, निंदा सोसूनही निर्भीडपणे व्यक्त करणारा प्रतिभावंत काळाच्या पडद्याआड गेला आहे ! □

जाकोबो टिमरमन हे अर्जेन्टिनामधील एक सुप्रसिद्ध पत्रकार. 'ला ओपिनियन' या दैनिकाचे संपादक व प्रकाशक. अचानक एक दिवशी ब्युनेस् आयरिश येथील त्यांच्या निवासस्थानी त्यांना अटक करण्यात येते आणि भूमिगत हालचालींच्या संशयावरून त्यांचा भयानक छळ सुरू होतो. आंतरराष्ट्रीय लोकमताचे दडपण वाढत गेले आणि नुकतीच त्यांची सुटका झाली. आपल्याला का पकडण्यात आले, आपला छळ का करण्यात येत आहे, आपल्यावरील आरोप कोणते याचा शेवटपर्यंत त्यांना कसलाही उलगडा होऊ शकला नाही.

'इंटरनॅशनल प्रेस रिपोर्ट' या ख्यातनाम इंग्रजी मासिकाच्या ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर '८१ या तीन अंकात मिळून जाकोबो टिमरमन यांची छळकथा प्रसिद्ध झालेली आहे. 'Prisoner without a Name, Cell, without a Number' या शीर्षकाखाली लवकरच पुस्तक रूपानेही ती प्रकाशित होत आहे.

**मराठी अनुवाद : डॉ. ल. ना. गोखले**
प्रमुख, पुणे विद्यापीठ वृत्तपत्रविद्याविभाग

# माझा छळ, आमचा द्वेष का चालू आहे? (पूर्वार्ध)

**१९७७** सालच्या एप्रिल महिन्यातील एका सकाळची गोष्ट. ब्यूनो आयरिस्च्या माझ्या घरावर साध्या पोषाखातील वीस–एक लोकांनी छापा घातला.

'कोण तुम्ही? कशासाठी आलात?' विचारलं असता त्यांनी उत्तर दिलं की, फर्स्ट आर्मी कोअरमधील टेन्थ इन्फन्ट्री ब्रिगेडच्या हुकुमानुसार ते आलेले होते.

त्यांनी आमचा टेलिफोन तोडला, माझ्या मोटारीची किल्ली ताब्यात घेतली, माझे हात मागील बाजूस बांधून एक ब्लँकेट माझ्या डोक्यावर गुडाळले आणि मला तळघरात ढकलत नेलं. तिथं डोक्यावरचं ब्लँकेट काढलं. माझ्या डोक्यावर कोणी तरी पाय दाबला आणि बंदुकीसारख्या वाटणाऱ्या कशाने तरी मला भिंतीत चिणून ठेवलं. तेथे कोणीच काही बोललं नाही. थोड्याच वेळानं बाहेर काढून एका वाहनातून मला कोठे तरी नेण्यात आलं. मोठे दोन दरवाजे उघडल्याची मला स्पष्ट जाणीव झाली. एवढा वेळ तोंडातून एक शब्दही न उच्चारणाऱ्या त्या लोकांनी समाधानाचे सुस्कारे सोडल्याचे मी ऐकत होतो. त्याचा आवाज खूप मोठा होता. जवळपास कुठं तरी कुत्री भुंकत होती. एकजण म्हणाला, 'आपलं काम झालेलं आहे.' मला मोटारीबाहेर ओढून जमिनीवर ढकलून दिलेलं होतं.

मग बराच वेळ काही घडलं नाही. मी फक्त पावलांचे आवाज ऐकत होतो...आणि...एकदम हसण्याचे, खिकाळल्याचे प्रचंड आवाज...मग कोणी तरी जवळ आलं आणि बहुधा त्यानं पिस्तुलाची नळी माझ्या डोक्यावर ठेवली असावी. त्याचा एक हात माझ्या डोक्यावर पालथा होता. अत्यंत करड्या आवाजात माझ्या अगदी जवळून तो म्हणाला, 'मी दहापर्यंत आकडे मोजणार आहे. दोस्त जाकोबो, आता शेवटचा नमस्कार कर! तुझं सगळं काही संपल्यासारखं आहे.' मी काहीच बोललो नाही. पुन्हा तो माणूस म्हणाला, 'तुला तुझी प्रार्थना म्हणायची नाही?' मी एकही शब्द उच्चारला नाही. त्याने आकडे मोजण्यास प्रारभ केला.

त्याचा आवाज दमदार होता. व्यवस्थितपणे कमावलेला तो आवाज होता. त्याने सावकाश आणि स्वच्छ आवाजात आकडे म्हणावयास सुरुवात केली. आवाजात मुळीसुद्धा क्रौर्य नव्हते. मी शांत होतो. मनात आलेला एकच विचार म्हणजे–'अशा प्रकारे मरणं खरंच अपरिहार्य आहे काय? तसं ते दिसतच होतं; पण मी इच्छा केली होती तीच का ही गोष्ट? हो, पण आता इच्छा–अनिच्छेचा प्रश्नच कुठे आहे? या क्षणी असं म्हणू या की, तीच माझी इच्छा होती.' मला बायको व मुलांची आठवण झाली. तुमच्यावर मी खूप प्रेम केलेले आहे.

'—नऊ...दहा...हा! हा! हा!'

मी हे गडगडाटी हास्य ऐकतो आणि कसं कोण जाणे, मलाही हसू यायला लागतं. मीही मोठ्यानं हसतो. खरंच खूप खूप मोठ्यानं! ◻

ही कोठडी अरुंद आहे. तिच्या मध्यावर लोखंडी दाराकडे तोंड करून मी उभा राहिलो तर माझे हात काही ताठ होऊ शकत नाहीत; पण रुंदी नसली तरी तिला लांबी आहे. मी झोपतो तेव्हा मला पाय ताठ करता येतात आणि डोकं अथवा पाय कुठंच पोहोचत नाहीत.

कोठडी खूपच उंच आहे. मी उंच उडी मारली तरी तक्तपोशी डोक्याला लागत नाही. भिंतीना नुकताच पांढरा रंग दिलेला दिसतो. तरीही या भिंतीवर लिहिलेली काही नावं आणि संदेश, बहुधा नखाने कोरलेले प्रोत्साहनाचे शब्द आणि काही तारखा–म्हणजे अशा साऱ्या खुणा मला दिसत आहेत; पण रंग असा दिलेला आहे की, अर्थ लागेल असं मला भिंतीवर प्रयत्न करूनही काही सापडत नाही. त्या पांढऱ्या फटफटीत आहेत !

माझ्या कोठडीतील जमिनीला ओल आलेली आहे. खालून कोठून तरी पाणी मुरतंय. माझी गादी ओली झाली आहे. मला जे ब्लँकेट दिलं आहे ते मी जर गादीवर ठेवलं तर नक्कीच दमट होईल, म्हणून मी ते सतत खांद्यावर ठेवतो. अंगावर ब्लँकेट घेऊन मी जेव्हा गादीवर पडतो तेव्हा गादीच्या बाजूकडचं माझं अंग दमट होतं. गादी गुंडाळून ठेवली तर? मग नक्कीच जमिनीला न लागणारा गादीचा भाग कोरडा राहील....थोड्याच वेळात तसा हा भाग कोरडा झालाच की ! याचा अर्थ असा की आडवं होता कामा नये. गुंडाळलेल्या गादीवर बसूनच मी झोपलं पाहिजे. म्हणजे हे असं बसून अथवा उभं राहून जिवंत राहायचं, जगायचं ! हो, बसून किंवा उभं राहून–पण किती काळ ?

कोठडीला लोखंडी दरवाजा आहे. तो उघडण्याची जी जागा आहे तेथून चेहऱ्याचा किंचित भाग बाहेरून दिसू शकेल. म्हणून पहारेकऱ्यास असा हुकूम आहे की, या भागावरही आवरण घाल ! एका फटीतून उजेड येतो आहे, त्याच फटीतून हवाही येत आहे. हाच काय तो उजेड आणि श्वासोच्छ्वासाशी संबंध असणारी हीच काय ती हवा! हवा किती अशुद्ध होऊन राहिली आहे; उजेडाबद्दलची एक ठराविकच जाणीव रात्रं-दिवस होत आहे. पण मग काळ कसा मोजायचा ? आणि इथं वेळ तरी कसा घालवायचा ?

सैन्याच्या अतिकडव्या तुकडीनं मला पकडलं होतं. मी एकदम नाहीसा झाल्याचं लोकांना कळू नये म्हणून राष्ट्रपती व्हिडेला आणि सेनाप्रमुख व्हायोलो यांनी जाहीर करून ठेवलं होतं की, माझं नाहीसं होणं म्हणजे मला वाचविण्यासाठी–संरक्षण म्हणून केलेली अटक होय ! पण त्यांना यश आलं नाही. लोकांना काय ते कळलं असावं. अर्जेन्टिनामधील नाझी हालचालींची सर्व सूत्रं याच अतिकडव्या गटाकडे होती. सेनाधिकाऱ्यांतील फुटीमुळेच मी वाचलो.

माझ्यावर प्रश्नांचा भडिमार सुरू झाला तेव्हाच त्यांच्या लक्षात आलं की, नेमका हवा असलेला संपादक त्यांच्या हाती लागला आहे. अर्जेन्टाइनविरोधी कटातील मध्यवर्ती ज्यू व्यक्ती आपणास सापडली अशी त्यांची खात्री झाल्यासारखी दिसत होती.

प्रश्न : तू ज्यू आहेस काय ?

उत्तर : होय.

प्रश्न : तुझं 'ल ओविनियन' हे पत्र झायोनिस्ट मताचं आहे काय ?

उत्तर : ज्यू लोकांच्या स्वातंत्र्य–चळवळीचा एक भाग म्हणून 'ल ओविनियन' झायोनिझमला पाठिंबा देत आहे. त्या चळवळीत अत्यंत उच्च दर्जाची निश्चित मूल्यं आहेत. या मूल्यांच्या अभ्यासाच्या जोरावर अर्जेन्टाइनमध्ये राष्ट्रीय ऐक्य उत्पन्न करता येईल आणि संवर्धित विचार करता येईल असं या पत्रास वाटतं.

प्रश्न : म्हणजेच हे झायोनिस्ट पत्र होय होय ना ?

उत्तर : तुम्ही जर तसं म्हणत असाल तर हो तसचं.

प्रश्न : तू इस्रायलला वरचेवर जातोस ?

उत्तर : होय.

प्रश्न : तुला इस्रायली वकील ठाऊक आहे ?

उत्तर : होय.

ही प्रश्नोत्तरे जेव्हा प्रथम झाली, त्यापूर्वी काही तास पाठीमागे हात बांधलेल्या आणि डोळे बांधलेल्या अवस्थेत मी उभा होतो. बरीच काही अज्ञात माहिती माझ्याकडून कळणार असं प्रश्न विचारणाऱ्याला वाटलं असावं. मग सोन्याची अंडी देणारी ही कोंबडी कशाला मारा... आतरराष्ट्रीय ज्यू कटाच्या खटल्याच्या अनुषंगाने या माणसाचा का नाही उपयोग करून घ्यावा.

या त्यांच्या जाणीवेमुळेच बहुधा मी वाचलो असेन. त्या क्षणापासून माझी अटक अधिकृतपणे मान्य करण्यात आली. माझी सुटका करण्यासाठी मवाळ मंडळींनी दोन वर्षं सनदशीर खटपट केली आणि नंतर तीस महिन्यांनी जेव्हा माझी सुटका झाली तेव्हा मवाळांना सत्ताच्युत करणाऱ्या क्रांतीचा एक भाग म्हणून अतिकडव्या लोकांनी या घटनेचा उपयोग करून घेतला. क्रांती !

कसली क्रांती ? चकमक नाही, रक्तपात नाही, अठ्ठेचाळीस तासांच्या गोंधळी उलाढालीनंतर फक्त शरणागती. एक हास्यास्पद फार्स–कोरडोबा शहरात घडलेला.

या दृष्टीनं पाहिलं तर मवाळांचं म्हणणं बरोबर आहे असं वाटतं. माझ्या मताने ते चुकत होते. त्यांनी पूर्वीच अतिरेक्यांशी लढा द्यावयास हवा होता. त्यांना वाटतं त्यापेक्षा त्यांची स्वतःची शक्ती जास्त आहे.–तेव्हाही होती. पूर्वीच त्यांनी संघर्ष केला असता तर निदान हजारो माणसं वाचली असती. खरं तर हजारो निष्पाप जीव वाचणं हे एकच उद्दिष्ट असायला हवं होतं. डावपेचाच्या गोष्टी नुसत्या प्रदीर्घ काळ बोलण्यात काय अर्थ आहे ?

मी जिवंत राहू शकलो याचं कारण, हे इथले नाझी हे केवळ वरवरचे नाझी होते. त्यांचा विश्वास होता की, तिसरं महायुद्ध सुरू झालं आहे आणि आता त्यांना कोणीच हात लावू शकणार नाही. कसलीही शिक्षा होणार नाही. मला प्रश्न विचारणाऱ्यांपैकी एकानं, कॅप्टन बटो याने, सांगितले होते, 'फक्त देव तारतो अगर मारतो. पण सध्या तो इतरत्र गुंतला आहे आणि अर्जेन्टिनामध्ये आम्ही केलंच पाहिजे असं हे काम आहे.'

¤

स्थानबद्धतेच्या प्रदीर्घ काळात सहन कराव्या लागलेल्या हाल-अपेष्टांचं दुःख नाहीसं कसं होणार, ते एकाचं दुसऱ्यास कसं देता येणार, असा विचार माझ्या मनात येई. माझा मीच निष्कर्ष काढीत होतो की, ती गोष्ट अशक्य आहे. ना आगा ना पिछा. कसल्या खुणा नाहीत, की थांगपत्ता नाही. पण सततची तीव्रता आणि तीही वाढती असं हे दुःख.

एका जगातून दुसऱ्या जगामध्ये माणूस असा झटपट जातो की, त्याच्या अशा खास ताकदीचा काही साठा त्याला करून ठेवता येत नाही आणि त्यामुळे असले अनन्वित अत्याचार सहन केल्यानंतरही तो काही उरत नाही. वास्तविक, हालअपेष्टा ही सुरुवात असते. म्हणून माणसाला कल्पनाही नसलेला मानसिक धक्काही दिला जातो.

त्याचे हात माग बांधलेले असतात आणि डोळ्यांवर पक्की झापडं लावलेली असतात. भोवती माणसंही असतात पण कोणीच बोलत नाहीत. ते लोक बुक्क्यांचा मारा करतात. जमिनीवर उभं राहायला लावून दहा आकडे म्हणण्यास सांगतात, पण ठार केलं जात नाही.

मग मला एका टेबलापाशी नेतात. टेबलावर अगदी पातळशी गादी असते. ते माझे कपडे काढतात. टेबलाच्या टोकांना हात ताणतात आणि पायही बांधून टाकतात आणि एकदम अंगावर थंड पाण्याचा मारा सुरू. त्यापुढे विजेचे धक्के. तुम्हाला ओरडता येत नाही, फक्त कण्हता येतं. ते सगळं क्रौर्य सुरू होण्यापूर्वी कुणी तरी तुमच्या हृदयाची तपासणी करतो. त्याचे हात नाजूक असतात. तुमचं तोंड एकदम उघडून तुमची जीभ बाहेर काढली जाते. तुम्ही एकदम गुदमरून खलास होऊ नये म्हणून हे केलेलं असतं. दातांनी जीभ, ओठ चावली जाऊन त्यांचे तुकडे होऊ नयेत म्हणून माझ्या तोंडात एक रबर ठेवण्यात येतं. थोडं थोडं थांबत बुकलणं चालू असतं. मग ते थांबतं आणि प्रश्न सुरू होतात. पुन्हा स्वल्पविराम आणि नुसत्या शिव्या दिल्या जातात. आणखी एक स्वल्पविराम आणि मग काही तरी आशेचे शब्द; पुन्हा थोडं थांबून अपमानास्पद बोलणं सुरु. थांबणं आणि प्रश्नाची सरबत्ती...विजेचे धक्के जेव्हा देण्यात येतात तेव्हा माणसाला असं वाटायला लागतं की, त्याच्या शरीरातील रक्त मास काढून टाकलं जात आहे. एखाद्या प्राण्यासारखा तो ओरडू लागतो, कण्हू लागतो. मग त्याला कुबलणं जाणवत नाही...दुसऱ्या दिवशी विजेचे धक्के नसताना दिलेले फटके तेवढे जाणवत नाहीत.

¤

कोठडीस खिडकी नाही, दिवा नाही. उभ्यानं अगर आडवं होऊन सगळा वेळ काढायचा. काही दिवस तर पायाला अशा पद्धतीनं बांधलं जातं की उभंसुद्धा राहता येत नाही. कित्येक दिवसात आंघोळ नाही, असा आख्खा महिना जातो. निरनिराळ्या ठिकाणी हिंडवताना, मोटारीत खाली बसवतात. त्यामुळे बाहेरच्या कोणाला काही दिसत नाही. अन्न खायला देतात त्याला कसला कसला वास येत असतो. मला तर अगदी प्रथम पहिले अठ्ठेचाळीस तास हात मागे बांधलेल्या डोळे, कान बांधलेल्या अवस्थेत शरीरधर्मासुद्धा बाजूस न नेता एकाच जागी अडकवून ठेवलं होतं.

हे सर्व विलक्षण दु.ख मला कसं सहन झालं ? पहिल्याच झटक्यात कसा खलास झालो नाही ? त्यातून वाचलो म्हणूनच मला त्याबद्दल थोडीशी सल्लामसलत करायची आहे. कारण यापुढेही जगात कोणा ना कोणावर हेच हाल नि हेच दुःख कोसळणार आहे. माणूस माणसाला देशोदेशी छळणार आहे. राजवटी, बदलतील, काळ पुढे जाईल इतकंच. एक तर मला छळवादाला तोंड द्यायचं आहे, याबद्दलची मनाची तयारी करण्यात आली. अंधारकोठडीत ठेवतात आणि तऱ्हेतऱ्हेने छळतात हे ऐकलेलं होतं. दीड वर्ष जेव्हा मला एकांतात स्थानबद्ध केलं होतं तेव्हा मी कोणता विचार करत होतो ? हाच विचार होता की, पुढे जे जे होणार ते सारे सहन करण्याची ताकद पैदा व्हावी. ही मानसिक ताकद मिळविण्यासाठी मी तटस्थतेचं व्रत धारण केलं. म्हणूनच छळ, हाल–अपेष्टांची चाहूल लागताच इतर बंदी गयावया करू लागत किंवा विलक्षण आरडा–ओरडा करून छळणाऱ्याला धाक दाखवू पाहात; तसं मी काहीच केलं नाही. मी अधिकाधिक तटस्थ राहू शकलो. माझे डोळे बांधल्यानंतर छळ-मेजाकडे मला नेलं ते हाताला धरून. मी गेलो. निःशब्द–इतकचं नव्हे तर चेहऱ्यावर काही भावसुद्धा दिसू नयेत असं मनात आणत होतो.

कपडे काढ, म्हणून मला सांगितलं. मी ते काढले. तिऱ्हाईतासारखेच. हा जो तटस्थपणा आणि तिऱ्हाईत धर्ती या गोष्टीचा मी अंगीकार केला. त्यातूनच मला काही ताकद प्राप्त झाली, असं मला वाटतं. एक प्रकारच्या तपश्चर्येनेच मला सहनशीलता दिली. शरीरात बिलकुल त्राण नसताना, मनात मात्र अगदी गप्प बसून प्रेतवत चेहऱ्याने सगळं सगळं करायचं हा विचार दृढ होत गेला. व्यवहारातली नेहमीची भावभावना व्यक्त करावयाची पद्धत खरंच माझ्यातून नाहीशी झाली होती, यात शंका नाही. भीती, द्वेष, सूड–काही काही म्हणून मनात उत्पन्न होऊच द्यायचं नाही, कारण तसं ते नेहमीच्या तार्किक पद्धतीनं सुरू झालं तर तुमचं मनःसामर्थ्य गळून जातं आणि त्याच्या उलट घडवलं तर एकदम वेगळ्याच कसाची ताकद उत्पन्न होते. होय, ही जादू आपलं मनच करतं. मला वाटतं, हा अतिशय उपयुक्त असा सल्ला आहे.

¤

'ल ओपिनियन'च्या मुख्य प्रवेश-दिवाणखान्यात एक माता उभी आहे. तिला मला भेटायचं आहे. ती रडत आहे, पण तिचे अश्रू पुसण्याची ताकद माझ्यात नाही. कारण तिचं आणि माझं दु ख सारखंच आहे. तिला मला का भेटायचं आहे, याचं कारण माझी सेक्रेटरी तिला विचारते. तिची दोन मुलं नाहीशी झालेली असतात, पोलिसांनी पळविलेली असतात. ती घरात नसताना अठरा वर्षांची मुलगी आणि पंधरा वर्षांचा मुलगा...शेजारी सांगतात की, सशस्त्र पोलिसांच्या दोन चिलखती गाड्या आल्या आणि त्या दोघांना घेऊन गेल्या. पोलीस चौकीवर जाऊन तिने चौकशी केली तेव्हा तिला सांगण्यात आलं होत की, पोलिसांना त्यातलं काहीच माहिती नाही. सरकारीरित्या घडलेली ती अधिकृत गोष्ट नाही. माझ्या सेक्रेटरीजवळ ती बाई म्हणते, 'पोलीस न का सांगेनात, पण मुख्य संपादकाला माझ्या मुलाबद्दल खास शोध घेता येईल. ते नक्की मुलं शोधून आणतील.'

पण हे सर्वस्वी खोटं असतं. मी काही करू शकत नाही, हे मुळी तिला पटतच नाही. खरं तर साऱ्या जगाला ठाऊक आहे की, इथं माझ्यासारख्या संपादकाची ताकद लुळी पडणार. पण अशा विलक्षण अडचणीत अडकलेल्या माणसांना असं मनोमन वाटतं की, माणसांच्या पळवापळीचे हे प्रकार फक्त 'ल ओपिनियन'च्या कचेरीतच सांगितलेले बरे. यूनो आयरिसमधील 'हेरॉल्ड' हे इंग्रजी दैनिक आणि माझ्याकडे येणारे हे लोक तर इंग्रजी वाचणारेच नसतात.

त्या स्त्रीची कथा मला कळलेली असते आणि म्हणूनच मी तिची भेट घेत नाही. बहुतेकाच्याबाबतीत असंच असलं तरी या जातीच्या

## यापुढेही देशोदेशी माणूस माणसाला छळणार आहे....मग ?

काही दु:खितांना मी क्वचित भेट देतो. त्या विशिष्ट दिवशी माझी स्वतःची मन.स्थिती कशी असेल यावर ते अवलंबून असतं. त्या स्त्रीच्या मुलाची बातमी मी ' ल ओपिनियन 'मध्ये छापली तर मला देहान्ताची शिक्षाही सुनावली जाईल, असं मी तिला कसं सांगणार ? आणि माझ्या सेक्रेटरीकडून ती सगळी हकीगत ऐकल्यानंतर मी गप्प तरी कसा बसणार ? माझी फार विचित्र अवस्था झाली आहे.

कुटुंबंच्या कुटुंबं गडप झालेली आहेत. मृतदेहावर सिमेन्टचे दगड ठेवून नदीमध्ये प्रेतं भिरकावली गेली आहेत. प्लासा नदी किंवा पराना नदी. काही वेळा हे .सिमेन्टचे थर गबाळेपणे लावल्याने प्रेतं वर येऊन अर्जेन्टिच्या किंवा युरग्वेच्या किनाऱ्यावर लागतात तेव्हा कुठं काही थोडंसं कळण्याचा संभव ! युग्वेच्या किनाऱ्यावर आलेल्या एका पंधरा वर्षाच्या मुलाच्या प्रेतावरून त्याच्या आईनं त्यास ओळखलं; पण तोही केवळ अपघातच होता. कारण प्रेतंही साधारणपणे झटपटच नाहीशी केली जातात.

काही मृतदेह स्मशानातील सध्याच्या कबरीच्यामध्ये सरकवले जातात आणि म्हणून त्याचा पत्ता लागत नाही. कारण हेलिकॉप्टरमधून नेऊन समुद्रात टाकतात. काही कोठे तरी जाळतात.

ज्यांना दया दाखविली जाते अशी लहान मुलं, ज्याचे आजीआजोबा जिवंत असतील तर त्यांना किंवा मूल नसलेल्या कुटुंबाना देऊन टाकतात. मूल नसलेल्यांना बहुधा ही भेट नसते. कारण मुलांच्यासाठी द्रव्य द्यावे लागते. मग चिली, पेराग्वे, ब्राझीलमधील कुटुंबंही ही मुलं मिळवण्यासाठी पुढं येतात.

पण त्या मातेला कसं साहाय्य करता येईल ? मला एक कल्पना सुचते. माझ्या वर्तमानपत्रात काहीसुद्धा छापता येणार नाही, बातमी छापली तरी राजद्रोह घडेल, याची मला जाणीव असते. आपली मुलं जिथं आहेत असं तिला वाटतं तिथं जर मी फोन केला तर त्या मुलाना लगेच गोळ्या घातल्या जातील; म्हणून मी फोनही करू शकत नाही. मात्र सेनादलाच्या तीन मुख्य कार्यालयांपैकी एका ठिकाणी माझ्या बातमीदारास मी धाडू शकतो. मला सुचलेली हीच ती कल्पना. पण एक खबरदारी मी घेतली पाहिजे आणि ती म्हणजे, ज्या ठिकाणी मुलं आहेत असं तिला वाटतं त्या ठिकाणी या बातमीदारानं जाता उपयोगी नाही.

...पण मग ही शक्कल लढविण्याचा तरी काय उपयोग? बातमीदारानं फक्त असा बहाणा करावयाचा की, तो भेटीस आलेल्या ठिकाणच्या कोणा तरी अधिकाऱ्यानं आणि काही राजकीय नेत्यांनी मुलं त्या मुख्य कार्यालयातच आहेत, असं सांगितलं आहे. अर्जेन्टाइनमध्ये या तीन सेनादलात असलेली स्पर्धा आणि खुन्नस सर्वांना ठाऊकच आहे. संशय आणि कूट-कारस्थान या गोष्टी जितक्या जुन्या तितकीच ही स्पर्धा पूर्वापारची आहे. बातमीदार ज्या तळावर ही माहिती पुरवतो तेथे मग एकदम आपली प्रतिमा बिघडू नये, खराब होऊ नये म्हणून चर्चा सुरू होते. त्या मुख्य कार्यालयाच्या गुप्तहेर यंत्रणेस मग शोध घेण्याबद्दल हुकूम मिळतो. त्याना मुलांचा पत्ता लागतो. पैकी मुलगा पुन्हा दिसत नाही मुलगी मात्र वाचवली जाते आणि नोंदी अशा होतात की, या मुलांच्या पळवापळवीत कोणाचाच हात नव्हता !

ही सारी दृश्ये एखाद्या चित्रपटासारखी माझ्या डोळ्यापुढून सरकतात.

¤

दाराकडे पाठ करून ते मला. उभं करतात. माझ्या डोळ्यांवर घट्ट झापडं असतात. पोलिसी भाषेत बोलायचे म्हणजे मला ' झापडबंद अंध ' केलेलं आहे. मला कोठडीच्या बाहेर काढतात. मग मी पुष्कळ चालतो. कोणी तरी मला वाट दाखवीत असतो--चालण्याच्या वाटेवर आवाज करून. मधे मधे तो मला ओढून, खांद्याला धरून वाटेवर आणीत असतो. या लांबच लांब चालण्यात मला पुष्कळच धक्के व हिसके दिले जातात. (पुढे, म्हणजे तुरुंगातील ही सगळी शिक्षा संपल्यानंतर मला घरातच जेव्हा स्थानबद्ध केलेलं होतं तेव्हा एका पोलिसाने मला सांगितलं की, त्या दिवशीचं ते चालणं फार मोठं अंतर तोडण्याचं नव्हतं. बहुधा ते अंतर कमीच असेल आणि मला एकाच स्थानाभोवती गोल गोल फिरवण्यात आलं असेल. )

असंख्य आवाजांची गर्दी. नेमके किती लोक बोलताहेत याचा अंदाजच येत नाही, पण मी एका मोठ्या खोलीत आहे हे जाणवतं. आता छळ-प्रकारासाठी बहुधा आपल्याला कपडे काढायला लावणार, अशी माझी कल्पना. पण तसं घडत नाही. मला ते खाली बसवतात आणि माझे हात मागे बांधून ठेवतात. आता विजेचे धक्के सुरू होतात. कपड्यामधून, त्वचेमधून वीज जाऊ लागते तेव्हा विलक्षण वेदना होतात. पण हे दुःखही मला नग्नावस्थेत बर्फगार पाण्यात ठेवतात त्यापेक्षा कमी असतं. माझ्या डोक्यावर विजेचा धक्का बसतो तेव्हा मी जागच्या जागी एकदम उडतो नि खाली पडतो. पुन्हा मला बसवतात. आता धक्क्यागणिक मी दु.खाचा दीर्घ सुस्कारा सोडतो.

प्रश्न विचारले जात नाहीत, पण अपमान आणि अवहेलना यांचा निव्वळ भडिमार चालू असतो. एकदम एक वेडाविद्रा आवाज खूप मोठ्याने सुरू होतो. ' ज्यू...ज्यू...ज्यू...ज्यू...! ' आणि त्या मोठ्या आवाजात इतर आपले भसाडे आवाज मिसळतात. एक कोरसच तयार होतो. कॉमिक फिल्म मुलांना दाखवतात तेव्हा ती ज्या धर्तीच्या टाळ्या वाजवतात आणि ' पिक्चर पिक्चर ' म्हणून ओरडतात तसा तो कोरस असतो. आता ते खरोखरीच हास्यानंदात बुडून गेले असावेत. काही तरी मौज-मजेच्या प्रकारांमध्ये भाग घेण्याचा आनंद उपभोगत असावेत. टाळ्याचा ठेका मध्येच कोणी तरी बदलतो. त्यात एक वेगळाच खटका आलेला आहे. ' ज्यू...क्लिप्ड...प्रिक...ज्यू... क्लिप्ड्...प्रिक ' हे उद्गार आणि त्यातील ठेक्यास धरून टाळ्याचा ताल. आता असं वाटतयं की, त्यातील कोणीच रागावलेलं नाही आणि केवळ गंमत व मौज म्हणून हे सगळं चाललं आहे.

विजेचे धक्के चालूच असतात आणि मी खुर्चीतल्या खुर्चीत वर उडतच असतो. अशाच एका धक्क्याने मी खाली कोसळतो आणि माझ्याबरोबर खुर्ची फरफटते. मुलाच्या खेळात व्यत्यय आला म्हणजे ती जशी रागावतात तसा बहुधा त्यांना माझा राग येतो आणि मग पुन्हा अपमानास्पद शब्दांच्या फैरी झडतात. त्या सर्वांवर ताण करीत असतो तो वेडाविद्रा आवाज : ' ज्यू...ज्यू..:ज्यू...'

¤

तुरुंगवासात मला विचारलेल्या सर्व प्रश्नात मी ज्यू असण्यावरच सगळा भर असतो. माझ्यावर निश्चित स्वरूपाचा कुठलाच आरोप ठेवत नाहीत. सरकार, त्याचे अधिकारी आणि लष्करी नेते वेळोवेळी जी स्पष्टीकरणं देत असतात ती सारी एकमेकांस विसंगत असतात. त्यांच्या मुळाशी असलेला द्वेषाचा अंतःप्रवाह आणि त्यांच्या तोंडचे

शब्द यात कित्येकदा काहीच मेळ नसतो. पण त्यास सेमेटिक वंशविरोधाचा दर्प खासच असतो आणि हा विद्वेष फार उघडपणे व्यक्त करता येत नाही, ही त्यांची अवस्था मोठीच विचित्र असते.'

सद्य.स्थितीत ज्यूबद्दल एवढा तिरस्कार का, यासंबंधी विचार करण्यास मला पुष्कळ वेळ मिळतो. मी स्वत: सेमेरिक वंशविरोध मानणारा; पण हे खरं आहे की, अर्जेन्टाइनमधील ज्यूचा प्रश्न जगातल्या इतर ठिकाणच्या प्रश्नापेक्षा स्फोटक बनलेला आहे. जेरुसलेमच्या हिब्रू विद्यापीठात माझा धाकटा मुलगा अँटी-सेमेरिझम या विषयाचा अभ्यास करीत आहे. मी घरामध्ये स्थानबद्ध होतो तेव्हा मी त्याला लिहिलं होतं की, जगातून अँटी-सेमेरिझम केव्हा नाहीसा होईल हे कोणीही समाजशास्त्रज्ञ, राजकारणी अथवा तत्त्ववेत्ता सागू शकणार नाही. त्याच पत्रात मी लिहिलं होतं की, कोणाचीही हकालपट्टी करण्यावर भर न देता किंवा ज्यू-विरोधकांशी वाद न घालता त्याचा आपणास उपद्रव होणार नाही, हे आपण काळजीपूर्वक पाहिलं पाहिजे. पण या प्रश्नाचं खरं स्वरूप अर्जेन्टाइनमधील ज्यू-नेते थंडपणे मांडीतच नाहीत व ज्यू-विरोध विशिष्ट प्रकारे होण्यास मान्यताच देतात, असं जेव्हा माझ्या लक्षात आलं तेव्हा मला विलक्षण आश्चर्य वाटलं. मग हळूहळू माझ्यात जणू काही द्वेष आणि सूड याचं विष भिनू लागलं. इस्रायली नेते रिगाल अॅलन घरातील स्थानबद्धतेत मला भेटायला आले तेव्हा त्यांस मी म्हटलं, 'छळ आणि विजेचे धक्के यामुळं माझा अपमान एक वेळ होणार नाही; पण हाल करू देण्यात ज्यू-नेत्यांचा मूक सहभाग व्यक्त होतो. त्यामुळं मात्र मी अवमानित झालो आहे. छळ आणि शिवीगाळ हे माझं वैयक्तिक दु.खं झालं, त्याला यापेक्षा वेगळा अर्थ नाही. कारण मी जी पत्रकारिता आचरिली तिची परिणती मला अटक होण्यात अगर खून होण्यात मी समजू शकतो; पण या दुःखान्तिकेत अर्जेन्टाइनमधील ज्यू-नेत्यांची घबराट हे संकट मी वज्राघातासारखं मानतो. या संकटाची कळ अती तीव्र आहे आणि तिच्यामुळं मी सतत जागा राहिलो आहे.'

◻

या माझ्या पुस्तकाची तयारी करताना मी किती तरी माहिती गोळा केली. नव्यानं मिळवलेल्या या माहितीत चुटके, आकडेवारी, आकृत्या असं पुष्कळसं काही आहे; पण ते सगळं इथं देण्यात काहीच हशील नाही. कारण त्यातून मी कितीही निवड केली तरी त्या माहितीचा वापर म्हणजे टाइपाचा केवळ दुरुपयोग होईल आणि मोठ्या पांडित्याचा आव आणणारा ग्रंथ विशेष काय करणार आहे? इतर पुस्तकाच्या आधारानं अर्जेन्टिनामधील सद्य.स्थितीबद्दल आणखी एखादं पुस्तक तयार करून काय साधायचं आहे? आमचा द्वेष करणारे बदलावे आणि आपला द्वेष अमुकअमुक कारणानं होत आहे, हे ज्यूंना समजावं हा माझा या ग्रंथलेखनाचा हेतू आहे. म्हणून एका वेगळ्या पद्धतीचा अंगीकार मी करतो. या पद्धतीत चालू क्षणाचा धोका नेमका कोणता आहे ते मी लक्षात घेतो आणि तेवढ्यापुरतंच मी बोलतो. यातून केवळ ठळक प्रश्नांचंच दिग्दर्शन होईल.

◻

तिसऱ्या महायुद्धाबद्दलचे अभ्यासक्रम या तुरुंगात दर आठवड्यास चालत आहेत. सैन्याच्या गुप्तहेर खात्यातील एक अधिकारी हे वर्ग घेत आहेत. छळ करणारे, कैद्यांना प्रश्न विचारणारे आणि माणसं पळवून आणणारे असे जे सारे कोणी आहेत त्यांना या वर्गाची उपस्थिती आवश्यक आहे.

या साप्ताहिक बैठकीमध्ये वृत्तपत्रांतील बातम्यांच्या आशयामधील बारकावे समजावून दिले जातात. त्यातून कोणते निष्कर्ष निघतात, हेही सांगण्यात येते. बैठकीत भाग घेणाऱ्यांना या निष्कर्षांची अगोदर कल्पना असतेच असे नाही. नाझी पक्षाच्या अगदी प्रारंभ काळात संघटनाविषयक काम असंच करण्यात आलं. निष्प्रभ पश्चिमी लोकशाहीस तोड देता आलं नाही. तीच प्रक्रिया पुढे चालून सगळाच युरोप लाल बनेल की काय आणि फक्त कडवे नाझी कम्युनिस्टांना पुरून उरतील की काय, याबद्दलचा विचार माझ्या मनात नेहमीच येत असे.

मला जे प्रश्न विचारले जात त्यावरून या साप्ताहिक शिक्षणाची अटकळ मी मनाशी बांधत होतो. तिकडे वर्गात काही शिकवलं जावं आणि लगेच विशिष्ट प्रश्नांचा भडिमार माझ्या कोठडीचं दार उघडून माझ्यावर व्हावा, असंच बहुधा घडायचं. कित्येकदा दार न उघडताच फटीतून मला प्रश्न विचारीत. एकदा मी त्याना अमेरिकेमधील ज्यूइश लॉबीबद्दल माहिती दिली. इंग्रजीत लॉबी शब्दाचं स्पेलिंग कसं करतात, तेही मला सागावं लागलं. दुसऱ्या वेळेस बोसल येथे झालेल्या झायोनिस्ट काँग्रेसबद्दल मी माहिती दिली. नंतर एकदा त्याना इस्रायलमध्ये एक आणि युगांडामध्ये दुसरे अशी दोन ज्यू राष्ट्रे बनविण्याबद्दलचा निर्णय केव्हा करण्यात आला याबद्दल माहिती पाहिजे होती आणि पुढं मग युगाडाच्या जागी अर्जेन्टिनाचं नाव कसं पक्क झालं व युगाडाचं नाव का वगळण्यात आलं, हे कळायला पाहिजे होतं.

द्वेष आणि अज्ञान. जे समजत नाही ते उद्ध्वस्त करून टाका. अमेरिकन लेखक डाल्टन ट्रम्बो यानं मृत्यूपूर्वी लिहिलेल्या परंतु अपुऱ्या राहिलेल्या 'नाइट ऑफ दि ऑरॉक्स' या पुस्तकातील प्रमुख नायक 'एस एस'चा सभासद असतो आणि तो ज्यूबद्दल म्हणतो, 'या लोकांचं मला काही कळत नाही. काही केल्या हे कसं समजत नाही? आणि हे मला समजत नाही म्हणूनच मी त्यांना ठार मारतो.' अर्जेन्टिनातील मामला तसाच आहे.

ट्रम्बो हे पुस्तक लिहीत होता तेव्हा आपल्या मित्राला तो म्हणाला, 'सत्ताप्राप्तीचा आणि सत्ताधिष्ठित झाल्यानंतर ती ढिली होऊ न देण्याचा काळा हव्यास आपणा सर्वांमध्ये आहे. या हव्यासाच्या तीव्रतेचा परिणाम म्हणजेच लोकांसंबंधीच्या प्रेमाची आपण व्यक्त करतो ती विकृती होय. हे आपले लोकप्रेम जसजसे निरंकुश होत जाते तसतसे आपण खुश होतो. राजकारणाने आणि त्याविषयीच्या चमत्कारिक सिद्धान्तानी विज्ञानालाही बंदी केलं आहे. त्याबाबतची आपली खात्री जसजशी वाढत आहे तसतसा सत्तामद सतत उफाळता राहणार.'

◻

**द्वेष आणि अज्ञान. जे समजत नाही ते उद्ध्वस्त करून टाका....**

माझ्या कोठडीच्या दाराचे भोक उघडले जाते आणि रक्षकांच्या प्रमुखाचा चेहरा मला दिसतो. तो हसत आहे असं मला वाटतं आणि कोठडीत काही तरी टाकत आहे असंही जाणवतं. तो म्हणतो, 'अभिनंदन, जॅकोवो अभिनंदन.'

मी या नव्या कोठडीत असताना प्रथमच माझ्याशी कोणी बोललं आहे. या वेगळ्या कोठडीत काही दिवसांपूर्वी मला आणलं आहे आणि अतिशय कडक अशा नवीनच शिस्तीला मला तोंड द्यावं लागत आहे. बाहेरचा रक्षक बदलला की बाहेरचा दिवा लागतो आणि बाहेरून आरोळी येते, 'नाव काय ?'

म्हणजे सहा तासांनी एकदा याप्रमाणे दिवसाकाठी चार वेळा हा चिमुकला झरोका उघडा होई. न्याहरी, दुपारचं आणि रात्रीचं जेवण जेव्हा पुरवीत तेव्हा इतर वेळी माझा उल्लेख करून विचारीत, 'काही खाणार आहेस का ?' बस्स, एवढेच शब्द या नव्या कोठडीत आल्यापासून ऐकायला मिळाले होते आणि आता बाहेरील व्यक्ती चक्क माझं अभिनंदन करीत आहे. मला आश्चर्य वाटलं.

नवं काही घडलं की डोक्यात एकच एक प्रतिक्रिया झटकन होई. ती अशी की, आता आपलं नेमकं काय होणार आहे ? हे खरं आहे की, मी आता ब्यूनो आयरिसच्या फेडरल पोलिसांच्या केन्द्र कचेरीतील न्यायालयीन कोठडीत आहे. ही कोठडी चांगली दोन मीटर रुंद व तीन मीटर लांब आहे, आणि मला नैसर्गिक विधीसाठी दार ठोठावावे लागत नाही. परवानगी घ्यावी लागत नाही. आतमध्येच कोपऱ्यात व्यवस्था आहे. पिण्याच्या पाण्याचा नळही इथं आहे. मी हात-पाय-तोंड धुऊ शकतो; पण इथं साबण नाही किंवा टॉवेलही नाही. वर गादी नसलेला सिमेंटचा पलंग झोपायला आहे. गादी मला मिळणार आहे, असं सांगतात; पण अजून आलेली नाही. मला एक ब्लॅंकेट दिलेलं आहे; पण भिंतीवरच्या फटीतून असा काही गारठा येतो की, त्या एका ब्लॅंकेटानं काही भागत नाही. मग शरीरात ऊब येण्यासाठी मी येथे सरळ-तिरप्या फेऱ्या मारतो. साधारण सात पावले होतात एकेका फेरीची. मी पावले मोजतोय...एकूण हजाराच्या पुढे आहेत.

ही अवस्था पुष्कळच बरी आहे. गुन्हेगाराच्या कोठडीपेक्षा ही जागा वेगळी वाटते; पण माझ्याशी कोणीच बोलत नाही आणि काय होणार आहे, हे मला कळत नाही. वरचा छोटा झरोका सतत बंद आहे. इथं आत सगळं शांतच आहे. बाहेरचे आवाज तेवढेच मधून मधून येत आहेत. अद्याप उजाडलेलं नाही. सगळीकडे अंधार आहे. आता मला बिगुलचा आवाज आणि काही आज्ञा ऐकू येतात. माझ्या खिडकीखालीच ही माणसांची जमवाजमव केली जात असली पाहिजे. नंतर तळमजल्याची फरशी धुतली जात असल्याचा आवाज. टिनच्या बादल्यांचा खडखडाट. मी जी खिडकी म्हणतो आहे तो एक रुंद भोकसा आहे. त्याला दुबार गज आहेत. बाहेरचं काही दिसतंय का, हे पाहण्यासाठी मी पलंगावर चढतो; पण भिंत इतकी रुंद आहे की, मला बाहेरचं काही दिसत नाही. बाहेरच्या बाजूच्या अंगणात मी काही आवाज ऐकतो. फरशीची वाट कैदी धूत आहेत आणि त्यांचे पहारेकरी त्यांना वेडावत आहेत, शिवराळपणे काही बोलत आहेत. मधेच कैदी रडत असल्याचं मला स्पष्टपणे जाणवतं. पुढं मला समजलं की, जे कैदी फरशी घासण्याचं काम नीट करीत नाहीत त्यांना एक विचित्र शिक्षा दिली जात असे. नग्नावस्थेत पुढे वाकून उजव्या हाताचं बोट जमिनीला टेकवून एका गोलात फिरण्याची. जमिनीला लावलेलं बोट वर काढायचं नाही आणि गोल गोल फिरणं थांबायचं नाही. या शिक्षेचं नाव आहे 'तेलाचा शोध!' तुमचं मूत्रपिंड फुटत आहे असं जणू काही वाटतं. मात्र करमणूक करणारा एक दुसराही शिक्षाप्रकार चालत असे. तो म्हणजे भिंतीकडे तोंड करून कैद्यांना उभं करायचं आणि एकमेकांच्या कमरेभोवती हात ठेवून गाडी गाडी करीत पहारेकऱ्यांनी डाव्या अगर उजव्या बाजूने येऊन कैद्यास पाठीकडून जोरदार धक्का द्यायचा. हे पहारेकरी तोंडाने आगगाडीच्या इंजिनाचा आवाज करीत आणि वेग वाढवून असा काही दणका देत की, कैदी भिंतीच्या बाजूला भेलकांडत असे. या शिक्षेचं नाव, 'च्यू च्यू शॉक!' जेव्हा हे पहारेकरी दुसरं काही काम करीत तेव्हा अत्यंत अचकट-विचकट शब्द उच्चारावयास लावून सुमारे पन्नास मीटर लांबीच्या अंतरावर पळावयास सांगत. कपडे काढलेल्या अवस्थेत आणि सागितलेली वाक्यं उच्चारत पळलं पाहिजे!

¤

माझ्या मनात वरचेवर आत्महत्येचा विचार येई. ती छळ-कार्यक्रमाची तात्कालिक प्रतिक्रिया आहे हे माझ्या लक्षात येत असे. छळ होणे संपले की मनात पुन्हा काही ना काही आशावादी विचार येई आणि दुसरं असं की, प्रारंभ आठवड्यातील प्रश्न विचारणं आणि छळ करणं चालू होतं तेव्हा आत्महत्येची काही सोयच नव्हती, संधीही नव्हती.

पण पुढे जेव्हा हात पाठीवर बांधलेले, डोळे मिटलेले आणि घाणसाण उच्चारावयास लावणे चालू होते तेव्हा दिवस केवढा मोठा वाटे. प्रश्नाचा मारा लाबलचक आणि काळाची दीर्घताही मोठी...थंडीच थंडी आणि लांबच लांब दिवस आणि सगळंच असह्य, तेव्हा आत्महत्येचा विचार येई. पण त्या अवस्थेत काही प्रयत्न करणंच शक्य नव्हतं.

पुढं माझी बदली ल-प्लाता शहराच्या पोलीसहेडक्वार्टरच्या तुरुगात झाली. नेताना माझे डोळे बांधले होते, हात मागे बांधलेले होते आणि मला मोटारीच्या हौद्यात एक ब्लॅंकेट गुंडाळून बसवलेले-टाकलेले होते.

सकाळची वेळ. प्रश्न विचारण्याचा सर्वांत मोठा कार्यक्रम किती तासांचा झाला असेल ? झोपू न देता, काही करू न देता सतत अठरा तास ! आता मला ल-प्लातापासून दूर नेत आहेत आणि ते मोठ्या खुषीत दिसत आहेत. कदाचित त्याचं कारण हे असेल की, मी एका निवेदनावर सही केलेली आहे, त्यात असं जाहीर केलं होतं की, मी डाव्या झाओनिस्ट पक्षातील आहे, आता माझे डोळे बांधलेले नाहीत किंवा हातही बांधलेले नाहीत. मला एकट्याला वाहनात मागे बसवलेलं आहे आणि माझ्या हातात एक सफरचंद दिलेलं आहे. ते मला सांगतात की, तुरुंगात पोहोचण्याच्या वेळी मला ब्लॅंकेटमध्ये गुंडाळण्यात येईल-कुठं आलं आहोत हे न कळण्यासाठी त्यांच्या सांकेतिक भाषेतलं ते ठिकाण पिओस्टो व्हास्को आहे. अगदी निर्मनुष्य रस्त्याने ते मला नेत आहेत. मी खिडकीतून बाहेर बघतो. गाडीतील रेडिओ चालू आहे. बातम्या म्हटलं की, माझे कान टवका-

रतात आणि काय आश्चर्य, माझ्याबद्दलची बातमी एकदम सुरू होते. मला कुठं ठेवलं आहे हे जाणून घेण्यासाठी माझ्या बायकोनं हेबियस् कॉर्पस्‌चा अर्ज केलेला आहे आणि ती बातमी ऐकल्यावर एक रक्षक मला विचारतो, ‘आता या क्षणी तुझ्या मनात काय चाललंय ?’

चेहऱ्यावर स्मित आणीत मी म्हणतो, ‘आता माझ्या मनात ना? मनात असा विचार येतोय की, मोटारीचं दार उघडून एकदम बाहेर उडी घ्यावी !’

मग तो मला सांगतो. ‘तसं काही करू नकोस. उडी घेण्याइतकी ताकद तुझ्या अंगात कुठं आहे ? आणि तू तसं काही करण्यापूर्वीच मी तुला हातांनी ओढणार नाही का ?’

आत्महत्येच्या मोहाप्रमाणचं दुसरा एक मोह सतत पछाडतो आहे. तो म्हणजे वेडेपण. वेड लागेल तर किती बरं होईल. तीस महिन्यांच्या माझ्या तुरुंगवासात आणि छळयुक्त कालखंडात या दोनच भावना माझ्या मनात घर करीत आहेत. अत्यंत तीव्रपणे.. पण काळ हा मोठाच भयंकर शत्रू आहे.

आत्महत्येचा विचार करण याचा अर्थ आत्महत्येला उद्युक्त होणं नव्हे किंवा तसा निर्णय करणंही नव्हे. त्या विचाराचा अर्थ एवढाच की, तुमच्या जवळपासच्या अत्यचारी वातावरणाशी रोज तुम्ही जुळवून घेण्याचा प्रयत्न करता; त्या पातळीवरच्या अत्याचाराच्या हिशेबात म्हणजेच भोवतालच्या मंडळींच्या समवेत तुम्ही समान भूमिका धारण करून जगू लागता. ही आपल्या कल्पनेतील आणि आपणच मनानं उत्पन्न केलेली समता खरोखरीच छळ करणाऱ्यांच्या पातळीवरची असते. आणि तिच्यामध्ये एक प्रकारच्या फिटंफाटीची भावना असते. या नव्या विचाराचे धनी आपले आपण असतो आणि त्या विचारावर आपले एक प्रकारचे नियंत्रण असते. तुरुंगात असतानाच होणारा हा एक साक्षात्कार होय ... उद्याच्या जगाबद्दलचा तो निर्णय नाही किंवा ती कोणती नवी आशाही नाही. तो आहे मनाचा एक छद. असा छंद की, ज्यास मर्यादा नाहीत आणि जो म्हणजे एक प्रकारच्या शारीरिक स्वरूपाची गरज होय. जणू काही स्पर्शाने एखादी वस्तू जाणवावी तशा धर्तीची ही अगदी निखळ सवेदना आहे. आपल्यावर लादलेल्या गोष्टीतून व्यक्त होणाऱ्या विनाशक प्रवृत्तींना त्याच धर्तीचे, आत्महत्या हे उत्तर आहे. छळ होत असलेल्या बंद्याच्या मनात आत्महत्येचा दुसरा काहीच अर्थ नाही. मग हा विचार, परिणामांची; अन्य शक्यताची, त्याच्या कार्यवाहीत अनुस्यूत असलेल्या दुःखाची अगर खुद्द तसा तो विचार करण्यात काठोकाठ भरलेल्या पराभवाची चुकून म्हणून तमा बाळगीत नाही. आत्महत्या म्हणजे आत्महत्या. या शब्दाला त्याचा स्वतःचा स्वाद आहे, चव आहे, आणि वजनही आहे. बंदयाच्या कोठडीची जागा आणि त्याच्याशी संबंधित असलेला काल सर्वथैव भरून टाकण्याची त्याची ताकद आहे.

मग बंदी कोठडीच्या दोन भिंतीमधील अंतर नीट मोजतो आणि अंगात असलेली सारी शक्ती एकवटून, एका भिंतीपासून निघून दुसऱ्या भिंतीवर डोकं आपटेल की नाही, याचा विचार करतो. वाढलेल्या नखांनी एखादी रक्तवाहिनी कुरतडता येईल काय आणि मग आपल्या त्या अत्याचाराची व आपल्याला सोसाव्या लागलेल्या अत्याचाराची मनातल्या मनात तो तुलना करू लागतो. शरीरातील धमनीस स्वतः भोक पाडणे आणि अनपेक्षितपणे कोणी तरी, आकस्मिकपणे आपला छळ करणे, या दोन गोष्टींच्या संवेदनांसाठी आपली पात्रता आपण आता अंदाजत आहोत. या कल्पनेत आता एक प्रकारचा रोमांचक थरार आला आहे. एखादी कथा समाप्त करण्यातील जाणीव त्यात आहे. म्हणजेच गुप्तपणे, योजनापूर्वक काही कृती करण्याच्या प्रकारातील ही अभिमानाची बाब ठरते. सतत होणाऱ्या छळास आणि अवमानास प्रतिसाद देण्यासंबंधीची ती प्राथमिक स्वरूपाची विलक्षण मोहमयी प्रतिक्रिया आहे.

पण या विचारात सतत तरी गुंतून राहावं का ? कोणत्या तरी क्षणी तो विचार सोडून देण्याचा निर्णय तुम्हाला करावाच लागतो. कारण समोरचे भोग भोगण्याऐवजी काही तरी पळवाट काढण्याची प्रक्रियाही एवढी दाट होते की, आत्महत्या करायलाही मनाचे धैर्य लागतं. ते कुठं आपल्याजवल उरलं आहे, हे जाणवतं. आणि मग पुन्हा पराभवाचा विचार. जे शक्य नाही त्याचा मनात चाळा करण्यात काय अर्थ आहे ? आता हा तुमचा तुम्हीच अपमान करून घेता. हे सारखं जाणवतं की, तुमचं जग अगदी संकुचित झालं आहे. इतकं छोटं की, छळाला प्रत्युत्तर म्हणून तुम्ही काही करून घेतलं किंवा त्यातून जगला-वाचलात तर त्याचा असा काय परिणाम होणार आहे ? आणि मग आत्महत्येची शक्यता कमी कमी होऊ लागते आणि दुसरा एकच मोह उत्पन्न होतो तो असतो वेडाचाराचा. होय ! त्याबद्दलच्या कल्पना उसळधा मारतात खऱ्या. पण या किती स्वतंत्र गोष्टी आहेत !

एक वेळ आत्महत्या तुमच्या हातातील आहे पण वेड लागणं कुठं तुमच्या इच्छेवर अवलंबून आहे ? हा, तुम्ही मनाने तशी काही तयारी करू लागला, म्हणजे वेड लागायचं असलं तर लागू द्या. त्यासाठी आपण थांबायला तयार आहोत हा विचार तेवढा तुमच्या हाती आहे. पण तो मनात वारंवार आला पाहिजे. तो जर तसा आला नाही तर डोळे बांधलेल्या अवस्थेत पाठीमागून आकस्मिक दिल्या जाणाऱ्या फटक्यामुळे होणाऱ्या भयानक अवमानापेक्षाही हा तुमचा तुम्ही करून घेतलेला अपमान अधिकच षंढपणाचा व निर्णायक ठरेल.

हो ! मूकपणे सहन करायला लागणाऱ्या शिक्षेची परिणती वेडाचाराचा मोह उत्पन्न करणारी असते. वेड असं सांगून लागत नाही आणि कदाचित तुम्ही त्याच्यासाठी कितीही थांबलात तरी तसं काहीच घडणार नाही. एके दिवशी इतका छळ झाला की रात्री झोपताना—खरं तर नीट झोप होतीच कुठं—विचार मनात आला की दुसऱ्या दिवशीची सकाळ उगवणं आणि आपण वेडे झालेलो असणं असं खरोखरीच घडलेलं असेल तर काय बहार होईल ! प्युएस्टोव्हास्कोहून कोठे तरी मला नेलं होतं; तेथून ल प्लाताच्या मुख्य पोलीस कार्यालयात आणि तेथून परत प्युएस्टोव्हास्को इथे, म्हणजे जेथल्या स्वयंपाकघरात माझ्यावर नाना अत्याचार करण्यात आले

तेथेच मी परत आलो होतो. रात्री थोडी झोप लागली होती. सकाळ झाली तेव्हा त्याच चमत्कारिक जागी आपण आहोत हे लक्षात आलं, पण वेड खासच लागलेलं नव्हतं. आता डोळे बंद केलेल्या आणि पाठीवर हात बांधलेल्या अवस्थेत मी बसलो होतो. जवळच एक भुकणारा कुत्रा बाधून ठेवला होता आणि मला अधूनमधून पावलांचे सौम्य आवाज ऐकायला येत होते. पण त्यापेक्षा निश्चित स्वरूपाचं ऐकू येत होतं ते म्हणजे धातूच्या पत्र्यावर घासलं जाणारं लोखंडी अवजार. हा आवाज अधिक स्पष्ट होता. आता माझं शरीर थरथरु लागलं. प्रक्षोभानं डोळ्यासमोर तीक्ष्ण टोकं किंवा झगझगती धारवान पाती असं काही तरी दिसत होतं:

आणि कुत्रा अत्यंत भयानकपणे भुंकू लागला. तो त्याचा कशाबद्दलचा तरी निषेध होता आणि ते बरोबर होतं. कारण त्यालाही त्याचे म्हणून काही हक्क होते की !

पण मी वेडा झालो नाही. पुढे माझे एकाकीपण आणि गुप्त हालचाली संपल्यानंतर प्युएस्टोव्हास्को इथं माझी काही बंद्यांशी भेट झाली. तेव्हा मी त्यांना म्हणालो, 'बहुतेक मला वेड लागल्यासारखं वाटतंय.' पण तशी मुळीच अवस्था नव्हती, याबद्दल त्यांनी माझी खात्री पटवली. त्यानी विश्वासानं सांगितलं त्याचा आशय एवढाच होता की, माझ्या डोक्यात फक्त थोडा गोंधळ झाला आहे. आणि तो अर्थातच एकाकीपणामध्ये झालेल्या छळामुळेच होय. पण मी आता माणसात आल्यानंतर माझं सगळं काही ठीक होईल. या त्यांच्या बोलण्यातूनच मला हळूहळू धीर येऊ लागला. एक कैदी म्हणाला, 'डॉन जॅकोबो, असंच धीरानं चालू ठेव, त्याना तुझा वृत्तीच्छेद करू देऊ नकोस. मनानं मुळीच भंगू नकोस. हे सगळ्यात महत्त्वाचं आहे. निश्चित जगणार आणि या अशा स्थितीतूनही बाहेर पडणार, या विचारापासून ढळला नाहीस तर एके दिवशी तुझं सगळं चांगलं होईल !'

होय, भित्रेपणा आणि दुबळीक हेच माझे शत्रू होते.

तरीही वेडेपणाची वाट पाहात असल्याचं सोंग मी चालू ठेवलं, पण वेडा झालो नाही.

आत्महत्येचा, तो मस्तवाल आणि गोंडस वळू मी माणसाळू शकलो नाही किंवा त्याच्या शिंगांवर मी स्वतःला झोकूनही देऊ शकलो नाही. आणि मी सारं चालूच ठेवलं. आणि हा मी आज इथं आहे.'

( उत्तरार्ध पुढील अंकी )

# उद्याचा राजकीय भारत

## कै. नरहर कुरुंदकर यांच्या दृष्टिकोनातून

सोलापूरच्या उद्योग बँकेतर्फे साजऱ्या झालेल्या १९८० मधील गणेशोत्सवातील 'उद्याचा राजकीय भारत' या विषयावर भाषण करताना थोर विचारवंत कै. नरहर कुरुंदकर म्हणाले होते :

आपल्या देशात लष्करी राजवट येण्याची शक्यता नाही आणि दिवसेंदिवस लोकशाही रुजण्याची शक्यता संपत आहे. आगामी कालात संघटित वर्गाच्या मागण्या दाबून ठेवून जर असंघटित वर्गाकडे लक्ष दिले गेले नाही तर हेच असंघटित लोक हिंसेने सरकार उलथून पाडतील. बदलत्या राजकीय परिस्थितीचा विचार करता नजीकच्या काळात भारतात अराजकतेचा धोका स्पष्ट दिसत आहे. परंतु या देशातील जनतेवर होणाऱ्या नैतिक प्रभावाचा परिणाम पाहता, ग्रामीण भागातील शेतीप्रधान कार्यक्रमावर आधारलेल्या पक्षांचे राजकारण उदयाला येऊन एखाद्याच्या नैतिक बळावर राज्य स्थिरावेल !

या व्याख्यानाच्या दुसऱ्या दिवशी प्रश्नोत्तरांचाही कार्यक्रम झाला. याशिवाय त्यांच्याबरोबर झालेल्या भेटीतून भारताच्या आगामी राजकीय परिस्थितीसंबंधीचे त्यांचे विचार येथे टिपलेले आहेत.

आगामी निवडणुकीनंतर कोण पंतप्रधान होते याला महत्त्व नसून प्रांतीय पक्षांचे प्राबल्य वाढल्याने राष्ट्रीय एकात्मतेला बाधा येते, हा खरा चिंतेचा प्रश्न असल्याचे सागून कुरुंदकर म्हणाले होते, 'संपूर्ण देशात लोकशाहीवर विश्वास असणारे दोन देशव्यापी पक्ष असतील तरच या देशात संसदीय लोकशाही रुजेल, असे मत पंडित नेहरू आणि सरदार पटेल या दोघाचे होते. नेहरूंनी स्वतःचा पक्ष देशव्यापी केला, पण विरोधी पक्ष देशव्यापी न होऊ देण्याची व्यवस्थित काळजी घेतली. इंदिरा गांधीचेही हेच मत आहे. पण त्यांनी देशव्यापी विरोधी पक्ष उभा राहू देण्याचे तर सोडाच, पण स्वतःचा पक्षही बळकट ठेवला नाही. सत्याहत्तरसाली जनता पक्षानेही हेच केले. दुसऱ्याचे सभासद फोडून आपल्यात आणले. परंतु त्यालाही आपले सभासद फुटून बाहेर जाताना पाहावे लागले.

'देशव्यापी पक्ष उभे करावयाचे असतील तर प्रांतीय प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे भाग आहे. परंतु आता प्रांतीय पक्षांचे प्राबल्य वाढत आहे. भारत देश हा विविध जाती जमातीनी बनलेला असला तरी प्रात भाषेवार आहेत. म्हणजे मराठी लोक महाराष्ट्रात, रेड्डी आंध्रात, असे आहेत. त्यामुळेच यशवंतराव चव्हाण कधीच अखिल भारतीय नेते होऊ शकले नाहीत. कारण महाराष्ट्रातील मराठ्यांमध्ये मी गुतून राहिलो नाही, हे ते कधीच पटवून देऊ शकले नाहीत. म्हणूनच महाराष्ट्राचे ते शिवाजी ठरले, पण दिल्लीचे औरंगजेब ठरले नाहीत.'

दोन देशव्यापी लोकशाही पक्ष उभे न राहू शकल्याने आता केंद्र सरकारात, ज्या पक्षाचे एकमेकाशी हाडवैर आहे, अशांच्याही युत्या होतील, असे सागून कुरुंदकर पुढे म्हणाले होते, 'केंद्रात काहीही झाले तरी तामीळनाडूसारखे प्रांत डीएमकेच्या, म्हणजेच प्रांतीय पक्षाच्या ताब्यात राहतील. त्या वेळी ज्या कोणाला दिल्लीवर राज्य करावयाचे असेल, त्याला डीएमकेसारख्या पक्षाला आश्वासन द्यावे लागेल की, भारतीय राष्ट्र-

वादामध्ये तुमची समरस होण्याची इच्छा आम्ही आमच्या ताकदीनुसार सांभाळून घेऊ. प्रत्येक प्रांतात याचीच पुनरावृत्ती होईल, असा धोका संभवतो.'

साहजिकच या सगळ्या घटनांमुळे लोकशाही दुबळी होऊन ती संपेलच काय? आणि नंतरची पायरी म्हणून लष्करी राजवट येईल काय? असा प्रश्न उपस्थित होतो. यासंबंधी कुरुंदकरांचे मत : याचे स्पष्ट उत्तर 'नाही' असे आहे. लष्करी राजवटीची शक्यता १९५३ साली निर्माण झाली असताना पं. नेहरूंनी आपल्या सामर्थ्याचा पुरेपूर वापर करून तो प्रयत्न हाणून पाडला इतकेच नव्हे, तर अशा राजवटीची शक्यता कायमची संपुष्टात आणण्याकरता त्यांनी बरेच उपाय योजले. संरक्षण आणि संरक्षणाची उत्पादने अशी दोन वेगवेगळी खाती निर्माण केली. पूर्वी दोन्ही एकाच खात्यामध्ये असत. आता त्यामुळे सैन्याचा उठाव जरी झाला, तरी त्यांना जीपगाड्या, पेट्रोल, शस्त्रास्त्रे लगेच मिळणार नाहीत अशी व्यवस्था झाली. नौदल, विमानदल आणि पायदळ असे तीन स्वतंत्र विभाग केले. सेनाभरती ही प्रांतीय ठेवली. त्यामुळे ते सैन्य आपापल्या प्रांताचे अभिमानी झाले. सैन्यदलाची व्यवस्था नागरी दलाकडे ठेवली. नेहरु म्हणत, लोकशाहीत नागरी व्यवस्था सर्वोच्च पाहिजे. त्यामुळे सर्व निर्णय पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार घेतले जातात. सैन्याला तो अधिकारच नाही. अशा सर्व उपायांमुळे आपल्या देशात लष्करी राजवट येण्याची शक्यता नाही.

'लष्करी राजवटो येण्याची शक्यता नाही आणि लोकशाही रुजण्याचीही शक्यता नाही, हे चक्र अधिक गंभीर आहे, असे सांगून कुरुंदकर पुढे म्हणाले होते, 'संसदीय लोकशाहीमध्ये हलाखीची आर्थिक परिस्थिती हेच जनता प्रक्षोभक होण्याचे कारण असते. देशातील सगळा संघटित वर्ग हा लोकसंख्येच्या अवघा दहा टक्के आहे. सगळा फायदा हाच वर्ग वाटून घेऊ लागला तर दारिद्र्य रेषेखाली जे चाळीस टक्के लोक आहेत, त्याची परिस्थिती कधीच सुधारणार नाही. म्हणूनच संसदीय लोकशाही स्थिरावत नसेल, लष्करी राजवट येऊ शकत नसेल, तर या संघटित लोकाकडून हिंसक मार्गाने सरकार उलथून पाडले जाईल. यातूनच नक्षलवाद उदयाला येण्याचा धोका दिसतो. चुकीचा का होईना, पण ध्येयवाद असलेल्या या नक्षलवाद्यांची हुकूमशाही लष्करापेक्षा परवडली, असे माझे मत आहे; परंतु या नक्षलवाद्यांच्या ताब्यात देण्यासाठी देश शिल्लक राहणार नाही. कारण अराजकतेचा फायदा घेऊन निरनिराळ्या प्रांताची सरकारे स्वतःला राष्ट्र म्हणून जाहीर करतील. तामीळनाडू शेजाऱ्या केरळातील नक्षलवादी आपल्याकडे येऊ नयेत, म्हणून आपले संरक्षण अमेरिकेवर सोपवील. कुणी दुसरा रशियावर सोपवील. अशा रीतीने भारत नावाचे काही शिल्लकच राहणार नाही! याप्रमाणेच यदाकदाचित लष्करी अंमल आलाच तर त्याही वेळी भारत शिल्लक राहणार नाही!'

या सगळ्या राजकीय अंदाजाचा विचार करताना लोकशाहीचे एक वैशिष्टच सहज लक्षात येते. ते म्हणजे, येथे नेते, पक्ष सतत भाडत असतात. किंबहुना लोकशाहीत प्रश्न जास्त भडक करून सांगितला की तो सुटतो, असे या नेत्यांचे गणित असते याचे उदाहरण सांगताना कुरुंदकर म्हणाले, 'बेळगावकारवारचा प्रश्न संसदेच्या कोणत्याही ठरावाने सुटणार नाही. त्याकरता ६२ च्या चिनी युद्धापेक्षाही जास्त सैन्य पाठवावे लागेल, असे कर्नाटकचे मुख्यमंत्री जाहीररित्या सांगतात. त्यावर महाराष्ट्राचे एक प्रमुख नेते, आम्हाला भारतात राहावयाचे की नाही याचा विचार करावा लागेल, असे म्हणतात; पण हेच महाराष्ट्र व कर्नाटकचे नेते खांद्याला खांदा लावून कृष्णा—गोदावरी पाणी-तंट्यात आम्हाला जास्त वाटा पाहिजे, अन्यथा आमच्या दोन्ही प्रातांतून जाणारी तुमची वीज तोडू, असे आंध्रच्या मुख्यमंत्र्यांना ठणकावून सागतात! त्या वेळी आंध्रचे मुख्यमंत्रीही तुम्ही आमची वीज तोडत असला तर तोडा, पण तुम्हाला आमचा तांदूळ पाहिजे की नाही ते बोला, असे बजावतात! थोडक्यात एकमेकांवर अवलंबून असलेले हे प्रांत लोकशाहीतच भाडू शकतात, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.'

सध्याच्या राजकीय घालमेलीमध्ये भारतात संपूर्ण अराजकता येऊ पाहात आहे. त्यात नुसती लोकशाहीच नव्हे तर भारतच नष्ट होण्याचा धोका आहे; पण याचे उत्तर देण्याचे प्रयत्न कोणताही पक्ष करत नाही, ही खेदाची गोष्ट असल्याचे सांगून प्रा. कुरुंदकर पुढे म्हणाले, 'सगळ्या देशाचे भवितव्य निराशेने ग्रासले असताना, त्यालाही कुठे तरी तोंड फुटते. आगामी काळात ग्रामीण जनतेच्या जीवनाची पुनर्रचना करण्याच्या कार्यक्रमावर आधारलेल्या पक्षाचा उदय होईल. त्याकरता शेतकऱ्यांचे जीवन कसे मार्गी लागेल, त्याला पूरक अशी शहरातील औद्योगिक रचना कशी असेल यासाठी प्रयत्न होतील.

'आपल्या देशात वैयक्तिक हितासाठी सार्वजनिक हिताचा घात केला जातो, अशी हजारो वर्षांची परंपरा आहे. त्याचबरोबर एका बाजूने वस्तुनिष्ठ व्यवहार असतो, तर दुसऱ्या बाजूस हजारो वर्षांच्या संस्कृतीने चारित्र्यवान माणसाचे दडपण आपल्यावर येत असते. याचे ताजे उदाहरण म्हणजे, एका बाजूला राजकीय घोषणांचे फुत्कार चालू असतानाही जयप्रकाश नारायणांच्या शब्दाखातर जनता पक्षाचे सर्व प्रश्न चटकन सुटले या देशाइतका नैतिक प्रभाव जगातील इतर देशात कार्यप्रवण होत नाही. या देशामध्ये प्रचंड नैतिक बळ आहे, म्हणूनच ग्रामीण भागातील शेतीप्रधान कार्यक्रमावर आधारलेल्या पक्षांचे राजकारण उदयाला येऊन एखाद्याच्या नैतिक बळावर राज्य स्थिरावेल, असे आशेचे किरण मला दिसतात.

'आपण पाच हजार वर्षे टिकून राहिलो, याचे कौतुक करू नका; परंतु तो काळ आपण कसा काढला याचा विचार केल्यास ती प्रगतीची खूण ठरेल, असे डॉ. आंबेडकर म्हणत असत. त्याचप्रमाणे जे राष्ट्र आपल्या जीवनाला कोणताही अर्थ देत नाही, त्या जीवनाला काय अर्थ आहे? भारताने सतत नवी प्रतिष्ठा मिळवत राहिले पाहिजे. नाही तर भारत राहिला काय अन् न राहिला काय, दोन्हीचा अर्थ सारखाच आहे!

## दुहेरी निष्ठावाद

'दुहेरी निष्ठेचा प्रश्न हा सोयीच्या राजकारणासाठी वापरला जात असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल निरनिराळ्या भ्रामक कल्पना ऐकिवात येतात. शिवाय राजकारणी नेतेमंडळी या दुहेरी निष्ठेच्या प्रश्नाची गल्लत करतात. तेव्हा या प्रश्नाबद्दल जरा

स्पष्ट बोलले तर मारामाऱ्या होणार नाहीत हे गृहीत धरून मी बोलतो', असे प्रास्ताविक करून प्रा. कुरुंदकरांनी सांगितले, 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघटना ही गेल्या कित्येक वर्षांच्या परिश्रमातून, त्यांच्या नेत्यांनी मोठी केली आहे. संघाचे चालक श्री. हेडगेवार अथवा श्री. गोळवलकर यांनी या कामाकरता इतर कोणाही राजकीय पक्षांनी मदत केलेली नाही. संघाच्या विचारसरणीबाबत मतभेद असू शकतात, परंतु 'तुमची संघटना विसर्जित करा' असा सल्ला कोणी तरी त्यांना दिला, तर ते कसे ऐकतील ? कारण ही संघटना कोणाही राजकीय पक्षाच्या दयेवर उभी राहिली नाही, हे आपण एकदा लक्षात घेतले पाहिजे.

'आर. एस. एस. नेहमीच असे मानीत आली आहे की, आम्ही शत्रु-वातावरणात आहोत. शत्रु राष्ट्रात नव्हे. शत्रु-वातावरणात असल्याने साहजिकच त्यांचे काय चालू आहे हे कळत नाही. त्यांचे कधी ठराव होत नाहीत, उघड अधिवेशने होत नाहीत, म्हणून संघ जेवढा उघड आहे, तेवढाच गुप्त आहे. त्यामुळे ती संघटना कधीच खलास होणार नाही. त्याचबरोबर संघाची संघटना गुप्त आहे, हे जितके खरे आहे तितकेच, संघाची या देशावर असणारी निष्ठा गुप्त नाही, हेही सत्य नजरेआड करता कामा नये. संघ रशिया, अमेरिकेचा एजंट नाही. त्यांच्या देशभक्तीविषयी शंका घेण्याचे काहीही कारण नाही. तो भारताचे हितच पाहील, याबद्दल माझ्या मनात संदेह नाही. ज्याची राष्ट्रावर निष्ठा असते, त्याची गुप्त संघटना राष्ट्राला मारक नसते, हेही आपण लक्षात घेतले पाहिजे.'

सोलापूरच्या एका दिवसाच्या घाईगर्दीच्या भेटीत प्रा. कुरुंदकरांनी एकूण तीन वेगवेगळ्या वेळी राजकीय परिस्थितीसंबंधी आपले विचार सांगितले. तीनही वेळी हा संघ, जनसंघ व दुहेरी निष्ठा या प्रश्नाबद्दल त्यांनी चर्चा केली. प्रश्नोत्तराच्या कार्यक्रमाच्या वेळी तर ते संघाच्या राष्ट्रनिष्ठेची ग्वाही देत असताना अनेक श्रोत्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. यानंतर क्षणभर थांबून प्रा. कुरुंदकर म्हणाले, 'संघाची कार्यपद्धती गुप्त असो अथवा उघड असो, ती जितकी देशहिताला मारक नाही, तितकीच लोकहिताला मारक आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. मी स्वतः संपूर्णपणे संघविरोधी असलो तरी त्याच्याबद्दल भ्रामक कल्पना बाळगणे, हेही चुकीचे आहे.'

भीतीने, कायद्याने, लष्करी बळाने आर. एस. एस. मोडता येईल, ही समजूत खोटी आहे. चुकीचा का ध्येयवाद असेना, पण ती संघटना पैशाने विकत घेता येणार नाही, असे सांगून ते पुढे म्हणाले, 'संघाचे मुख्य ठिकाण रेशीमबाग येथे शासनाने अचानक छापा घातला, तेव्हा काय सापडले ? तीनशे हाफपॅन्टस, दोनशे टोप्या, तीनशे काठ्या, जेवणाच्या थाळ्या असे सामान सापडले. साधा चाकूही सापडला नाही. कारण छापा घालण्यापूर्वीच त्यांना त्याची बातमी लागली होती. इतके खोलवर संघाच्या माणसांचे शासनामध्ये 'पेनेट्रेशन' झालेले आहे.

अशी ही प्रबळ संघटना, पण राजकीयदृष्ट्या ती सतत अपेशी ठरत आहे. तिच्यामधील उणीवाबद्दल बोलताना प्रा. कुरुंदकर म्हणाले, ' या संघटनेची व्होट कॅचिंग कपॅसिटी सर्व पक्षात कमी आहे. जे त्यांचे आहेत, ते त्यांचेच आहेत, पण जे त्यांचे नाहीत, ते त्यांचे नाहीतच. या अडचणीवर उपाय म्हणून त्यांनी जनसंघ काढला. तरीपण जनसंघ व संघ यामध्ये एकमेकांत संबंध नाही, असा दोघांचाही दावा आहे. जनसंघाची स्थापना शामाप्रसाद मुखर्जींनी जरी केली असली,तरी पक्षाचे जिल्हा, तालुका पातळीवरील सर्व सचिव व पदाधिकारी संघाचे आहेत.श्री.अटलबिहारी बाजपेयींची सुरुवात शामाप्रसादाचे सचिव म्हणूनच झाली आहे. त्या बरोबरच समाजाच्या इतर थरात पसरण्याकरता उत्तरेकडे त्यांनी शेतकऱ्यांचे व इतर घटकाचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले, परंतु हे सगळे प्रयत्न करूनसुद्धा लोकशाहीत आवश्यक असलेली मते वाढेनात. म्हणून सदुसष्टच्या निवडणुकीमध्ये विविध पक्षांची आघाडी करण्याचा प्रयत्न जनसंघाने केला. ७२ सालीही तेच प्रयत्न झाले. ते सर्व अयशस्वी झाले. परंतु आघाडी केल्याशिवाय या पक्षाची मते वाढणे शक्यच नव्हते, म्हणून फिरून ७७ साली जनता पक्षाच्या रूपाने जनसंघाने आघाडी केली. या वेळी एक गोष्ट स्पष्ट झाली. ती म्हणजे,पक्षाकरता मते मिळविण्यासाठी जी कामे करावी लागतात ती आर. एस. एस.ने करायची, पण मते मिळविण्याची ताकद असलेले इतर पक्षाचे नेते व्यासपीठावर बसू लागले. पक्षाचे कार्यक्रम आयोजित करायचे ते या नेत्यांनी आणि त्याकरता राबायचे आर. एस. एस.ने, असे झाले. पेंडॉल बांधणे, भांडी घासणे, सभेच्या वेळी शिस्त राखणे इत्यादी सर्व कामासाठी संघ स्वतःचे कार्यकर्ते राबवत होता. जनता पक्ष आपलाच आहे, तो फक्त टिकवलाच पाहिजे, कारण इतराजवळ चालवण्याकरता कार्यकर्तेच नाहीत. हे जनसंघाला माहीत आहे. म्हणूनच जनसंघ पक्ष फोडण्याचा प्रयत्न कधीही करत नाही.

आजच्या राजकीय गदारोळात, या दुहेरी निष्ठेच्या प्रश्नामध्ये, जनसंघाने हिंदू राष्ट्रवादावरच निष्ठा ठेवून जनता पक्षाच्या निधर्मी कार्यक्रमावर कधीही अविश्वास दाखवला नाही, हे लक्षात घेण्याची गरज असल्याचे सांगून ते पुढे म्हणाले, ' अठ्ठावीस महिन्याच्या काळात जनसंघाने एकाही कार्यक्रमाला विरोध केला नाही. कारण कुठलाही कार्यक्रम अंमलात येणार नाही, हे त्यांना माहीत आहे. हिंदू मतदारसंघात मुस्लिम उमेदवार निवडून आणण्यास जनसंघाने अथवा आर. एस. एस. ने कधी विरोध केला आहे काय ? मग जर कोणत्याही कार्यक्रमाला विरोध नसेल तर दुहेरी निष्ठा याला काही अर्थ आहे काय ? कुणाची निष्ठा किती ठिकाणी विभागली जाते, याला काहीच मर्यादा असू शकत नाही. मी स्वतःच चाळीस-पन्नास संस्थांशी संबंधित आहे. माझी निष्ठा या सर्व ठिकाणी विभागली जाणारच. आर. एस. एस. आणि जनसंघाचा ध्येयवाद यात फरक झाला आणि एखाद्या भूमिकेवर जनसंघाचे लोक आर. एस. एस. च्या भूमिकेला उचलून धरू लागले, तर तिथे विरोध व दुहेरी निष्ठांचा प्रश्न येईल. '

या सगळ्या प्रश्नात काही समाजवाद्यांची भूमिका चुकीची असल्याचे सांगून प्रा. कुरुंदकर म्हणाले, ' जनता राजवटीच्याच काळात सोन्याचा भाव तीनशेसाठ रुपये तोळ्यावरून अकराशे रुपयांपर्यंत वाढला. स्वतःजवळ असलेले सोन्याचे साठे शासनाने विक्रीस काढल्याने बड्या भांडवलदारांनी कोट्यवधी रुपयांचा काळा पैसा पांढरा

केला, याचा निषेध एकाही समाजवाद्याने केला नाही. काळा पैसा पांढरा झाला हा येथे प्रश्न नाही; पण भावनात्मक प्रश्नामध्ये रस घेऊन, काळी टोपी घालून कशा तऱ्हेने नमस्कार करावा, याच्यावर समाजवाद्यांनी आंदोलन केले. या लोकांनी स्वत:ला समाजवादी म्हणणे सोडून दिले पाहिजे.'

वास्तविक पाहता हिंदुत्ववादाचा अभिमानी असलेल्या संघाने मुस्लिम समाजाच्या आधुनिकीकरणाचा आग्रह धरला नाही अथवा झालेले आधुनिकीकरण कमी करण्याचाही प्रयत्न केला नाही. खरे तर संघाने हिंदुत्ववादाकरता काहीच प्रयत्न केले नाहीत, असा माझा आक्षेप असल्याचे सांगून ते पुढे म्हणाले, 'संघाच्या गुप्ततेचा भीतियुक्त बाऊ केला जात असून, लोकशाहीच्या निवडणुका जिंकायला ही यंत्रणा उपयोगी पडत नसेल तर बिनलोकशाही मार्गाने सत्ता ताब्यात मिळविण्यासाठी या संघटना बांधलेल्या नाहीत, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आर. एस. एस. ची संघटना फक्त शहरात आहे,ग्रामीण भागात त्यांना स्थान नाही, हे आजवरच्या वाटचालीत संघाच्या आता लक्षात आले, तेव्हा आता कुठे त्यांनी ग्रामीण भाग आपल्या कामासाठी घेतलाय. माओ असं म्हणायचा की, शासन ग्रामीण भागात कच्चे असते म्हणून आमची सगळी क्रांतिकारी केन्द्रे खेड्यात आहेत. भारत व चीनमधील ग्रामीण भागाच्या परिस्थितीतील मोठ्या प्रमाणावरील साम्य पाहता, संघ जोपर्यंत ग्रामीण भागात पाय रोवत नाही, तोपर्यंत तो राज्यावर येऊ शकत नाही!

हरिजन पतप्रधान व्हावा, असे महात्मा गांधींचे स्वप्न होते; पण त्याच्या बुडाशी कोट्यवधी लोकांचे जीवनमान उंचवावे, हे खरे स्वप्न आहे. व्यक्तिवादी चित्र, हवेवरचे राजकारण, कार्यक्रमांच्या चर्चा कितीही केल्या तरी या देशाच्या राजकारणाला नवीन गती मिळणार नाही. अजूनही आपले राजकारण कार्यक्रमांवर चालत नाही, प्रतिमांवर चालते.' या वेळी श्रोत्यांनी विचारलेल्या 'इंदिरा कांग्रेसचे धोरण चालू द्यावे काय?' या प्रश्नाला उत्तर देताना प्रा. कुरुंदकर म्हणाले, 'जनता म्हणजे जनसंघ, म्हणजेच आर. एस. एस. म्हणजेच प्रतिगामी, जातीयवादी व हिंदुत्ववादी लोक असे इंदिरा काँग्रेस म्हणते. मायनॉरिटीज्चे संरक्षण करणाऱ्या असे इंदिरा गांधींचे आज इमेज आहे. सर्व भारतभर गोवधबंदी, जरूर त्या घटनादुरुस्त्यांसह करण्याचा निर्णय इंदिरेचा. पाकिस्तानचे दोन तुकडे करण्याचा निर्णय इंदिरेचा. मुसलमानांच्यावर सक्तीचे कुटुंबनियोजन हाही निर्णय इंदिरेचाच! शिवाय ज्या स्त्रीने अलिगढ विद्यापीठाचे मुस्लिमीकरण स्वत:च्या कारकीर्दीत खलास केले, अशी इंदिरा ही मुस्लिमधार्जिणी ठरते आणि हेच अलिगढ विद्यापीठ मुस्लिमाच्या ताब्यात देणारा जनता पक्ष मात्र हिंदुत्ववादी ठरतो. हे कसे तेच अनाकलनीय आहे. इंदिरेच्या दहा वर्षांच्या कारकिर्दीमध्ये आर्थिक विषमता कमी न होता ती अधिक वाढली. म्हणजेच सधन अधिक सधन आणि दरिद्री अधिक दरिद्री झाले. याचाच अर्थ पूर्वीचे दरिद्री दलित आता आणखी दरिद्री झाले! मग इंदिरा गांधी दलिताच्या बाजूच्या कशा? इंदिरेने इन्कमटॅक्सची हायर स्लॅब तीन लाखावरून पाच लाखावर नेली, हा दलितांचा फायदा आहे काय? चहा मळेवाल्यांनी चहाच्या किंमती वाढवल्या, यात दलितांचा काय फायदा आहे? अशा सगळ्या गोष्टी असूनही इंदिरा गांधी दलिताच्या व मुस्लिमधार्जिण्या ठरतात. इंदिरा गांधीचे धोरण नेमके कसे आहे, हे जिथे समजत नाही, तिथे ते चालू द्यायचे की नाही, याचे उत्तर देताच येत नाही!'

येत्या निवडणुकीनंतर 'राष्ट्रपती-राजवट येईल काय, याचे उत्तर देताना प्रा. कुरुंदकर म्हणाले, 'घटनेनुसार आपल्या देशात, केंद्रात राष्ट्रपती-राजवट येऊ शकत' नाही. येत्या निवडणुकीमध्ये पार्टी ऑफ कोअॅलिशन म्हणजे जनता पक्षाची राजवट आली होती. यंदाची निवडणूक पार्टी ऑफ कोअॅलिशन (जनता) आणि पार्टी ऑफ कोअॅलिशन (काँग्रेस) याच्यामध्येच होऊन त्यातील पक्षच अधिकारावर येईल. राष्ट्रीय सरकार ही कल्पना संकेताने येते, कायद्याने येते. राष्ट्रीय सरकार हे समाजापुढचे कायमचे प्रश्न सोडवण्याचे उत्तर नसते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे!'

संकलन : एस. के. पिंपरकर
सोलापूर

पुस्तके

# मुक्काम सांगली—'साता उत्तरांची कहाणी'

पूज्य महात्माजींच्या पुण्यतिथीदिनाचे औचित्य साधून सांगली नगरवाचनालयाच्या सभागृहात खुद्द सदर ग्रंथलेखक आमदार ग. प्र. प्रधान यांच्या उपस्थितीत व ख्यातनाम समीक्षक प्रा. म. द. हातकणंगलेकर यांच्या अध्यक्षतेखाली 'साता उत्तरांची कहाणी' या ५०० पानी मौलिक ग्रंथावर भिन्न विचारप्रणालीच्या सात रसिक व चोखंदळ वक्त्यांनी आपल्या अभ्यासू व परखड प्रतिक्रिया अत्यंत मार्मिक, शैलीदार शब्दांत मधूनमधून विनोदाचे गुलाबपाणी शिंपडीत प्रकटपणे व्यक्त केल्या. हा तीन तास चाललेला, तीनशेवर रसिक श्रोते यांची दाद घेत चाललेला परिसंवाद म्हणजे उत्कृष्ट वक्तृत्वाची व काव्यशास्त्रविनोदाची अपूर्व मेजवानी होती, यात शंका नाही.

वक्त्यांचा परिचय, प्रास्ताविक झाल्यावर विलिंग्डन कॉलेजच्या प्राध्यापिका मालतीबाई किर्लोस्कर यांनी साधारण पाऊण तासात या ग्रंथातील सर्व पात्रांचा प्राध्यापकी पद्धतीने नेटक्या भाषाशैलीत सुरेख परिचय करून दिला. '१९४० ते ८० कालखंडातील राजकीय घटनांचा मागोवा मोठ्या रसिकतेने, तितक्याच तटस्थतेने घेणारी ही मनोवेधक कादंबरी आहे. त्यात गांधीवादी, समाजवादी, हिंदूसभावादी, आंबेडकरवादी, कम्युनिस्ट, काँग्रेसवादी व शे. का. पक्षवादी अशा 'स्वत:ला देशासाठी सर्वस्वी झोकून देणाऱ्या' सात तरुणांची ही कहाणी आहे. सहृदयता, आत्मीयता व विधायक दृष्टिकोन यामुळे ही राजकारणातील चिंतनिका वाटते. यात 'काव्य, शास्त्र व विनोद' अशा त्रिवेणी

संगम आहे.' इति मालतीबाई.

त्यानंतर कामगार–चळवळीचे जुने कार्यकर्ते सागलीचे ॲड. वसंतराव नाईक म्हणाले, 'ज्या कालखंडात मी माझे जीवनसर्वस्व वाहून घेतले त्या गेल्या ४० वर्षांच्याच जीवनाचे यथार्थ चित्रण पाहून, ते चित्रण पाहिल्याचा सुखद प्रत्यय मला लाभला. त्यात रेखाटलेले कम्युनिस्टाचे पात्र अत्यंत निकोप व विशुद्ध मनाने रेखाटले आहे मांडणी वस्तुनिस्ठ असून राजकीय विचाराचे मंथन सुरेख साधलेय. अर्थात जनतेत कम्युनिस्टांविषयी अनेक गैरसमज असले तरी, १९ जाने. ८२ 'भारत बंद' चळवळीची हाक स्वतः शेतमजूर व कामगारांनीच आत्मविश्वासाने देऊन ती यशस्वी केली. तथापी एकोणीसशे ७३ नंतरच्या केवळ सत्तेत मश्गुल झालेल्या नेत्यांच्या अनेक पात्राचा उल्लेख त्यांत नाही. तो हवा होता. तरुण पिढीला हे पुस्तक निश्चतच मार्गदर्शक आहे' त्यानंतर येथील 'दै. राष्ट्रशक्ती'चे संपादक श्री. दीनानाथ भोसले यांनी सागितले की, 'जुन्या काळातील राजकीय नेत्यांनी किती हालअपेष्टा सोसल्या त्याची स्मृती प्रत्येक पान वाचताना जागृत होते व डोळे पाणावतात. स्वतः एका पक्षाचे एकनिष्ठ सभासद असूत, अलिप्ततेने ४० वर्षांच्या विविध राजकीय प्रवाहांचे चित्रण करणे तसे सोपे नाही. हा बहुमोल ग्रंथ आहे!'

खरे साहित्यिक मूल्यमापन केले सागली कॉलेजचे प्राध्यापक कडलास्कर यानी! त्याचे मते 'ही राजकीय जीवनाचे (४० वर्षांतील) प्रतिबिंब दर्शविणारी दर्जेदार साहित्यिक कलाकृती आहे. लेखकाला जे भावल, जाणवले ते त्यांनी सौहार्दतेने, विशुद्ध मनाने शब्दांकित केले. भारतीय राजकीय पक्षातील जागृती–फाळणीचे पडसाद–घटना समिती–प्रजासत्ताक–सीमावाद–चीन–आक्रमण–भूदान, सत्तेचे राजकारण–पं. नेहरूंचा अत–राजनीती–युगाचा अंत–श्रीमती इंदिराजीचे धक्कातत्र–गुजराथ–बिहार भ्रष्टाचार–आदोलन, जनता राजवट, जे. पी.चा अंत इ. घटनांचा सूक्ष्म आढावा घेत सदर ग्रंथाची तुलना त्यानी कै. माडखोलकराच्या 'मुक्तात्मा प्रमोदवन'शी केली. कै. खाडेकराची 'उल्का' व अरुण सहादूच्या 'सिंहासन व मुबई दिनांक' या कादंबऱ्या याच धर्तीच्या. फरक एवढाच की, राजकारणात बोकाळलेल्या सत्तास्पर्धेचा परिणाम त्यात प्रभावीपणे प्रगट झाला आहे हिंदी लेखकातील कम्युनिस्ट कार्यकर्ते प्रेमचंदजी यशपाल याच्या पार्टी कॉम्रेड–दादा कॉम्रेड–गीता कॉम्रेड या हिंदी कादंबऱ्या, 'झूटासिंग' तसेच जैनेंद्रकुमाराची 'सुखदा' 'मुक्तिबोध' या कादंबऱ्या यापैकीच; पण या सर्वांत ग. प्र. प्रधानांची कलाकृती श्रेष्ठ! कारण तेथे अभिनिवेश प्रचारकी थाट नाही. तेथे आहे आम्ही काय केले याचे शैलीदार प्रकटन!'

बी. एड. कॉलेजचे प्रा. पाटणकर यांनी सात वक्त्यांची ही कहाणी' सोशिकपणे, ऐकणाऱ्या श्रोत्याचे अभिनंदन करून आपल्या मिस्किल व मोजक्या शब्दांमध्ये पुस्तकाचे मार्मिक परीक्षण केले. त्याच्या मते 'गजा जोशी' हे पात्र संघवाल्यांचे नव्हे. प्रातिनिधिक तर नव्हेच नव्हे 'तुम्हाला बुद्धिवाद कुठे कळतो?' हा संघावरील आक्षेप सर्वथा चुकीचा. स्वातंत्र्यकाळात देशासाठी जगण्याची बेहोश धुंदी घेऊन माणसे जगली. हिंदू समाजाची वाताहत का झाली? इतिहासाला appreciation असते. संघाची माणसे आपल्या कक्षेबाहेर गेली नाहीत; पण थोर नेतेमंडळी अरविंदबाबू घोष, अच्युतराव पटवर्धन अचानक राजकीय संन्यास घेऊन कायमचे का बाहेर पडले? त्याच्या मनात असं कोणतं आंदोलन घडलं असेल? पक्षाची वागणूक, स्वार्थाची उबग, सत्तास्पर्धा की आणखी काय? हा प्रश्न अनुत्तरित राहतो. मार्क्स युगपुरुष खरे; पण त्यांचे 'No Marriage, No RELIGION, No NATION, No PRIVATE PROPERTY' या सर्व 'नो'चे काय झाले? संघ हे एक कुटुंब (Family Organization) आहे. झाडाखाली पडलेल्या नासक्या फळावरून वृक्षाचे मूल्यमापन करावयाचे नसते. प्रधान मास्तर यांनी आणीबाणीत आम्हाला धीर दिला. वाचनाची गोडी लावली म्हणून कृतज्ञतेच्या भावनेने मी बोललो. अर्थात पुस्तकाला पानांची मर्यादा असते. वाचकांनी सुचवले ते लिहीत गेले तर तो Holdall होईल!'

प्रा. हातकणंगलेकर: 'हृदयस्पर्शी, निकोप, सौहार्दता हे ग. प्र. प्रधान याच्या या ग्रंथातील प्रधान गुण आहेत. ज्या काळात ते जगले त्या काळातील त्यांच्या स्नेहा–सोबत्यांना सुखद स्मृती उजळल्याचा आनंद लाभतो. लेखकात तटस्थता, तन्मयता, सहिष्णुता व प्रामाणिकपणा पुरेपूर आहे. यातील सर्व व्यक्ती अर्थपूर्ण आहेत; पण त्या त्या पक्षाच्या प्रतिनिधी नव्हेत.' असे अध्यक्षीय भूमिकेवरून त्यांनी उद्गार काढले.

'शेवटी स्वतः ग्रंथलेखक आमदार श्री. ग. प्र. प्रधान यानी सदर ग्रंथामागील प्रेरणा, त्याबाबतची त्याची भूमिका मनमोकळेपणाने व्यक्त केली. पूज्य महात्माजीना 'सामान्यांना असामान्यत्व प्राप्त करून देणारा महात्मा' या गौरवपूर्ण शब्दात नम्रपणे अभिवादन करून प्रधान म्हणाले, 'आम्ही सर्वसामान्य कार्यकर्ते. मी लिहिली ती अनामिकाची स्मरणगाथा आहे. मी कलावंत किंवा प्रतिभावंत नाही किंवा माझी कलाकृती महान मौलिक वगैरे काही नाही. माझ्या गुणापेक्षा माझी स्तुती फार झाली याचा मला संकोच वाटतो. भोवताली जे जे घडलं ते ते मी लिहिलंय. माझ्या लेखनाला मर्यादा आहेत. विचाराना तत्त्वज्ञानावर नेण्याची बौद्धिक झेप अथवा सामर्थ्य माझ्याजवळ नाही. १०–१२ वर्षे डोक्यात सातत्याने घोळत असलेले विचार, आणीबाणीच्या वेळी तुरुंगात मला भरपूर उसंत मिळाली म्हणून मी पुस्तकरूपाने ते प्रकाशात आणू शकलो. श्री. प्रभाकर पाध्ये या जबरदस्त साहित्यिक व्यक्तीशी २२–२४ वेळा तासन् तास चर्चा करून व तीनदा पुनर्लेखन करून हे पुस्तक मी पूर्ण केले आहे. 'बडी नेतेमंडळी आपली भूमिका बदलतात त्या वेळी सामान्य निष्ठावंत अनुयायांची फसवणूक होते.' असे मलाही वाटते.

'महाभारत' लिहिणारे व्यास व 'War and Peace' चे टॉलस्टॉय याचे विचार व तत्त्वज्ञान यातून समाजजीवनाकडे झेप घेण्याची पात्रता माझ्यात नाही; पण 'राजकारणात तू आलास का? भाडतोस का? प्रवाहपतिताप्रमाणे तू वागणार काय? याचे उत्तर मी शोधले. माझे हे अनुभव व विचार भावी पिढीसाठी आहेत. माझ्यापुरते ते मर्यादित नाहीत. मी १०० टक्के लोकशाही स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता आहे. लोकशाहीत एका प्रश्नाला अनेक उत्तरे असतात. म्हणून ही 'साता उत्तराची कहाणी' तशी अपूर्ण, असफल रहाणार! विविध राजकीय पक्षांतील, माझ्या बरोबरीने देशासाठी हालअपेष्टा सोसलेल्या, माझ्या स्नेहीसोबत्याना ही कहाणी मी समर्पण केली आहे. यात सर्व काही आले! राजकारणात माझे जे वैगुण्य तोच नेमका माझ्या साहित्याचा मानदड आहे!' प्रधानांचे भाषण भलतेच भावनाप्रधान वाटले.

' साता उत्तरांची कहाणी ' संपली खरी; पण श्रोत्यांच्या मनात एक विचार रेंगाळत राहिला आहे. हा ग्रंथ ' बदलती राजकीय मूल्ये, विचारप्रवाह व राजकीय, सामाजिक तसेच आर्थिक समस्या, सोडविण्याच्या मार्गातील दीपस्तंभ ठरेल काय.? की, केवळ स्वातंत्र्यसैनिकांना सात्त्विक आनंद व क्षणैक विरंगुळा देण्यापुरताच या ग्रंथाचा उपयोग होईल ?

अर्थात स्वातंत्र्यपूर्व व नंतरच्या राजकारणाचा इतिहास लिहिणाऱ्या महाभागाना सदर ग्रंथ उत्तम मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही.

**श्री. ग. सबनीस**
सांगली

# हे आठवे उत्तर !

अलीकडेच मी काही कामानिमित्त हैद्राबादेस गेलो होतो. तेथे योगायोगाने शिक्षणासाठी पूर्वी काही काळ पुण्यास असलेल्या आणि अद्यापही आपले भाषिक मराठीपण कायम ठेवलेल्या एका मुस्लिम सद्‌गृहस्थांची भेट झाली. परिचयाचे रूपांतर स्नेहात व्हायला वेळ लागला नाही. त्यांनी आपल्या मराठी मातृभाषेचे शुद्ध वळण कायम ठेवले आहे. महाराष्ट्रापासून दूर असले तरी मराठी पुस्तकांचे त्यांचे वाचन चालू असते. प्रा. ग. प्र. प्रधानांच्या ' साता उत्तरांची कहाणी ' या पुस्तकाचा विषय चर्चेच्या ओघात निघाला. या पुस्तकाविषयीची त्यांची प्रतिक्रिया त्यांनी प्रधानांना कळवावी, असा मी आग्रह केला, तेव्हा त्यांनी हे ' आठवे उत्तर ' लिहिले. ते प्रा. प्रधानांबरोबरच मराठी वाचकांनाही वाचावयास मिळावे म्हणून येथे दिले आहे.

—ब. ल. वष्ट

प्रिय मित्र मधू,

खूप वर्षांनी तुला हे पत्र लिहितो आहे. बहुधा हे माझे तुला पहिलेच पत्र असेल. त्यामुळे तू मला लगेच ओळखले नाहीस तर त्यात मला आश्चर्य वाटणार नाही. माझी ओळख पटायला तुला तुझ्या स्मृतीला बराचसा ताण द्यावा लागेल. खरे तर तुझी स्मृती तशी ( तुझ्या जगापुरती ) फार चागली आहे. १९३७–३८ सालापासूनच्या लहान-मोठ्या राजकीय घटना आणि त्यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे गुतलेली तुझी मित्रमंडळी तुला स्वच्छ आठवतात, त्यांची मनोगते, संभाषणे, चर्चा यांचा तपशीलही तुझ्या चांगला स्मरणात आहे, याचे मला साश्चर्य कौतुक वाटले. तुझी ' साता उत्तरांची कहाणी ' वाचताना इतकी वर्षे झाली आणि इतके कडू-गोड अनुभव आले तरी तुझा प्रांजळ स्वभाव आणि प्रामाणिक देशभक्ती यात यत्किंचितही उणेपणा आलेला नाही, हे जाणवून तुझ्याविषयी माझ्या मनात असलेला जुना जिव्हाळा पुन्हा ताजा झाला आणि हे पत्र लिहावेसे वाटले.

फर्ग्युसनमध्ये पहिल्या वर्षाला असलेला महंमद हुसेन दळवी तुला आठवतो का ? मी, वडिलाची बदली झाल्यामुळे नुकताच कोकणातून पुण्यास आलेला म्हणून काहीसा बुजरा होतो. त्यातून मी मुसलमानासारखा न दिसणारा पण मुसलमान असलेला असा त्या वर्षी वर्गात बहुधा एकटाच होतो. ( माझ्या एम. एच. दळवी या नावामुळे अनेकजण मला मराठाच समजत होते ) आपली ओळख झाली आणि केव्हा तरी मुस्लिमपणाचा मी उल्लेख केला तेव्हा तुम्हा मंडळीना किती आश्चर्य वाटले ते मला अजून आठवते. माझे सुदैव असे की, ' मुसलमान ' म्हणून मला दूर न टाकता तुम्ही मला ' आपल्यातला 'च समजलात. मात्र तुम्हा हिंदू ( आणि त्यातही उच्चवर्णीय ) तरुणाची परस्पर मैत्री जोपासली जाण्यासाठी जे सहज अनुकूल वातावरण तुम्हाला लाभते तसे ते मला लाभले नाही. मी मुस्लिम मोहल्ल्यात राहात असे. या मोहल्ल्याकडे सहज फिरकावे असा तुमचा परिपाठ नव्हता. मलाही सदाशिव पेठेत मोकळेपणाने तुमच्याकडे यावे असा धीर झाला नाही. (तेव्हापासूनच आपली 'जगे' वेगळीच होती का ? )आपला परिचय वर्गपातळीवरच राहिला. दोनच वर्षांनी मी पुणे सोडले ! गेली बरीच वर्षे मी हैद्राबादेस वकिलीचा व्यवसाय करीत असतो. आपली भेटगाठ झाली नाही तरी तुम्हा मडळीचे राजकीय कार्य मी वृत्तपत्रातून वाचीत होतो. नुततेच तुझे पुस्तक हाती आले आणि ते वाचून संपवल्यावर माझ्या नूतन मित्राच्या आग्रहाखातर हे पत्र लिहायला बसलो.

मित्रा, आपले स्वातंत्र्य देशाच्या फाळणीने रक्तलांच्छित झाले याचा खेद व्यक्त केला आहेस खरा, ( पान ४४ ) पण त्या सबंधातले तुझे विचार वाचताना त्यात तर्कबुद्धीपेक्षा पूर्वग्रह आणि भावविव्हलताच अधिक आहे असे मला वाटले. ' ब्रिटिशाची भेदनीती यशस्वी झाली आणि भारताची फाळणी झाली ' हे विधान संपूर्ण खरे आहे का ? देशाच्या राजकीय जीवनात मुसलमानाचे एक ' अलग धार्मिक समाज ' म्हणून वेगळे अस्तित्व मान्य करण्याला आणि खास राजकीय सवलतीच्या मोबदल्यात त्याचे सहकार्य मागण्याला प्रारंभ झाला तो १९१६ सालच्या लखनौ कराराने ! या करारानंतर सिंध प्रांत अलग झाला तेव्हाच बहुसंख्य मुस्लिम प्रांताच्या रूपाने पाकिस्तानच्या कल्पनेचे बीजारोपण झाले नव्हते काय ? हा करार लो. टिळकांनी ब्रिटिशांच्या प्रेरणेने केला असे म्हणता येईल काय ? विभक्त मतदारसंघ मान्य करून मुसलमान समाजाला स्वतःची वेगळी अस्मिता जोपासण्याची संधी कोणी दिली ? मुसलमान पुढाऱ्याच्या हट्टामागे ब्रिटिशांचे प्रोत्साहन असेल; पण अखेर निधर्मी राष्ट्रवाद आणि देशाचे ऐक्य यांना सुरुंग लावणारे हे हट्ट कोणी पुरविले ? तोंडाने हिंदी राष्ट्रवाद बोलणाऱ्या पण प्रत्यक्षात सदैव हिंदूच्या वतीने धर्मवेड्या मुस्लिम नेत्यांशी सौदेबाजी करणाऱ्या गाधी-नेहरू या थोर नेत्यानीच ना ? यात ब्रिटिश भेदनीतीचा संबंध कितीसा येतो ? खरी गोष्ट अशी होती की, काँग्रेसच्या या महान पुढाऱ्यांनी सामान्य मुसलमानांची ' हिंदी ' नागरिक म्हणून कधी दखलच घेतली नाही. त्यांना मुस्लिम धर्मवेड्याच्या स्वाधीन करून ते मोकळे झाले. त्याच्यामध्ये शिक्षणाची, निर्भेळ राष्ट्रवादाची, एकात्म भारताविषयीच्या आपलेपणाची जोपासना व्हावी यासाठी कधी त्यांनी प्रयत्नच केला नाही. उलट खिलाफतीसारखी प्रतिगामी चळवळ त्यानी कमालीच्या उत्साहाने उचलून धरली आणि राष्ट्रजीवनात मुस्लिमांचा वेगळा तावूत आपल्या हातांनी उभा करून दिला ! यामागे काय ब्रिटिश भेदनीतीची प्रेरणा होती ? (अच्युतरावांनी याबद्दलचे वस्तुनिष्ठ विश्लेषण अलीकडेच केले असल्याचे ऐकतो.)

याच पानावर हिंदुत्ववाद्यांची तू हेटाळणी केली आहेस; का, तर ते मुसलमानांच्या गुडगिरीला प्रतिगुंडगिरीने सामोरे गेले नाहीत म्हणून ! हा विचार निदान तुला तरी शोभत नाही. हिंदु-मुसलमानांची देशव्यापी यादवी का तुला हवी होती ? मुसलमानाचे वेगळेपण आजवर ज्यांनी पोसले होते त्यांनीच ही गुडगिरी निपटावयास नको होती का ? गोळवलकर गुरुजींनी असहाय्य हिंदूचे रक्षण करण्याचा आदेश दिला तोच समंजसपणाचा नव्हता का ? तलवारीला तलवार भिडेल असे वल्लभभाई पटेल म्हणाले होते !

' हिंदुत्वनिष्ठांच्या भूमिकेमुळे मुसलमानांतील कडवेपणा व फुटीरपणा प्रत्यक्षात वाढला ' (पान ४५) हे विधानही असेच अनैतिहासिक नाही का ? ज्या पांढरपेशा हिंदुत्वनिष्ठाची मजल ' सदाशिव पेठे 'पली-

कडे गेली नाही असे तूच लिहितोस त्यांच्यामुळे मुसलमानांचा फुटीरपणा कसा वाढेल? बॅ सावरकर १९३७ साली राजकीय क्षितिजावर आले त्या आधीच काही वर्षे पाकिस्तानची कल्पना लीगने मुस्लिम-जनमानसात रुजविली होती, हा इतिहास विसरून कसे चालेल? १९१६ सालापासूनच्या कॉंग्रेसच्या मुस्लिमविषयक धोरणाची परिणती फाळणीच्या मागणीत व्हावी हे जितके अपेक्षित तितकेच राजाजी, पटेल, नेहरू या धुरीणांनी ती सत्तासंपादनाच्या घाईसाठी स्वीकारावी, हे अनपेक्षित नव्हते काय?

खैरमोडेने 'मुसलमान समाजाला तुम्ही नेहमी दूर ढकललंत याचा ब्रिटिशांनी बरोबर फायदा घेतला,' (पान ५१) असे संघवाल्या जोशीला उद्देशून बजावले खरे; पण जोशी ज्यांचा प्रतिनिधी आहे त्याच्या पाठीशी हिंदु समाज होता काय? तो तर सदैव कॉंग्रेसच्याच मागे होता. तथाकथित चातुर्वर्ण्यवादी हिंदुत्वनिष्ठाची तर निवडणुकीत डिपॉझिटे जप्त होत होती! या नगण्य लोकाच्या 'ढकलण्याला' काय अर्थ होता? नव्याण्णव टक्के हिंदू ज्या कॉंग्रेसमागे होते त्यांचीच मुसलमानांना जवळ करण्याची जबाबदारी नव्हती काय? त्यांनी जिनाचे पाय धरले आणि सामान्य मुसलमानांची सदैव उपेक्षा केली. मग मुसलमान जिनांकडे गेले यात दोष कोणाचा? एका पिढीची ही चूक दीर्घकाळ भोवणार आहे आणि धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची संकल्पना जी एकदा दुबळी झाली ती तशीच दीर्घकाळ दुबळी राहाणार आहे, याबद्दल हिंदुत्ववाद्याना घोपटत राहण्यात काही अर्थ नाही, हे तुम्हा मंडळीना केव्हा कळणार?

ऐतिहासिक ठरलेल्या या घटनांच्या चर्चेत आता तथ्य नाही, असे तू शेवटी म्हटले असलेस तरी या घटनाचे वर्तमानावर व भविष्यावर होत असलेले किंवा होणारे परिणाम टाळण्यासाठी आपण काय करीत आहो, या जाणिवेचा तुझ्या पुस्तकात मला आढळ झाला नाही, हे खरे दुर्दैव! तुझ्या ४९५ पानांच्या या पुस्तकात देशाच्या सर्व प्रश्नांचा परामर्श आहे; पण 'मुसलमान' समाज शिक्षित, विज्ञानोन्मुख, आधुनिक व्हावा, लोकहितवादी–फुले–आगरकर–श्रीशाहू–कर्वे-कर्मवीर–आंबेडकर आदी समाज सुधारकांच्या विचार–प्रचार–कार्यद्वारा हिंदु समाजात प्रगतीची, परिवर्तनाची, सामाजिक क्रांतीची प्रक्रिया सुरू झाली तशी ती मुस्लिमातही सुरू व्हावी, राजकीय आणि राष्ट्रीय क्षेत्रात या समाजावर धर्मनिरपेक्षतेचे संस्कार व्हावे यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे, याची पुसटही जाणीव या पुस्तकात दिसत नाही! जणू फाळणी आणि तिची कारणपरंपरा यापासून तुम्ही मंडळीनी कसलाच बोध घेतलेला नाही. मला आश्चर्य वाटते ते याचे की, समाजवादाचे आणि मार्क्सवादाचे व्रत घेतलेले तुम्ही सर्वजण वरकरणी जोशीचे हिंदुत्व नाकारीत असलात तरी त्याच हिंदुत्वाच्या कोशात गुतून राहिलेले आहात! तुमची सर्व आधुनिकता, सामाजिक क्राती वगैरे वगैरे केवळ हिंदूपुरतीच मर्यादित राहिलेली आहे. मुस्लिमाच्या अस्तित्वाची तुम्ही दखलही घेत नाही! या देशातला दहा-बारा कोटीचा एक समाज धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीयदृष्टयाही होता तेथेच आहे आणि ही स्थिती देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने पुन्हा एकदा धोक्याची ठरण्याचा संभव आहे, हे तुमच्या अद्यापही लक्षात येऊ नये? गेल्या शंभर वर्षांत हिंदु समाजात केवढा बदल झाला! जोशीवर कितीही टीका केली तरी लोकहितवादीच्या वेळचा ब्राह्मण आज नाही आणि फुल्याच्या वेळचे पाटील, कुलकर्णी, ब्राह्मण सावकार, धार्मिक गुलामगिरी आणि भटांचे वर्चस्व आज नाही. शिक्षणाची आस, सामाजिक प्रगतीची आकांक्षा, समतेची भूक तुमच्या 'शूद्रातिशूद्रा'त सुद्धा केवढी तरी वाढली! आणि आम्ही? शंभर वर्षांपूर्वी होतो तेथेच आहोत! किंबहुना गोशा अधिक कडक करतो आहोत, समान नागरी कायद्याऐवजी शरियत कोर्टांचा हट्ट धरतो आहोत, मध्ययुगीन कडवेपणाची 'खोमेनी' स्वप्ने पाहात आहोत आणि इस्लामी धर्मसत्तेची आकाक्षा बाळगीत आहोत! मुल्ला–मौलवीचे वचस्व कमी होण्याऐवजी वाढतच आहे

प्रा. अ. भि. शहांखेरीज तुमच्यापैकी एकालाही आमच्या या स्थितीची चिंता वाटू नये? या पुस्तकात तुझ्या मित्राच्या तोंडी आलेले आमच्याविषयीचे उल्लेख किती तिऱ्हाईतपणे आले आहेत! हिंदू स्त्रियांच्या बंधमुक्तीबद्दल आठ पानांची चर्चा होते. तेव्हा 'सय्यदभाई म्हणून पुण्यातले एक कार्यकर्ते मुस्लिम स्त्रियांवरील अन्यायाविरुद्ध खूप काम करतात' एवढे एक वाक्य तेवढे विभावरीबाई उच्चारतात! (पान ४१४). चाळीस वर्षे तुम्ही पुण्यात कार्य करता आहात; पण सय्यदभाई म्हणून कोणी एक माणूस काही काम करतो आहे यापलीकडे मुस्लिम स्त्रियाच्या प्रश्नांविषयी कसलीही आत्मीयता, तळमळ, आच, तुम्हाला किंवा तुमच्या सहधर्मचारिणीना नसावी हे आमचे केवढे दुःख आहे! पाकिस्तान रावीपलीकडे नाही, ते पुण्याच्या पूर्व भागातही आहे आणि ते तुम्हाला हजार मैलांइतकेच लांब आहे!

हमीद दलवाई वास्तविक तुमच्याच संस्कारात वाढलेला तो आमच्या समाजात प्रबोधनाचे काम करीत होता. पण या सबंध पुस्तकात ३७७ व्या पानावर त्याचा केवळ ओझरता 'उल्लेख आहे. त्याचे काम तुम्ही 'आपले' कितीसे मानलेत? आमचे 'सत्यशोधक' एकाकीच राहात? तुमचे–आमचे काहीच नाते नाही काय? पं नेहरू सेक्युलॅरिझमचे मुकुटमणी पण त्यांचा उत्साह केवळ हिंदूनाच सेक्युलॅरिझम शिकविण्यापुरता. 'परंपरेची भुतं त्यांनी मानेवरून काढली' ती फक्त हिंदूच्या. (पान ३०४) त्यांनी आणि डॉ. आबेडकरानी हिंदु कोड बिलाचा विचार केला. मुसलमानांनाही लागू होईल अशा 'कॉमन सिव्हिल कोड'चा विचार केला नाही. तुम्ही सातजण ज्यांचे प्रतिनिधी आहात ते सर्व जनसंघ वगळता 'हिंदू' हा शब्द उच्चारीत नसतील, पण तुमची वर्तुळे हिंदू समाज भेदून 'बाहेर पडलेलीच नाहीत. मुसलमानात गरीब आहेत, शेतकरी आहेत, मजूर आहेत; पण त्यांना पुरोगामी आर्थिक चळवळीपासून अलिप्त ठेवण्यात आणि धार्मिक अभिनिवेशापोटी भिवंडी, मोरादाबाद, संबळ इथे दंगे माजविण्याच्या कामी चिथावण्यात आमचे मुल्ला–मौलवी यशस्वी होत आहेत, हे तुम्हाला केव्हा कळणार?

'हिंदू जमीनदारानी मुसलमान शेतकऱ्यांचे अतोनात शोषण केल्यामुळे पूर्व बंगाल्यातील मुसलमानानी पाकिस्तानच्या निर्मितीत भाग घेतला' (पान ३७८) हा तुझा समाजवादी अन्वयार्थ मुस्लिमाचे सामाजिक मन तुम्हाला कळलेले नाही, हेच दर्शवितो. कुराण-प्रामाण्य-मुल्ला-मौलवीची धार्मिक सत्ता आणि आधुनिक विचारापासून फारकत ही आमची अवस्था आहे. अठ्ठेचाळीस साली ब्राह्मणाची घरे जाळण्यात आली, हा जसा वर्णवर्चस्वाविरुद्ध सामाजिक क्रातीचा उद्रेक असण्यापेक्षा जातिद्वेषाचाच एक प्रकार होता, तशीच पाकिस्तानची निर्मिती ही शेतकऱ्याची पिळवणुकीविरुद्ध क्रांती वगैरे नसून निव्वळ धार्मिक द्वेष होता, हे तुम्हाला केव्हा कळणार? पाकिस्तान आणि बागला देश ही काय पिळवणुकीपासून मुक्त झालेली शेतकरी-कामकऱ्याची राज्ये आहेत? पंजाबी वर्चस्वाविरुद्ध बंगाली हिंदु–मुसलमान काही काळ एकत्र लढले, (पान ३७७) पण आज तिथे हिंदूची काय स्थिती आहे? मुस्लिम राष्ट्रे एकमेकात भाडली तरी काफिराविरुद्ध त्याचा धार्मिक राष्ट्रवाद सारखाच तीव्र असतो, हा मुस्लिम जगताचा अन्वयार्थ तुम्हाला केव्हा समजणार?

असो, हे माझे स्वगत कुठे तरी थाबले पाहिजे. शेवटी इतकेच सागेन की, या राष्ट्राच्या शरीरात दहा–बारा कोटीचा सर्वत्र पसरलेला आमचा समाज आज आहे असाच राहिला तर हा देश कधीच एकात्म होणार नाही आणि हा समाज खोमेनीवादाकडे वळला तर कोणाचीच धडगत नाही. मग या ४९५ पानाच्या चर्चेतला सगळा अर्थच नाहीसा होईल!

तुझा

एम. एच.

□

# मुंबई वार्ता

पृष्ठ १ वरून

आमच्या 'वेध'ची शिकार झाली ! राजकारण प्रत्येक क्षेत्रात असंच; पण ही असली राजकारणं म्हणजे आपल्याच पायावर धोंडा पाडून घेणारी. अर्थात चित्रकलेची जाण लोकात रुजली नाही, तर या बॉस लोकांचं काय जातं ? प्रदर्शनं भरली की त्यांच्या चित्रावर 'सोल्ड'चे लाल टिळे लागायला काही अडचण पडत नाही !

पण या लोकांची दादागिरी नवोदितांना नुसती निरुत्साही करणारीच नाही, तर चांगलीच उपद्रवकारक ठरते. तशी नवोदिताची वाट नेहमीच खडतर असते. मग ते साहित्य असो, संगीत असो, की चित्रकला असो; पण आमच्या क्षेत्रात संधीची अतोनात कमतरता ! विकासाचे, नोकरीचे मार्ग कमी आणि त्यातही पुष्कळशा नाड्या या प्रस्थापित बड्यांच्या हातात. तेव्हा त्याचे पाय धरणं आलच. आणि हे लोक 'कलाकार' असल्यामुळं मृदु, समजूतदार, हळवे, निष्कपट असतील अशी जर कुणाची समजूत असेल तर तो निव्वळ भ्रम आहे ! माझ्या एका मित्राला एका चित्रकारानं नोकरी द्यायचं कबूल केलं. नंतर हा मुलगा दुसऱ्या एका चित्रकाराशी सहज काही तरी बोलत होता. तेव्हा पहिले साहेब म्हणायला लागले, 'जा आता त्याच्याकडे ! तुझा-माझा संबंध काय ?' असले शाळकरी हेवेदावे करणारी ही माणसं. त्यामुळे मग विद्यार्थ्यांतही निष्कारणच तंटेबखेडे माजतात.

आमच्या समस्यांचा हा झाला एक प्रकार. आपल्या हल्लीच्या जीवनाला व्यापून दशांगुळं उरलेला महागाईचा कॅन्सरही आम्हाला प्राणघातक ठरतो आहे. चित्र रेखाटायचं म्हणजे एखादी कागद-पेन्सिल घेऊन निसर्गात मुक्त विहार करायचा, ही अगदी रोमॅन्टिक कल्पना झाली. ब्रश्श, कॅनव्हास, ड्रॉइंग पेपर, रंग, पोस्टर कलर्स अशा साऱ्याच्या किमती दिनी-प्रतिदिनी आपल्या वाढतच आहेत ! चित्र तयार झालं की, याच्या त्याच्या दाढीला हात लावून फ्रेमिंगसाठी पैसे मिळवण्याचा उद्योग आलाच ! एकूण चित्रकला हा दिवसेंदिवस महागडा आणि न परवडणारा छंद होत चालला आहे. आपली आपण कमाई करण्याऐवजी आई-वडिलांवरच असा भार होऊन राहाणं ही इतकी कष्टदायक गोष्ट आहे !

## न सांगण्यासारखे

या संदर्भात आणखी एक गोष्ट. खरं म्हणजे न सांगितलेली बरी; पण सांगितल्याशिवाय राहवतही नाही–सतीश म्हणाला. आमच्याबरोबर काही टक्केवारीवाली राखीव मुलंही असतात. या पददलिताबद्दल मला कळवळा होता आणि आहेही. मी समाजवादी विचारसरणीचा आहे आणि आम्हा समाजवाद्यांना पददलिताचा चक्क फाजील पुळकासुद्धा असतो; पण ज्या पद्धतीनं हे सरकारी सवलतीचा गैरवापर करतात, ते अतिशय संतापजनक तर आहेच, पण कमालीचं निराश करणार आहे. आम्ही आपले मध्यमवर्गीय, नाही तर कनिष्ठवर्गीय. आम्हाला ड्रॉइंगपेपर परवडण्याची मारामार; पण या लोकांना कोरेकरकरीत कॅनव्हास, रंगाच्या महागड्या ट्यूब्ज, स्कॉलरशिपच्या दक्षिणा, राहाण, शिक्षण फुकट, लावच्या सहली फुकट! ठीक आहे; पण त्याचा यांना काही उपयोग ? हे कॅनव्हास दुकानदाराला विकून पैसे मिळवतात ! यातल्या काही धनिकपुत्राचे चहाचे मळे, पानमळे, बागायतीही आहेत, तरी ते पददलितच ! इतक्या सवलती मिळून यांच्यातून एक तरी बरा चित्रकार वर आला आहे का ? पुढे गोल्डमेडल मिळवणाऱ्या माझ्या एका मित्रानं परीक्षेची फीसुद्धा याच्या-त्याच्याकडून मागून जमा केली होती ! असे प्रसंग घडले की, मन हादरत. प्रचंड गोंधळ होतो स्वतःचाच ! वाटतं की, आपल्याला वाटणारी सहानुभूती खरी, की येणारी चीड खरी ? काहीच कळेनासं होतं !

चित्रकार घडण्याच्या संदर्भात आर्टस्कूलमध्ये मिळणारं शिक्षण कितपत उपयुक्त असतं ? असा एक प्रश्न माझ्या मनात बराच काळ रेंगाळत होता. कारण चित्रकाराची कला आणि घडण खूपशी व्यक्तिगत आणि प्रत्येकाची वेगवेगळी. साच्यातून चित्रकार निर्माण करणं तर शक्य नाही. मग आर्टस्कूल कशासाठी ? सतीश म्हणतो, आर्टस्कूलचा उपयोग अर्थातच मर्यादित आहे. कारण अखेर ज्यानं त्यानं आपापली संवेदनक्षमता घडवायची असते; पण आर्टस्कूलमध्ये मूलभूत तंत्रं शिकवली जातात आणि तेही महत्त्वाचंच आहे.

आता आमच्या या शिक्षणाला बाहेर फारशी किंमत नाही, ही गोष्ट वेगळी ! कमर्शियल आर्टचा डिप्लोमा पूर्ण केलेली नीता राजे म्हणाली. कारण चार वर्षं शिकूनही आम्ही मिळवतो त्याला डिप्लोमा म्हणतात. त्यालाही काही किंमत नाही ! नोकरीच्या बाजारात आम्ही कोण ? तर केवळ एस. एस. सी. पास !

## स्पर्धा, अल्प प्रसिद्धी

पण तुम्ही कारकुनी नोकऱ्यांच्या बाजारात जाताच कशाला ? मी तिला विचारलं.

मग काय करावं ? एक तर कमर्शिअलवाले काही पेंटिंग करत नाहीत. अर्थात पेंटिंग करणारे फाइन आर्टस्‌वालेही त्यावर पोट भरू शकतात असं नव्हे ! साधारण आम्हाला बहुधा कॉपीरायटिंग अँड एजन्सीमध्ये कामं मिळतात. तीही डिप्लोमाच्या क्वालिफिकेशनवर नव्हे. एक दिवस काम करायचं–तोच इंटरव्ह्यु पसत असेल तर महिना १५०-२०० स्टायपेंडवर नोकरी. याहून जास्त स्टायपेंड हवा, तर त्यासाठी अनुभव पाहिजे, पण जास्त पैसा पैशाकडे येतो, तसा अनुभव अनुभवाकडे येतो. नवोदित आपले सदैव कोरडे ! मी आता घरच्या घरीच स्वतंत्रपणे कामं स्वीकारते. त्यातही राजकारण आड येतंच. तशात या कमर्शिअल क्षेत्रातली स्पर्धा अती जीवघेणी आणि घाणेरडी ! सगळेच त्याला तोंड देऊ शकतात असं नाही. मग काही शाळामास्तर होऊन मुलांना सूर्योदयाचा देखावा, नाही तर स्टुलावरची सुरई शिकवण्यात जन्म काढतात. काही चलाखीनं बँकेत चिकटतात आणि आर्टस्कूलचा कालखंड विसरून जातात. मुलींना लग्नाचा राजरस्ता असतोच आणि गृहिणीपद, मातृपद इत्यादी वलयांकित जागांची सूत्रं हाती घेतली की बाकी काही केलं नाही तरी चालत !–मुलींच्या कलाशिक्षणाबद्दल नीता अर्थातच अधिकारवाणीनं बोलत होती. आधीच मुलींची संख्या कमी. अंतिम वर्षाच्या आमच्या दीडशे जणांच्या वर्गात आम्ही फक्त आठजणी होतो. त्यातली एक स्टायपेंडवर समाधान मानतेच. एक बँकेत आहे आणि उरलेल्या लग्न करून पेंटिंग वगैरे साफ विसरल्या आहेत !

अर्थात निरुत्साही करणारी एवढी परि-

MANOOS ( Marathi Weekly ) 5·00 Rupees Regd. No. PNC–W 28
( Licensed to post without prepayment of postage–No. 11 )

स्थिती निर्माण केली गेलेली असते, की पेंटिंग वगैरे सगळं सोडून द्यावं, असा वैताग कुणालाही वाटावा–सतीश म्हणाला. याला हातभारं लावणारे असतात उपरे, अनाहूत सल्लागार. बऱ्याच खटपटीअंती एखाद्या नवोदिताचं प्रदर्शन समजा कुठे भरलंच, तर येणारा समीक्षक ते जेमतेमच बघेल. दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात पहावं तर आपल्या नावाचा जेमतेम उल्लेख–की यांचं पण प्रदर्शन भरलं होतं आणि शेजारच्याच दालनात भरलेल्या प्रस्थापिताच्या शिळ्या चित्रांचं मात्र पानभर कौतुक ! आमच्याबद्दल काही लिहायचंच झालं, तर लावलेला टीकेचा कडक सूर! की, ही चित्रं जरा अधिक अनुकरणात्मक आहेत वगैरे. आम्हाला लायकी नसताना कुणी डोक्यावर घ्यावं अशी अपेक्षा नाही; पण आमच्या घडण्याच्या प्रक्रियेकडे निदान सहानुभूतीनं पहाणं, तेही नाही ! या प्रदर्शनातली माझी चित्रं एका रसिकाला फार जावडली. तो म्हणाला, तुझा मागचा वन–मॅन शो बघायला मी येणार होतो; पण त्याचा प्रतिकूल अभिप्राय वाचून बेत बदलला ! याखेरीज नाव बदलून पाठवलं असता चित्राला पारितोषिक मिळणं, अनुकूल अभिप्राय येणं हेही घडतं ! मी म्हटलं–मुळातच तरल, अनाकलनीय आणि गूढ असा कलाव्यापार अधिकच गूढ बनतो तो असा. खेरीज, काही तथाकथित संस्कृतीअभिमानी हा एक महाबोअर प्राणी असतो–सतीश म्हणाला. ही माणसं येता जाता उपदेश करतात. तुमची चित्रं भारतीय असायला हवीत.

भारतीय चित्र म्हणजे काय ? राजस्थानी मिनिएचर का ? की अजंठा शैली ? असं विचारलं तर त्याचंही उत्तर देता येणार नाही एवढी या ढुढ्ढाचार्यांची समज मर्यादित असते. भारतीय चित्र म्हणजे भारतीर शैलीतलं की भारतीय विषयावरचं ? असं मुळात काही असू शकतं का ? चित्रकलाही अमूर्ताला मूर्त करण्याची कला आहे. तिचा आशय बहुधा अमूर्त, गूढ असतो आणि तो कुणा भारतीय, आफ्रिकन नाही तर युरोपियन भाषेत लिहिता, पकडता येण्याजोगे नसल्यानंच तर त्यावर चित्र काढलं जातं. ते प्रथमतः आणि अखेरीसही चित्र असतं. चित्रकाराला जसं कळलं जाणवलं तो अनुभव त्यानं रेखाटलेला असतो त्यानं स्वतः घडवलेली द्विमितीची भाषा ही त्या चित्राची आणि अनुभवाची भाषा असते. चित्रकलेला किंवा एखाद्या चित्राला राष्ट्रीयत्व नसतं. त्या चित्राचा आशय हा ह्युमन असतो, युनिव्हर्सल असतो, तो नॅशनल नसतो.

पण या देशाभिमानवाल्यांना हे सांगणार कोण ? यांच्या लेखी भारतीय चित्रकला अजंठाच्या गुहांत सुरू झाली, आणि तिथेच संपली !


एकूण हा तरुण चित्रकार जखडून टाकणाऱ्या परिस्थितीवर बराच चिडलेला होता. मात्र चित्रकाराच्या सामाजिक बांधिलकीचा मी विषय काढला, तेव्हा सतीशची ही चीड कलाकारांवर रोखली गेली. कला आणि समाज यांच्यात पडत आलेला, तर ती मुख्यतः कलाकाराच्या हस्तीदंती मनोरा छाप वृत्तीनं. कळत–नकळत बेपर्वाईनं. एक खरं की, कलाकारांसाठी खास करून नवोदितांसाठी अल्प दरानं आर्ट गॅलरीज मिळणं ही आमची गरज आहे; पण एक चित्रचळवळ आम्हीच उभी करण्याची आवश्यकता आहे. लोक आमच्याकडे येत नसतील, तर आम्ही त्यांच्याकडे जायला पाहिजे. चौका–चौकातून चित्रं मांडली पाहिजेत. लोकांशी त्याबद्दल दिलखुलास चर्चा केली पाहिजे.

मी कलाकार म्हणून खास सोनेरी पिसाचा, ही वृत्ती अक्षम्य आणि अन्याय्य आहे. त्याबदल्यात समाजाकडून आणि शासनाकडून अवास्तव अपेक्षा करणं, फायदे पदरात पाडून घेणं हेही गैरलागू आहे. अगदी ‘खडकावर पडूनच कलेचा अंकुर वाढला पाहिजे’ असली अतिरेकी भूमिका मी घेत नाही; पण सुखार्थी माणसाला जशी विद्या नाही, तशी कलाही नाही. तो फक्त सुस्तावतो. मध्यंतरी एका वृत्तपत्रातून एका चित्रकारानं आपली गाऱ्हाणी मांडली होती की, मला कशी व्यवस्थित जागा नाही, त्यासाठी मला कसं सहाय्य केलं जावं इत्यादी. मला वाटतं या महागाईच्या, धावपळीच्या जीवनात अशा राजेशाही, सरंजामशाही कल्पना कालबाह्य आहेत. किती तरी नावाजलेले चित्रकार अशा अडचणीतूनच वर आलेले आहेत. तेव्हा पंधराशे चौरस फुटाचा स्टुडिओ हवा हे लाड झाले. तुमच्या कष्टांना पर्याय नसतोच, आणि खरं म्हणजे तो नसावाच.

सतीशची ही मुलाखत पुष्कळच धीट, खुल्लमखुल्ला होती, आपल्या क्षेत्रातल्या जेष्ठांबद्दलची मतं तर एकदम कडक. एका वेगळ्या क्षेत्राचा हा परिचय आपल्याला जनरल इंटरेस्टचा तर आहेत; पण नवोदित चित्रकारांना आणि विद्यार्थ्यांना त्यातून कदाचित काही बोधही होईल.

–ललिता बर्वे

तिसरी आवृत्ती



सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

किमत : बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०